# विद्याप्रवेश

(शाळापूर्व तयारी कार्यक्रम – इयत्ता पहिली)

NIPUN BHARAT

# शिक्षक मार्गदर्शिका




'स्टार्स' प्रकल्पांतर्गत

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## विद्याप्रवेश (शाळापर्व तयारी कार्यक्रम - इयत्ता पहिली) : शिक्षक मार्गदर्शिका


- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- **प्रकाशक** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रेरणा** : **मा. आय. ए. कुंदन (भा.प्र.से.)**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
- **मार्गदर्शन** : **मा. सूरज मांढरे (भा.प्र.से.)**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **मा. प्रदिपकुमार डांगे (भा.प्र.से.)**
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **संपादक** : **मा. राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सहसंपादक** : **मा. डॉ. शोभा खंदारे**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **श्रीम. ज्योती शिंदे**
  उपसंचालक (भाषा विभाग),
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी सहसंपादक** : **श्री. भारत बोरनारे**
  प्रशासन अधिकारी (मराठी विभाग),
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **डॉ. निता जाधव**
  अधिव्याख्याता (मराठी विभाग),
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादन सहाय्य** : **श्रीम. वल्लरी सोनकुसळे**
  विषय सहायक (मराठी विभाग),
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सुधारित आवृत्ती** : मे २०२४
- **अर्थसाहाय्य** : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई. ('स्टार्स' प्रकल्पांतर्गत)
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.


- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

# विद्याप्रवेश

(शाळापूर्व तयारी कार्यक्रम – इयत्ता पहिली)

NIPUN BHARAT

## शिक्षक मार्गदर्शिका




समग्र शिक्षा अंतर्गत

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

NIPUN BHARAT

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# निपुण प्रतिज्ञा

आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही सर्वजण महाराष्ट्रातील प्रत्येक बालकास पायाभूत शिक्षण कौशल्ये आत्मसात करण्यास उपयुक्त शैक्षणिक वातावरण निर्मिती करण्यास कटिबद्ध आहोत.

आपण सारे मिळून, आपल्या मुलांसाठी निरवळ, आनंददायी समृद्ध अनुभवाच्या संधी देणारी, अभिव्यक्तीचं आकाश खुलं करणारी, मुक्तछंद जोपासणारी, नेतृत्वाच्या संधी देणारी आणि आत्मसन्मान जपणारी शाळा निर्माण करूया.. आपण सारे मिळून अशी शाळा आणि घर बनवूया.. जिथे बालके अर्थपूर्ण वाचन, हेतुपूरक लेखन व गणिती व्यवहार प्रत्यक्ष जीवनात उतरवतील आणि आयुष्यभर विद्यार्थी राहतील...

अशाप्रकारे, महाराष्ट्रातील प्रत्येक बालकास आरोग्यदायी आणि आनंददायी शिक्षण देऊन 'निपुण बालक' घडविण्याची आम्ही प्रतिज्ञा करीत आहोत.

# मनोगत

शिक्षक मित्रहो,

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार देशातील सर्व बालकांनी सन २०२६-२७ पर्यंत प्राथमिक स्तरावर पायाभूत साक्षरता आणि संख्यात्मक कौशल्ये प्राप्त करणे, हे शालेय शिक्षण व्यवस्थेसाठी सर्वोच्च प्राधान्य आहे. यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान प्राप्तीसाठी NIPUN BHARAT (NIPUN - **N**ational **I**nitiative for **P**roficiency in reading with **U**nderstanding and **N**umeracy) हे अभियान सुरू करण्यात आले आहे. त्या अंतर्गत इयत्ता पहिलीमध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्षातील सुरुवातीचे बारा आठवडे म्हणजेच तीन महिने शाळापूर्व तयारी कार्यक्रम घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. NIPUN BHARAT अंतर्गत बालकांच्या विकासासंदर्भात तीन ध्येये निश्चित करण्यात आलेली आहेत. सदर कार्यक्रम या ध्येयांवर आधारित आहे. त्यानुसार राज्यातही सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात जूनमध्ये शाळा सुरू झाल्यावर, सुरुवातीचे तीन महिने इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांसाठी विद्याप्रवेश : शाळापूर्व तयारी कार्यक्रम यशस्वीपणे घेण्यात आला. त्याबद्दल आपले सर्वांचे हार्दिक अभिनंदन!

शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ मध्येही शाळापूर्व तयारी कार्यक्रम इयत्ता पहिलीसाठी घेण्यात येणार आहे. सन २०२३-२४ मध्ये कार्यक्रमाच्या संदर्भाने इयत्ता पहिलीच्या वर्गास अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना मार्गदर्शनपर 'विद्याप्रवेश : शिक्षक मार्गदर्शिका' राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेमार्फत विकसित करण्यात आली होती. सदर शिक्षक मार्गदर्शिकेमध्ये काही आवश्यक सुधारणा करून ही सुधारित प्रत आपल्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. इयत्ता पहिलीच्या वर्गाला अध्यापन करणाऱ्या शिक्षकांनी या मार्गदर्शिकेतील नियोजनानुसार व वेळापत्रकानुसार शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस १२ आठवडे अपेक्षित कृती विद्यार्थ्यांकडून त्या त्या वेळी करून घेणे गरजेचे आहे. आठवडानिहाय कृती घेत असताना काही कृतींसाठी उपयोगी ठरतील अशा कृतिपत्रिकाही तयार करण्यात आलेल्या आहेत. या एकत्रित कृतींची सुधारित कृतिपुस्तिका विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाद्वारे पहिलीतील सर्व विद्यार्थ्यांकडून शाळापूर्व तयारीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व कृती करून घेतल्या जातील, जेणेकरून विद्यार्थ्यांना पुढील औपचारिक अभ्यासक्रम शिकणे सुलभ होईल अशी अपेक्षा आहे.

चला तर मग, या कार्यक्रमाद्वारे आपण सर्व जण इयत्ता पहिलीमधील सर्व बालकांना प्राथमिक शाळेतील शिक्षण यशस्वीपणे घेण्यासाठी तयार करूया. यासाठी आपणांस मन:पूर्वक शुभेच्छा!



**राहूल रेखावार** (भा.प्र.से.)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | घटकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १ |
| २. | शाळापूर्व तयारी कार्यक्रमाची उद्‌दिष्टे | ३ |
| ३. | विकासात्मक ध्येये | ४ |
| ४. | शाळापूर्व तयारी कार्यक्रमाचे अध्यापनशास्त्र | ६ |
| ५. | नियोजन व कार्यवाही | ९ |
| ६. | मुलांच्या क्षमता विकासाचे निरीक्षण व मूल्यांकन | १४ |
| ७. | पालकांचा सहभाग | १५ |
| ८. | नियमित उपक्रम | १८ |
| ९. | साप्ताहिक कृती नियोजन | २७ |
| १०. | ध्येयानुसार कृतींबाबत मार्गदर्शक सूचना | ४३ |
| | ध्येय १ – मुलांचे उत्तम आरोग्य व स्वास्थ्य (HW) | ४३ |
| | ध्येय २ – मुले प्रभावी संवादक बनतात (EC) | ६६ |
| | ध्येय ३ – मुले सक्रिय अध्ययनार्थी बनतात आणि त्यांच्या लगतच्या परिसराशी जोडली जातात. (IL) | ८८ |
| ११. | महिनावार मूल्यमापन तक्ता | ११४ |
| १२. | अध्ययन–अध्यापन साहित्य | १२१ |

# १) प्रस्तावना

पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान विकसनासाठी दि. ५ जुलै, २०२१ रोजी भारत सरकार पुरस्कृत निपुण भारत (NIPUN - **N**ational **I**nitiative for **P**roficiency in reading with **U**nderstanding and **N**umeracy) अभियानाची सुरुवात झाली. राष्ट्रीय प्रारंभिक बालसंगोपन व शिक्षण अभ्यासक्रमाचा आराखडा असे नमूद करतो की, पूर्व प्राथमिक शिक्षणाकडून प्राथमिक शिक्षणाकडे मुलांचे संक्रमण सुरळीत होण्याकरिता उद्दिष्टाधारित पूर्वतयारी आवश्यक आहे. या आराखड्यानुसार शाळा पूर्वतयारीमध्ये मुलांच्या विकासाच्या सर्व क्षेत्रातील आवश्यक कौशल्ये व पात्रता निर्माण करण्याकरिता मुलांची, शाळेची आणि कुटुंबाची तयारी करून घेणे अपेक्षित आहे.




निपुण भारत अभियान अंतर्गत मुलांचा प्राथमिक शाळेतील प्रवेश सहज आणि आनंददायी होण्यासाठी इयत्ता पहिलीतील सुरुवातीच्या तीन महिन्यांसाठी (१२ आठवडे) विद्याप्रवेश कार्यक्रमाची आखणी करण्यात आली आहे. हा कार्यक्रम खेळ आधारित अध्यापनशास्त्र व अनुभवाधिष्ठित अध्ययनाला प्रोत्साहन देणारा आहे. खेळ आधारित व समावेशित शिक्षणाचा विचार या कार्यक्रमात असल्यामुळे विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना (CWSN) सुद्धा शिक्षणाची संधी मिळेल असा हा उपक्रम आहे. यासाठी स्थानिक खेळ, खेळाचे साहित्य व त्याच्याशी संबंधित कृतींचा उपयोग करण्यावर अधिक भर देण्यात आला आहे.

### विद्याप्रवेश (शाळापूर्व तयारी) कार्यक्रमाची गरज :


संशोधनानुसार शाळेत प्रवेश करताना जी मुले शिकण्यासाठी तयार असतात, ती मुले शाळेत यशस्वी होतात, टिकतात आणि अधिक सक्षम होतात, हे लक्षात आल्याने विद्याप्रवेश कार्यक्रमाची गरज निर्माण झाली.

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार प्राथमिक स्तरावरील अंदाजे ५ कोटींहून अधिक मुले पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान प्राप्त करू शकलेली नाहीत. (NEP 2020)

- काही मुले अनेक कारणांमुळे अंगणवाडीमध्ये जाऊ शकत नाहीत. पर्यायाने त्यांची शिकण्याच्या दृष्टीने आवश्यक ती पूर्वतयारी होत नाही. अशा मुलांना सुद्धा शिक्षण प्रवाहात आनंदाने सहभाग घेता यावा.
- सर्व मुलांना शाळेची गोडी लागावी. बालमानसशास्त्रानुसार श्रवण, वाचन, लेखन, गणन, अभिव्यक्ती इ. कौशल्ये योग्यरितीने विकसित व्हावीत.
- पूर्वप्राथमिक शिक्षणाकडून प्राथमिक शिक्षणाकडे मुलांचा प्रवास सहजतेने व्हावा.

**विद्याप्रवेश (शाळापूर्व तयारी) कार्यक्रमाची मुख्य वैशिष्ट्ये :**

- विद्यार्थ्यांची लेखनपूर्व, वाचनपूर्व, गणनपूर्व, बोधात्मक आणि सामाजिक, भावनिक विकासात्मक कौशल्ये विकसित करण्यासाठी इयत्ता पहिलीच्या सुरुवातीला बारा आठवड्यांचा विद्याप्रवेश (शाळापूर्व तयारी) कार्यक्रम तयार करण्यात आला आहे.
- या कार्यक्रमात मुलांना परिसरातील साधनांनी समृद्ध व खेळ आधारित उपक्रमांचा अनुभव देण्यावर भर देण्यात आला आहे.
- शिक्षकांना या कार्यक्रमाचे संचलन सुकर व्हावे यासाठी विद्याप्रवेश (शाळापूर्व तयारी कार्यक्रम) शिक्षक मार्गदर्शिका विकसित केलेली आहे.
- इयत्ता पहिलीमध्ये प्रवेशित मुलांच्या पालकांमध्ये या कार्यक्रमाबाबत जाणीव-जागृती होण्यासाठी दर आठवड्याला पालकसभांचे आयोजन केले जाईल.




◊◊◊

# २) शाळापूर्व तयारी कार्यक्रमाची उद्दिष्टे

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार, इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश करणारी सर्व मुले शालेय शिक्षणासाठी तयार असावीत; या हेतूने इयत्ता पहिलीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी तीन महिन्यांचा खेळ–आधारित विद्याप्रवेश (शाळापूर्व तयारी) कार्यक्रम राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे राबवीत आहे. या कार्यक्रमाची मुख्य उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :



१) भिन्न सामाजिक पार्श्वभूमी असणाऱ्या, इयत्ता पहिलीमध्ये दाखलपात्र सर्व मुलांना शाळा प्रवेशासाठी प्रोत्साहित करणे.

२) मुलांचा इयत्ता पहिलीमधील प्रवेश सहज व आनंददायी करणे.

३) मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आनंददायी आणि उत्साही वातावरणात वयानुरूप व खेळ–आधारित शैक्षणिक अनुभव देणे.

४) भिन्न सामाजिक पार्श्वभूमी असलेल्या सर्व मुलांना त्यांच्या वयानुरूप आणि विकासाच्या दृष्टीने आवश्यक प्रारंभिक शिक्षण अनुभव प्रदान करणे.

५) मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान यावर लक्ष केंद्रित करणे, याकरिता शिक्षकांची अध्यापन शास्त्रीय पायाभरणी मजबूत करणे.

६) खेळ–आधारित अध्यापनशास्त्रीय दृष्टिकोनातून मुलांचे पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान यात अभिप्रेत असलेल्या क्षमता विकसित करणे.


वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी या शिक्षक मार्गदर्शिकेत कृतींचे साप्ताहिक नियोजन, मुलांच्या प्रगतीचे मूल्यांकन, मुलांच्या अध्ययन प्रवासात पालकांचा सहभाग या बाबींबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.

शिक्षक मार्गदर्शिकेत नमूद केलेल्या सर्व कृती निपुण भारत अभियानातील विकासात्मक ध्येयांशी सुसंगत आहेत. याबाबतचे सविस्तर विवेचन पुढील प्रकरणात करण्यात आले आहे.

# ३) विकासात्मक ध्येये

निपुण भारत अभियानांतर्गत ३ ते ९ वर्षे वयोगटातील बालकांना पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्यासाठी निश्चित करण्यात आलेली विकासात्मक ध्येये...

**विकासात्मक ध्येये (Developmental goals)**




**विकासात्मक ध्येय १ : मुले उत्तम आरोग्य व स्वास्थ्य राखतात (Health and Well being) :**

◈ मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने त्यांच्या जीवनातील सुरुवातीची काही वर्षे ही अतिशय महत्त्वाची असतात. यास्तव त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शिक्षक, पालक, समाज किंबहुना शिक्षण प्रक्रियेतील प्रत्येक घटकाने पुढील बाबी लक्षात घ्याव्यात.

- मुलांच्या शारीरिक, बौद्धिक, सामाजिक व भावनिक विकासासाठी या काळात विविध अध्ययन अनुभव देणे आवश्यक आहे. या अध्ययन अनुभवातून मुलांना जास्तीतजास्त संधी व प्रोत्साहन मिळाले तर त्यांचा इंद्रिय, स्नायू आणि कारक कौशल्ये यांचा योग्य प्रकारे विकास होऊन त्याचा मुलांना पुढील शिक्षणात उपयोग होतो.
- मुले लहान-मोठ्या गटांमध्ये कृती करतात तेव्हा ती (खेळ, गटकार्य), सामाजिक कौशल्ये आत्मसात करतात. त्यातून त्यांचा 'स्व' विकासाबरोबर सामाजिक विकासही होतो.
- मुलांनी निरोगी, सदृढ व सुरक्षित जीवन जगण्यासाठी त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे; तसेच इतरही आवश्यक क्षमता विकसित करणे महत्त्वाचे आहे.

### विकासात्मक ध्येय २ : मुले प्रभावी संवादक बनतात. (Effective Communicator) :

- शाळेत दाखल होण्यापूर्वी मुले त्यांच्या घरच्या भाषेतून परिसरातील घटकांबाबत व्यक्त होत असतात, शाळेत दाखल झाल्यानंतर घरची भाषा व शाळेतील अध्ययन–अध्यापनाची भाषा एकच असेल तर त्याला शालेय परिसराशी जुळवून घेणे सोपे जाते. मुलांमध्ये प्रभावी संवाद कौशल्ये विकसित होण्यासाठी पुढील गोष्टींचा विचार होणे अपेक्षित आहे.
  - या प्रारंभिक काळात मुलांमध्ये संवाद कौशल्य विकसित होण्यासाठी त्यांचे शिक्षण घरची भाषा (मातृभाषा/स्थानिक भाषा) यातून होणे महत्त्वपूर्ण असते. यासाठी विविध भाषिक कृतींचा समावेश अपेक्षित आहे.
  - भाषिक कृतींमधून मुलाला माहितीची देवाणघेवाण, सर्जनशीलता व चिकित्सक विचार या क्षमता प्राप्त होतात. कालांतराने मूल समजपूर्वक वाचन व लेखन करायला शिकते.
  - आपल्या देशात अनेक भाषा व बोली बोलल्या जातात. मुले त्यांच्या सोबत अनेक भाषा/बोली घेऊन शाळेत दाखल होतात. अशा वेळी शिक्षकांनी मुलांच्या बोलीभाषेचा स्वीकार करीत, मुलांना शिक्षणाच्या भाषेकडे आणावे. मुलाची मातृभाषा व शिक्षणाची भाषा यांचा दुवा जोडण्याचे महत्त्वाचे काम शिक्षकांनी करणे आवश्यक आहे. सुरुवातीच्या काळात मुलांचा भाषा विकास होऊन ते प्रभावी संवादक होणे अपेक्षित आहे.


### विकासात्मक ध्येय ३ : मुले सक्रिय अध्ययनार्थी बनतात आणि त्यांच्या लगतच्या परिसराशी जोडली जातात. (Involved Learner) :

- परिसरातील वस्तूंचे रंग, रूप, आकार, आवाज, गंध यांबाबत मुलांमध्ये नैसर्गिकरीत्या आकर्षण असते. या सर्वांबद्दल मुलांना कुतूहल असते. मुले त्यांच्या परिसरातील विविध आकृतिबंध 'पाहत व शोधत' असतात. मुले जे 'पाहतात' त्यातून परिसराबाबत त्यांना आकलन होत असते. 'शोधा', 'करून बघा', 'माहीत करून घ्या' अशा स्वरूपाच्या कृतींमधून मुलांचा बोधात्मक विकास (Cognitive Development) होणे आवश्यक आहे यासाठी शिक्षकांनी अशा कृती हेतुपूर्वक तयार करणे अपेक्षित असते.
  - पायाभूत शिक्षणात मुलांच्या तार्किक विचार क्षमतेचा विकास साधणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. त्यादृष्टीने परिसरातील घटनांचे संबोध मुलांमध्ये दृढ होण्यासाठी शिक्षकांनी प्रत्यक्ष अनुभव देणे गरजेचे आहे.
  - गणिती विचार व कारणमीमांसा ही बोधात्मक विकासाची महत्त्वाची अंगे आहेत. अर्थपूर्ण कृतींद्वारे मुलांच्या अमूर्त संकल्पनांच्या आकलनाचा पाया रचला जावा याकरिता वस्तू, त्यांचा संख्यात्मक व अवकाशीय संबंध या संकल्पनांचा समावेश गणिती विचारात होतो.
  - गणनपूर्व → गणिती संकल्पना → बीजगणितीय संबोध
  - आकार → अवकाश संकल्पना → भूमितीय संबोध अशा पद्धतीने मुलांचे आकलन व संबोध तयार होत असतात.

◊◊◊


# ४) शाळापूर्व तयारी कार्यक्रमाचे अध्यापनशास्त्र

निपुण भारत अभियान अंतर्गत निश्चित केलेली तीन विकासात्मक उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी खेळ आधारित आनंददायी शिक्षण पद्धतीचा अवलंब करणे अपेक्षित आहे. पायाभूत टप्प्यांवर मुलांना शिक्षणाचा अर्थपूर्ण अनुभव देण्याकरिता व प्रौढांसोबत उत्तम सामाजिक संबंध विकसित करण्याकरिता अध्यापनशास्त्रातील खेळ, आंतरक्रिया व परिसर/वातावरण या तीन घटकांची आवश्यकता आहे. जेणेकरून मुलांना शिक्षणाचा अर्थपूर्ण अनुभव देता येईल व प्रौढांसोबत निरोगी सामाजिक संबंध विकसित करता येतील. विद्याप्रवेशाचे (शाळापूर्व तयारी कार्यक्रमाचे) अध्यापनशास्त्र खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल :




१) **खेळ** : खेळ हा मुलांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. खेळातून मुलाला वातावरणाशी संवाद साधणे, ज्ञानाची रचना करणे याची संधी मिळते म्हणून शिक्षकांनी खेळाच्या माध्यमातून अध्यापन करण्यास प्राधान्य द्यावे. यासाठी पुढील विविध प्रकारच्या खेळांचा अध्यापनात समावेश असावा.

- **सांघिक खेळ** : मुलांमध्ये असणाऱ्या विविध पैलूंचा शोध घेऊन त्यांना अपेक्षित अध्ययन निष्पत्तीकडे नेण्यासाठी शिक्षकांनी परिसरातील विविध घटकांची मदत घ्यावी उदा. परिसरातील पारंपरिक सांघिक खेळ.




- **मुक्त खेळ** : हा उपक्रम मुलांना निवडीचे स्वातंत्र्य आणि निर्णय घेण्याची संधी प्रदान करतो तसेच इतरांचे अधिकार व दृष्टिकोन समजून घेण्यास देखील मदत करतो. मुक्त खेळात मुले खेळाचे साहित्य स्वतंत्रपणे

स्वत: निवडतात, खेळाचे नियम आणि दिशा मुले स्वत: ठरवितात. मुक्त खेळातील साहित्य आणि मित्रांसोबत मुले स्वतःला गुंतवून ठेवतात. यासाठी वर्गात शोधन, संगीत, बाहुलीघर, वाचन कोपरा यासारखी मुलांना आवडणारी आणि कृती करण्यास वाव देणारी क्षेत्रे असावीत.


- **रचनात्मक खेळ :** या खेळात मुलांना त्यांच्या परिसरातील विविध पैलूंचा शोध घेण्याच्या प्रक्रियेतून त्यांना अपेक्षित अध्ययन निष्पत्तीकडे नेण्यासाठी शिक्षकांनी योग्य ते मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. उदा. परिसरातील उपलब्ध वस्तूंचा वापर करून गटातील खेळ.

२) **आंतरक्रिया :** आंतरक्रिया हे खेळ आधारित अध्ययन प्रक्रियेचे अविभाज्य अंग आहे. अध्ययन–अध्यापन प्रक्रियेमध्ये वर्गात किंवा वर्गाबाहेर पुढीलप्रमाणे आंतरक्रिया घडणे आवश्यक आहे.

- **समवयस्क आंतरक्रिया :** खेळताना इतर मुलांमध्ये मिसळणे, सहभागी होणे ही शिकण्यासाठी एक महत्त्वपूर्ण बाब आहे. मुले निरीक्षण करतात, अनुकरण करतात. ते एकमेकांच्या मदतीने, पाहून, निरीक्षणाने व संवादाने शिकतात.
- **खेळण्यांसोबत आंतरक्रिया :** मुले मुक्त आणि मार्गदर्शित खेळांदरम्यान विविध खेळण्यांसोबत संवाद साधतात. अशा प्रकारच्या अनुभवांतून मुले समस्या निराकरण आणि शोध घेण्याची प्रक्रिया आत्मसात करतात. तसेच स्वत:शी बोलणे, आत्मचिंतन याची सवय मुलांमध्ये निर्माण होते.
- **पालक किंवा शिक्षकांसोबत आंतरक्रिया :** पालक किंवा शिक्षक यांनी मुलांसोबत केलेल्या आंतरक्रियेतून त्याने यापूर्वी शिकलेली अपेक्षित कौशल्ये आत्मसात केलेली आहेत किंवा नाहीत हे समजण्यास मदत होते. आत्मसात न झालेली व नव्याने आत्मसात करण्याच्या कौशल्यांसाठी पालकांनी किंवा शिक्षकांनी मुलांच्या शिकण्याच्या प्रक्रियेला या आंतरक्रियेतून आवश्यक वातावरण निर्मिती व मार्गदर्शन करावे.



**३) परिसर/वातावरण :** मुले उपजतच जिज्ञासू असतात. परिसरातील विविध घटकांबाबत जाणून घेण्यास ते उत्सुक असतात त्यासाठी परिसरातील साहित्याद्वारे विविध कृती करताना प्रश्न विचारणे, प्रयोग करणे, अंदाज बांधणे व त्याचे सामान्यीकरण करणे यातून ते परिसरातील भौतिक, सामाजिक वातावरण समजून घेत असतात. त्या वातावरण निर्मितीसाठी शिक्षकांनी आवश्यक ती मदत करावी. उदा. परिसरातील सहलीचे आयोजन.




मुलांच्या विकासाचे सर्व पैलू एकमेकांवर अवलंबून असतात. यांपैकी विकासाचा एखादा पैलू अविकसित राहिल्यास त्याचा विकासाच्या इतर पैलूंवर परिणाम होऊ शकतो; म्हणून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी विकासाच्या सर्व पैलूंना सारखेच महत्त्व द्यावे. वाचन, लेखन, गणन यांसारखी कौशल्ये आत्मसात करण्याकरिता शारीरिक व मानसिक परिपक्वता आवश्यक असते. उदा. लेखन येण्यासाठी डोळे व हाताच्या सूक्ष्म स्नायूंमध्ये (हस्त-नेत्र) समन्वय होणे, वाचन येण्यासाठी आकारांतील, आवाजांतील व उच्चारांतील साम्यभेद ओळखता येणे, गणन येण्यासाठी काही मूळ संकल्पना, शब्दसंपत्ती, मूर्त/अमूर्त व तर्कशुद्ध विचारांची क्षमता आत्मसात होणे इ. यासाठी मुलांकडून विविध कौशल्ये आत्मसात करण्याची अपेक्षा करीत असताना शिक्षकांनी आवश्यक शारीरिक व मानसिक परिपक्वता लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यानुसार अध्ययन अनुभवांची रचना करावी.

◈◈◈


# ५) नियोजन व कार्यवाही

## अ) शिक्षकांसाठी मार्गदर्शक सूचना :

इयत्ता पहिलीमध्ये प्रवेशित होणाऱ्या मुलांची शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच पूर्व साक्षरता, संख्याज्ञान बोधात्मक आणि सामाजिक कौशल्ये विकसित करण्यासाठी विद्याप्रवेश (शाळापूर्व तयारी कार्यक्रम) हा १२ आठवड्यांचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रम प्रचलित अभ्यासक्रमाशी सुसंगत असल्यामुळे अपेक्षित अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी फायदेशीर ठरेल; यासाठी शिक्षकांनी पुढील मार्गदर्शक सूचना विचारात घ्याव्यात :

- मुलांचा सर्वांगीण विकास व शाळापूर्व तयारीसाठी दिलेल्या १२ आठवड्यांच्या वेळापत्रकानुसारच अंमलबजावणी करण्यात यावी.
- कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी साप्ताहिक व दैनंदिन वेळापत्रक देण्यात आले आहे. यामध्ये छोट्या-मोठ्या गटातील कृती, मुलांच्या (घरातील, बाहेरील) कृती यांचा समावेश आहे. यासाठी शिक्षकांनी आवश्यक त्या साहित्याच्या उपलब्धतेबाबत पूर्वतयारी करावी.
- घरातील किंवा सभोवतालच्या परिसरातील वस्तूंचा खेळणी किंवा साहित्य म्हणून वापर करावा.
- वेळापत्रकातील उपक्रमांसाठी योग्य अशा (गट, जोडी, वैयक्तिक, सामूहिक) बैठक व्यवस्थेचे नियोजन करावे.
- विद्याप्रवेश (शाळापूर्व तयारी) कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना पालक आणि समाजाचा सक्रिय सहभाग घ्यावा. यासाठी पालकांच्या साप्ताहिक बैठकींचे आयोजन करावे.
- शिक्षकांनी प्रत्येक मुलाच्या विकासात्मक गरजांप्रति संवेदनशील असले पाहिजे. यासाठी शिक्षकांनी मुलांची विकासात्मकदृष्ट्या गरज लक्षात घेऊन त्यांना कृती करण्यासाठी प्रेरित करावे.
- मुलांना व्यक्त होण्यासाठी पुरेशा संधी द्याव्यात. मुलांना भाषण, संभाषण आणि वाचन या कौशल्यांसाठी भाषा वापरण्यास प्रोत्साहित करावे.
- विद्यार्थी कृतिपुस्तिकेतील कृतिपत्रिकेचा जास्तीत जास्त वापर व्हावा, यासाठी कृतिपत्रिकेत दिलेल्या कृतींना समांतर कृती घेण्यात याव्यात.
- नियोजनात दिलेल्या कृती मुलांकडून करून घेत असताना मुलांची जिज्ञासा, चिकित्सक वृत्ती, कृती करण्याची प्रेरणा या व अशा क्षमतांना वाव मिळण्यासाठी आवश्यक त्या वातावरणाची निर्मिती करावी.
- विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या (CWSN) गरजा लक्षात घेऊन बैठक व्यवस्था करावी.
- मुलांना अपेक्षित स्तरापर्यंत पोहोचण्याकरिता गरज भासल्यास कृतींची हेतुपुरस्सर पुनरावृत्ती करावी.
- स्वागत भेट, परिपाठ (circle time), मुक्त खेळ, वर्गाबाहेरील खेळ, निरोप खेळ यांसारख्या कृती रोज घ्याव्यात.

- कला विषयातील उपक्रमांसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करावे.
- वर्गामध्ये मुलांना साहित्य सहज हाताळता येईल या पद्धतीने वर्गरचना करावी.
- मुलांना प्रेरित करण्यासाठी कौतुक करावे जसे की, टाळ्या वाजविणे, स्टार देणे इत्यादी.
- यासाठी प्रत्येक कृती/खेळ झाल्यानंतर मुलांना आवराआवर करण्यास प्रोत्साहित करणे जेणेकरून हळूहळू मुले स्वतः साहित्य मांडणी करू शकतील व स्वतः साहित्याची आवराआवर करू शकतील.




- मुलगा व मुलगी यांच्याकडून समान व योग्य अपेक्षा ठेवावी. त्यांच्याशी बोलताना किंवा वर्गात सूचना देताना लिंगभेदी विधाने वापरू नयेत.
- माती, बिया, पाने, झाडांच्या फांद्या, खडे यांसारख्या परिसरातून सहज उपलब्ध होणाऱ्या बिनाखर्चाच्या साहित्यांचा समावेश कृतीत करावा.
- शाळेत उपलब्ध असणारी भाषा पेटी व गणित पेटी यांचा सुयोग्य व पुरेपूर वापर करावा.
- मुलांना स्वतः साहित्य तयार करण्यासाठी प्रवृत्त करावे.
- शाळापूर्व तयारीच्या या टप्प्यावर परिसर किंवा वर्गातील बहुतेक मुलांच्या परिचित असलेली भाषा, शिकविण्याचे माध्यम म्हणून वापरावी. मुले वर्गात जितक्या भाषा बोलतील तितक्या भाषांचे स्वागत करावे, त्यांचे कौतुक करावे.



- गणिती संकल्पना नेहमी विविध साहित्याचा वापर करून कृतींद्वारे समजावून द्याव्यात.
- मुलांच्या क्षमता विकासाचे नियमितपणे निरीक्षण करावे व अधिक मदतीच्या गरज असलेल्या (विशेष मुले) मुलांना त्यांच्या गरजेनुसार सहकार्य करावे.
- मुलांमध्ये किंवा गटांमध्ये तुलना टाळावी.
- मुलांच्या आत्मसन्मानाला धक्का लागेल अशा नकारात्मक शब्दांचा वापर टाळावा. (उदा. मूर्ख आहेस का? एकच गोष्ट सतत सांगायला लावू नकोस. इत्यादी)
- मुलांमध्ये वाचनाची सवय विकसित करण्याकरिता प्रयत्नशील रहावे.
- आकर्षक चित्र असणारी मनोरंजक अशी गोष्टींची पुस्तके वर्गात वाचन कोपऱ्यात असावी.
- तोंडी व लेखी सूचना देताना फळ्याचा वापर करावा.
- घोकंपट्टीतून होणारे संख्याज्ञान हे तात्पुरत्या स्वरूपाचे असते. उदा. ४ हा अंक लिहायला येतो, परंतु चार म्हणजे चार वस्तू असतात हे बऱ्याचदा मुलांच्या लक्षात येत नाही. त्यामुळे पुढे जाऊन सोप्या गणिती क्रिया मुलांना क्लिष्ट वाटू लागतात. परिणामी, गणिताबाबत मुलांमध्ये नावड निर्माण होऊ शकते, म्हणून संकल्पना स्पष्ट होण्यासाठी गणिताच्या विविध भाषा उदा. (१) वस्तू भाषा (२) चित्र भाषा (३) कृती भाषा (४) ध्वनी भाषा (५) बोटांची भाषा (६) चलन भाषा (७) गोष्ट भाषा (८) अंक (लिपी) भाषा इ. भाषा वापराव्यात व नंतर लिखित भाषा वापरावी. एक ते दहा अंक शिकविताना त्याची पूर्वतयारी होण्यासाठी वस्तू, स्पर्श, गोष्ट, चित्रे व अंक अशा पद्धतीने क्रम ठेवून पूर्वतयारी करावी. त्यामुळे संख्याज्ञानाचा पाया पक्का होऊन गणिताबाबत आवड निर्माण होण्यास मदत होईल.
- गणितीय भाषा वापरून गोष्ट सांगावी. वस्तूंच्या साहाय्याने संकल्पना स्पष्ट कराव्यात. स्पर्शपाट्यांच्या साहाय्याने अंकांना स्पर्श करू द्यावा. गणितीय पूर्व तयारीत विविध खेळांचा वापर करावा. त्यामुळे संख्याज्ञानाचा पाया पक्का होऊन गणिताबाबत आवड निर्माण होण्यास मदत होईल. पुढे–मागे, वर–खाली, च्यापेक्षा मोठा, च्यापेक्षा लहान, चढता–उतरता क्रम, लांब–रुंद, छोटा–मोठा, उंच–ठेंगणा, इत्यादी गणितीय भाषा व संकल्पना कृतीतून/खेळातून समजल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन गणिताची भीती दूर होऊन सर्जनशील विचार व रचनेची निर्मिती होण्यास मदत होते.
- संख्यांवरील क्रिया करून घेताना 'बेरीज' 'वजाबाकी' हे शब्द वापरू नयेत. कृती करताना 'मिळविणे, एकत्र करणे, कमी करणे, काढणे' असे शब्द वापरावेत.

## ब) समावेशित शिक्षण :

एकाच वर्गात सर्वसामान्य व विशेष गरजा असणारी अशी सर्व प्रकारची मुले असतात. ही सर्व मुले एकाच प्रकारच्या शिक्षण प्रक्रियेतून पुढे जात असतात. प्रत्येक मुलाची शिकण्याची, विकसित होण्याची, वाढण्याची वेगवेगळी क्षमता असते, प्रत्येकाची गती वेगळी असते याकरिता वातावरण निर्मिती केली जाते. जेथे अशा सर्व प्रकारच्या मुलांना सामावून घेऊन त्यांच्या विकासात्मक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने वातावरण निर्मिती करणे यालाच समावेशित शिक्षण म्हटले जाते.



## समावेशित शिक्षणातील महत्त्वाच्या बाबी :

- प्रत्येक मुलाची व्यक्ती-व्यक्तींमध्ये असणारे साम्यभेद समजून घेऊन ते स्वीकारण्याची मानसिक तयारी होते.
- मैत्रीपूर्ण नाती तयार करण्याच्या संधी प्राप्त होतात.
- बोधात्मक, भाषिक, भावनिक, सामाजिक कौशल्ये प्राप्त होण्यास मदत होते.

## समावेशित शिक्षणासाठी मार्गदर्शक सूचना :

- दिव्यांग मुलांच्या गरजांचा पूर्ण विचार करून वर्गातील किंवा उपक्रम घेतानाचे नियोजन करावे.
- मूल जसे आहे तसे त्याला स्वीकारावे व समजून घ्यावे.
- मुलांमध्ये सामाजिक जाण व संवेदनशील ता निर्माण व्हावी या दृष्टीने वर्गातील इतर मुलांनी दिव्यांग मुलांना मदत करावी, त्यांच्यासमवेत कृती करण्यासाठी प्रोत्साहित करावे.
- कृती करताना निष्पत्तीपेक्षा कृतीच्या प्रक्रियेला महत्त्व द्यावे.
- प्रत्येक मुलामध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी, प्रत्येक कृतीमध्ये त्याच्या गतीनुसार त्याला सहभागी होऊ द्यावे.
- परिपाठामध्ये वर्गातील समस्या निराकरण या कृतीमध्येही सर्व मुलांना सहभागी करून घ्यावे.
- दिव्यांग मुलांनी वर्गातील इतर मुलांशी समायोजन साधण्यासाठी शिक्षकांनी त्यांना प्रोत्साहित करावे.
- वर्गातील इतर मुलांमध्ये दिव्यांग मुलांप्रति संवेदनशीलता निर्माण करावी.
- दिव्यांग मुलांच्या पालकांशी चर्चा करून त्यांना योग्य पालकत्वाचे मार्गदर्शन करावे व दिव्यांग मुलांमधील गुणांना प्रोत्साहन द्यावे.
- अतिचंचल व स्वमग्न मुलांची काळजी घेण्यासाठी प्रशिक्षित तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन घ्यावे. या मुलांच्या गरजांबाबत जागरूक राहून तज्ज्ञ व्यक्तींनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

## शिक्षकांसाठी मार्गदर्शक सूचना :

विद्याप्रवेश शिक्षक मागदर्शिकेत समावेश असलेली संक्षिप्त रूपे व अक्षरे दिली आहेत.

1) HW - Health and Wellbeing 1.

2) ECL 1 - Effective Communicator Language

3) IL - Involved Learner

(ही सर्व NIPUN ची विकासात्मक ध्येये आहेत.)

- G1 (ध्येय-१) : मुलांचे उत्तम आरोग्य व स्वास्थ्य विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका आठवड्याच्या नियोजनात **HW** असा उल्लेख आहे.
  (शिक्षक मागदर्शिका पृष्ठ क्र. ४३ ते ६५ एकूण कृती ६८ आहेत.)
- G2 (ध्येय-२) : मुले प्रभावी संवादक बनतात. विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका आठवड्याच्या नियोजनात **ECL** असा उल्लेख आहे.
  (शिक्षक मागदर्शिका पृष्ठ क्र. ६६ ते ८७ एकूण कृती ८१ आहेत.)
- G3 (ध्येय-३) : मुले सक्रिय बनतात आणि त्यांच्या लगतच्या परिसराशी जोडली जातात. विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका आठवड्याच्या नियोजनात **IL** असा उल्लेख आहे.
  (शिक्षक मागदर्शिका पृष्ठ क्र. ८८ ते ११३ एकूण कृती ६८ आहेत.)
- विद्यार्थी कृतिपत्रिका सोडवून घेताना प्रत्येक कृतीच्या शेवटी शिक्षक मार्गदर्शिकेतील कृतींचा पृष्ठ क्र. दिलेला आहे. कृतीचे वाचन करून ती विद्यार्थ्यांकडून पूर्ण करून घ्याव्यात.
- शिक्षक मार्गदर्शिकेत HW-६८, ECL-८१, IE-६८ अशा एकूण २१७ कृतींचा समावेश आहे.
- सदर मार्गदर्शिकेत वेळोवेळी आलेल्या Links/QR Code Scan करावेत.
- भाषा पेटी उपलब्ध नसेल, तर शिक्षकनिर्मित साहित्याचा वापर करावा.
- महिनाभर विद्यार्थ्यांकडून विविध कृतींचा सराव करून घ्यावा व महिना अखेरीस पृष्ठ क्र. ११४ वरील मूल्यमापन तक्ता भरावा.
  तसेच तीन महिन्यांचे मूल्यमापन तक्तेही भरून घ्यावेत.

# ६) मुलांच्या क्षमता विकासाचे निरीक्षण व मूल्यांकन

मुलांचे नियमित निरीक्षण आणि मूल्यांकनामुळे मुलांच्या क्षमतानिहाय गरजा ओळखून त्यावर लक्ष केंद्रित करण्यास मदत होते. हा शिकण्याचा व शिकविण्याचा एक वेगळा दृष्टिकोन आहे, ज्यामधून तयार झालेला अभिप्राय हा मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी मदत करतो. यासाठी शिक्षकांनी पुढील बाबी लक्षात घ्याव्यात :

- मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास आणि शिकण्याची प्रक्रिया समजून घेण्यासाठी मुलाचे विशिष्ट परिस्थितीत, गटामध्ये काम करताना, वैयक्तिक कृती करताना, निरीक्षण करणे महत्त्वाचे आहे.
- प्रत्येक मुलाचा पोर्टफोलिओ (विद्यार्थी संचिका) विकसित करण्यात यावा. याची शिक्षकांना मुलांच्या क्षमता विकासाचा मागोवा घेण्यास आणि नोंद ठेवण्यास मदत होईल.
- मुलांचे किंवा त्यांच्या कृतींचे निरीक्षण करताना शिकण्याचे वेगवेगळे अनुभव व उद्दिष्टांबद्दल स्पष्टता असावी.
- निरीक्षणामध्ये वस्तुनिष्ठता असावी. आपली मते निरीक्षणांवर परिणाम करीत नाहीत ना याची खात्री करावी आणि निरीक्षणाचे मूल्यमापन करण्याऐवजी मुलाच्या वर्तनाचे वर्णन करावे.
- निरीक्षणांवर आधारित मुलांच्या वर्तनाच्या संक्षिप्त लिखित नोंदी कराव्या. नोंदी करताना मुलाची भाषा, सामाजिक संबंध, परस्परसंवादाची पद्धत इ. (विकासाचे निर्देशांक पाहणे) ची नोंद करावी.
- छायाचित्रे आणि व्हिडिओ क्लिप : मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू आणि शिकण्याची प्रक्रिया समजून घेण्यासाठी मुलांच्या कृतींची ध्वनी चित्रफित तयार (व्हिज्युअल आणि ऑडिओ रेकॉर्डिंग) करावी. ध्वनी चित्रफित शक्य नसल्यास ध्वनिमुद्रण करून वेगवेगळ्या कृतींचे फोटो घ्यावेत.
- तिसरे मूल्यांकन पूर्ण झाल्यानंतर, प्रत्येक मुलाची संकलित नोंद ठेवावी, जेणेकरून मुलाच्या भविष्यातील विकासाच्या दृष्टीने त्याची मदत होईल.

**मूल्यांकन करताना लक्षात घ्यावयाच्या बाबी :**

- प्रत्येक मुलाची त्याच्या स्वतःशीच तुलना करावी.
- मूल शिकत असताना त्याला नेमकी कोणत्या मदतीची गरज आहे हे पाहणेही महत्त्वाचे आहे.
- कोणत्याही कृतीचे निरीक्षण केल्यानंतर त्या कृतीमध्ये मुलांना पास-नापास असे संबोधू नये.
- मुलांच्या कृतीचे मूल्यांकन करताना निरीक्षण अनौपचारिक स्वरूपाचे असावे. मुलाला आपली परीक्षा घेतली जात आहे असे वाटता कामा नये.
- मार्गदर्शिकेत दिलेल्या माहेवार मूल्यमापन तक्त्याच्या नमुन्यानुसार सर्व विद्यार्थ्यांच्या नोंदी कराव्यात.

◊◊◊

# ७) पालकांचा सहभाग

मुलाच्या सर्वांगीण विकासात शिक्षक, पालक व समाज यांचा महत्त्वाचा वाटा आहे. यास्तव मुलांच्या कुटुंबाला व समाजाला मुलाच्या शिक्षण प्रक्रियेत सहभागी करून घेणे ही काळाची गरज आहे. आश्वासक पालकत्व, घरातील पूरक वातावरण हे शिकण्याच्या स्तरावर प्राथमिक तसेच नंतरच्या काळातील शालेय कामगिरीचे सर्वांत मजबूत निदर्शक आहे. त्या दृष्टीने मुलांच्या शिकण्यात पालकांचा सहभाग सुनिश्चित करणे अपेक्षित आहे यासाठी पुढील बाबी पालकांच्या लक्षात आणून द्याव्यात :



- सुदृढ शरीरात सुदृढ मन वास करीत असते; यासाठी मुलांच्या शारीरिक आरोग्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.
- पालकसभेत बालकांच्या आरोग्याशी संबंधित तसेच पौष्टिक आहाराबाबत डॉक्टरांचे मार्गदर्शन आयोजित करावे.
- मुलांच्या शारीरिक आरोग्यासोबतच त्याचे मानसिक आरोग्य देखील महत्त्वाचे कसे आहे, त्याचा शिकण्याशी कसा संबंध आहे हे पालकांना समजावून सांगावे.
- शक्य होतील तशा मुलांच्या भौतिक गरजा देखील वेळोवेळी पूर्ण करण्यास पालकांना सांगावे.
- मुलांना ज्या कृतीत अडचण आली असेल, ती कृती किंवा समांतर कृती कशी घ्यावी याबाबत पालकांना मार्गदर्शन करावे.
- आजचा शाळेचा दिवस कसा होता? आज शाळेत नवीन काय शिकायला मिळाले? अशा प्रकारच्या प्रश्नांमधून मुलांना शाळेतील चांगले-वाईट अनुभव सांगण्याची पालकांनी संधी द्यावी.
- आपल्या पाल्याची इतर मुलांसोबत तुलना, करण्याचे विपरित परिणाम याविषयी पालकांना समजावून सांगावे.
- पालकांना आपल्या पाल्याची शक्तिस्थाने त्यांच्या लक्षात आणून देण्यास सांगणे व सुधारण्यास वाव असणाऱ्या गोष्टींविषयी मुलांसोबत कशी चर्चा करावी याविषयी मार्गदर्शन करावे.

- गोष्टी ऐकण्याचा मुलांच्या शिक्षणावर होणारा सकारात्मक परिणाम, याविषयी पालकांना मार्गदर्शन करावे. शक्य असेल तेव्हा पालकांना आपल्या पाल्यास एखादी नवीन, रंजक गोष्ट सांगण्यास प्रेरित करावे.
- स्वयंपाकघर हे मुलांसाठी एक ज्ञानप्राप्तीचे ठिकाण असते. स्वयंपाकघरातील विविध वस्तूंचा, पदार्थांचा, प्रक्रियांचा अनुभव मुलांना कसा देता येऊ शकतो व त्यातून मुलांचे अनौपचारिक शिक्षणाची सुरुवात कशी होते याविषयी पालकांना मार्गदर्शन करावे.

  (उदा. भाज्या, कडधान्ये, तेल, डाळी, फळे, स्वयंपाक घरातील साहित्य, आहार इ. विषयी.)
- मुलांना आपल्यासोबत बाजारात घेऊन जाण्याचे व बाजारातील व्यावहारिक अनुभव जाणीवपूर्वक देण्याचे फायदे – याविषयी पालकांना मार्गदर्शन करावे.

  (उदा. वस्तूंचा दर, प्रत, भाव करणे, मोजमाप इ. विषयी)
- पालक आणि कुटुंबातील सदस्यांना पुस्तके वाचणे, खेळ खेळणे, गायन, कथाकथन आणि मुलांशी संभाषण करण्यास सक्षम करावे. यासाठी पालक सभांचे आयोजन करावे.

**पालकसभा** : दर शनिवारी पालकसभा घ्यावी. पालकांना उत्सुकता असते की, मूल शाळेत गेल्यावर नेमके काय करते? काय शिकते? तसेच एखाद्या मुलाचे पालक मुलाच्या शिक्षणाबाबत उदासिन असतील, तर त्यांना आपल्या मुलाच्या शिक्षणामध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन द्यावे. प्रत्येक पालक सभेत पालकांकडून एक कृती करून घ्यावी, त्यांना त्या कृतीचे महत्त्व पटवून द्यावे. उत्साही पालकांना त्यांचे अनुभव इतर पालकांना सांगण्याची संधी द्यावी म्हणजे सर्व पालकांचा उत्साह वाढेल.

तीन महिन्यांतील प्रत्येक शनिवारच्या पालकसभेत खालीलप्रमाणे मुद्दे चर्चिले जावे. यासाठी जाणीवपूर्वक शनिवारचा वेळ देण्यात आला आहे, त्यात गरजेप्रमाणे आपण एखादा अधिक मुद्दा घेऊ शकता अथवा त्या शनिवारी दुसरा काही उपक्रम घेऊ शकता.

| पहिला शनिवार | दुसरा शनिवार | तिसरा शनिवार | चौथा शनिवार |
|---|---|---|---|
| विद्याप्रवेश म्हणजे काय? इयत्ता पहिलीमध्ये दाखल होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी शाळापूर्व तयारी व्हावी, तो शाळेत रमावा, शिकण्यास प्रवृत्त व्हावा यासाठी हा १२ आठवड्यांचा कृतींवर आधारित कार्यक्रम हे पालकांना सांगतील. | आपल्या पाल्यास नियमित, वक्तशीरपणाने शाळेत पाठविणे,<br>त्याच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे,<br>त्याला येणाऱ्या समस्या सोडविणे,<br>सराव/समांतर कृती घरी करून घेणे.<br>यासंदर्भात सूचना देणे. | पालकांनी आपल्या पाल्यामध्ये दिसून येणाऱ्या बदलांचा अनुभव सांगणे.<br>शिक्षकांनी पालकांना मूल खेळातून कसे शिकते हे उदाहरणासहित समजावून सांगणे. त्या पद्धतीनेच मुलांकडून उपक्रमांचा सराव घेण्यास प्रेरित करणे. | गोष्टीचे भाषा विकासातील महत्त्व पालकांना समजावून सांगणे.<br>पालकांना आपल्या पाल्याला किमान रोज एक तरी गोष्ट सांगण्यास प्रेरित करणे. |

| पाचवा शनिवार | सहावा शनिवार | सातवा शनिवार | आठवा शनिवार |
|---|---|---|---|
| आपल्या पाल्याचे दैनंदिन निरीक्षण करून (मूल्यमापन) त्यामध्ये होणारा सकारात्मक बदल पालकसभेत सांगणे व येणाऱ्या अडथळ्यांवरही चर्चा करणे. | मूल्यांकन – दिलेले स्वाध्याय पालकांना दाखविणे व त्यावर चर्चा व मार्गदर्शन करणे. कोणत्या कृती परत कराव्या लागतील ते सांगणे. | पालकांना त्यांच्या पाल्यासोबत प्रत्यक्ष कृती करण्याची संधी देण्यात यावी व हे करण्यामागचे बाल मानसशास्त्र समजावून द्यावे. पालकांना मुलांचे चांगले आरोग्य व स्वास्थ्य याचे महत्त्व पटवून द्यावे. | आपल्या पाल्याचे दैनंदिन निरीक्षण करून (मूल्यमापन) त्यामध्ये होणारा सकारात्मक बदल पालकसभेत सांगणे व येणाऱ्या अडथळ्यांवरही चर्चा करणे. |
| **नववा शनिवार** | **दहावा शनिवार** | **अकरावा शनिवार** | **बारावा शनिवार** |
| विद्यार्थ्यांनी केलेल्या कृतींचे फोटो, कार्डपेपर इत्यादी संचिकेमध्ये ठेवलेले असतात, ते दाखविणे.<br>समाज सहभाग – उत्कृष्ट चित्रकार, गायक, शिक्षणप्रेमी, विद्यार्थीप्रेमी, शाळाप्रेमी, व्यावसायिक इत्यादी लोकांना पालकांसमवेत बोलाविणे व त्यांचा उपयोग विद्यार्थ्यांच्या शिकण्यात कसा होईल यावर चर्चा करावी. | मुलांसोबत प्रकटवाचन कसे करावे याविषयी पालकांना मार्गदर्शन करणे व त्याचे प्रात्यक्षिक करून दाखविणे. घरी मुलांसोबत वाचन करण्यास प्रेरित करणे. | मुलांसोबत सहभागी वाचन कसे करावे याविषयी पालकांना मार्गदर्शन करणे व त्याचे प्रात्यक्षिक करून दाखविणे. घरी मुलांसोबत वाचन करण्यास प्रेरित करणे. | आपल्या पाल्याचे दैनंदिन निरीक्षण करून (मूल्यमापन) त्यामध्ये होणारा सकारात्मक बदल पालकसभेत सांगणे व येणाऱ्या अडथळ्यांवरही चर्चा करणे. |

# ८) नियमित उपक्रम

विद्याप्रवेश (शाळापूर्व तयारी) कार्यक्रमाची उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी या पुस्तिकेत कृतींचे विशिष्ट नियोजन व त्याची कार्यवाही कशी करावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. या कृतींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी खेळ आधारित अध्यापनशास्त्राचा अवलंब करणे अपेक्षित आहे. त्या अध्यापनशास्त्रानुसार नियमित घ्यावयाच्या उपक्रमांबाबत आपण जाणून घेऊ या :

**दैनंदिन नियोजन व संबंधित ध्येय :**

१) स्वागत भेट (G1)

२) आमची दैनंदिनी (G1)

३) मुक्त खेळ (G1)

४) पायाभूत साक्षरता (G2)

५) पायाभूत संख्याज्ञान/परिसर अभ्यास/विज्ञान (G3)

६) भोजन (G1)

७) सर्जनशीलतेचा विकास (G1)

८) मैदानावरील खेळ (G1)

९) निरोप (G2)

### १) स्वागत भेट :

मुलांच्या मनात आपुलकी आणि सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी यासाठी शिक्षकांनी प्रत्येक मुलाला त्याच्या नावाने संबोधून स्वागत करावे. मुले-मुले व मुले-शिक्षक यांच्यामध्ये आंतरक्रिया घडून मोकळीक निर्माण होईल अशा कृती घ्याव्यात त्या पुढीलप्रमाणे :

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे वर्गात स्वागत करावे. त्यांना नावाने बोलावून त्यांच्यात आपुलकी आणि सुरक्षिततेची भावना विकसित होण्यासाठी संवाद साधावा.
- या वेळेस शिक्षकांनी वॉर्म अप, मुलांची आरोग्य तपासणी (नखे, केस, शरीर व दात, हात यांची स्वच्छता), कॅलेंडर कृती घ्याव्यात.
- मुलांना नंतर वर्तुळात किंवा अर्धवर्तुळात बसवावे. एकमेकांमध्ये सहज हालचाल करता येईल एवढी जागा सोडावी; यामुळे त्यांना कमीत कमी अडथळे येतील आणि उपक्रम करण्यास मदत होईल. कथाकथन सत्रासाठी 'circle time' गोलावरील कृतीचा वेळ नियोजित केला जाऊ शकतो. दोन


मुलांमध्ये अनौपचारिक गप्पा आणि मार्गदर्शित संभाषण करावे. मार्गदर्शित संभाषण एखाद्या विशिष्ट विषयावर किंवा कल्पनेवर (थीम) शिक्षकांनी सुरू करावे, तर मुक्त संभाषणात मुलांना त्यांच्या दैनंदिन अनुभवांशी संबंधित कोणत्याही गोष्टीबद्दल बोलण्यास प्रोत्साहन द्यावे.

## २) आमची दैनंदिनी :

### अ) दिनदर्शिका :

शिक्षकांनी मुलांना रोज वार, दिनांक, महिना (मराठी/इंग्रजी) व वर्ष पाहण्याची सवय होण्यासाठी दिनदर्शिका तयार करावी. दिनदर्शिकेतील कार्डे बदलून आज कोणता वार आहे? काल कोणता वार होता? उद्या कोणता वार असेल? अशा प्रकारचे प्रश्न मुलांना विचारावेत. यातून मुलांमध्ये काळाची समज विकसित होण्यास मदत होईल. तसेच एखाद्या विद्यार्थ्याचा वाढदिवस असेल तर फलकावर 'आजचा वाढदिवस' असे लिहून त्यासमोर विद्यार्थ्याचे नाव लिहून त्याला शुभेच्छा द्याव्यात.

### आ) हजेरी तक्ता :








या उपक्रमात शिक्षकांनी चित्रात दाखविल्याप्रमाणे हजेरी तक्ता तयार करावा. यासाठी शिक्षकांनी उभ्या रकान्यात मुलांची नावे, पहिल्या आडव्या ओळीत वारांची नावे प्रथम क्रमांकावर स्वतः शिक्षकाचे नाव असावे. त्यानंतर मुलांची नावे असावीत. शिक्षकांनी प्रथम स्वतःची सही करून हजेरी नोंदवावी ते पाहून मुले स्वतःचीही सही करतील. काही जण नुसत्याच रेषा ओढतील किंवा गिरगिटतील. या लेखन जाणिवेतून जातानाचा आनंद मुलांसाठी वेगळाच असेल. यासाठी शिक्षकांनी मुलांना तो अनुभव घेण्याची संधी द्यावी.

मुलांच्या नावाचे कार्ड वापरून उपस्थितीची कृती करावी, तिथे त्यांना त्यांच्या नावाचे कार्ड ओळखण्यास सांगावे, ते अगदी अनौपचारिकपणे वाचायला शिकायच्या आधी ही कृती करू शकतील. शिक्षकांनी वर्गातील प्रत्येक मुलाचे नाव एका कार्डावर लिहावे. प्रत्येक मुलाला त्याच्या नावाचे कार्ड दाखवावे. नंतर ती सगळी कार्डे एका ट्रेमध्ये ठेवावी. प्रत्येक मुलाला आपल्या नावाचे कार्ड शोधून ते बोर्डवर चिकटवायला सांगावे. अशीही कृती घेऊ शकता.

## इ.) हवामान तक्ता :

शिक्षकांनी एक बोर्ड तयार करून त्यावर त्या दिवशीचा दिनांक, वार, तापमान इत्यादी लिहावे. आठवड्यातील वार, वर्षातील महिने यांचे रोज वाचन घ्यावे. शिक्षकांनी चित्रात दाखविल्याप्रमाणे हवामान तक्ता तयार करावा. रोजच्या हवामानाबाबत मुलांसोबत चर्चा करून ऊन, वारा, पाऊस, थंडी या बाबींची नोंद मुलांना हवामान तक्त्यात करण्यास सांगावी.

| वर्ग | आठवडा | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| हवामान | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
| | दि. | दि. | दि. | दि. | दि. | दि. | दि. |
| ऊन  | | | | | | | |
| वारा  | | | | | | | |
| पाऊस  | | | | | | | |
| थंडी  | | | | | | | |

## ३) मुक्त खेळ :

मुक्त खेळाद्वारे मुले निर्णय घेणे, निवड करणे त्याचप्रमाणे इतरांना समजून घेणे, स्वतःच्या भावना व्यक्त करणे, इतरांचा नकार पचविणे, इतरांशी मिळून मिसळून रहायला शिकणे, स्वतःची वेळ येईपर्यंत वाट पाहणे, स्वतःची वेळ आल्यावरच कृती करणे अशा प्रकारची सामाजिक कौशल्ये आत्मसात करतात. यासोबतच मुलांची अवधान कक्षा वाढण्यास मदत होते.

### मुक्त खेळ घेण्यासाठी मार्गदर्शक सूचना :

- मुक्त खेळांसाठी शिक्षकांनी वर्गात आवश्यक ती वर्गरचना व साहित्य मांडणी करावी.
- परिसरात उपलब्ध असलेल्या साधनांचा पुरेपूर वापर करावा.
- वर्गात जागा कमी असल्यास मुलांना आळीपाळीने कृती करण्याची संधी द्यावी.
- प्रत्येक कृतीसाठी वेगवेगळे साहित्य वापरावे.

- मुलांना त्यांच्या आवडीनुसार खेळाची जागा निवडण्याची संधी द्यावी.
- मुलांना खेळाचे नियम व दिशा स्वत: ठरविण्याची संधी द्यावी.
- शिक्षकांनी मुलांशी संवाद साधावा व मार्गदर्शन करावे.
- मुक्त खेळासाठी खालीलपैकी विविध क्षेत्रे असू शकतात. प्रत्येक आठवड्यात किमान ३ ते ४ अशी क्षेत्रे असावीत.

**अ) वाचन क्षेत्र :** मुलांची मासिके, माहिती पुस्तके, चित्र पुस्तके, कथापुस्तके, मोठी पुस्तके, स्थानिक लोककथा, थीमॅटिक पुस्तके, विनोदी पुस्तके, पाटी, खडू इ.

**आ) बाहुली घर किंवा बाहुलीनाट्य :** वर्गातील एका बाजूला पडद्याच्या मदतीने किंवा फर्निचरच्या साहाय्याने घर तयार करावे. त्यामध्ये भातुकलीचा खेळ, विविध प्रकारच्या बाहुल्या, भातुकलीच्या खेळातील वेगवेगळे साहित्य ठेवावे. उदा. खेळातील स्वयंपाकाची भांडी, फळे, माती, पाने–फुले, भाज्या, विविध वाहने, स्वच्छतेच्या वस्तू, डॉक्टरांना लागणाऱ्या साहित्याचा सेट इत्यादी. (ओढणी, टोपी, जाकीट, लहान साडी, कापडाचे लांब तुकडे इ.), कंगवा, आरसे, चालण्याकरिताच्या काठ्या, जुने चष्मे, अकार्यक्षम टेलिफोन किंवा कॅमेरा, एक बॅग, जेवणाचा डबा इ.

**इ) शोधन क्षेत्र :** या क्षेत्रात भिंग, चष्मा यांसारखे साहित्य, टरफले, परिसरात उपलब्ध वनस्पती, बिया, चुंबक, लोखंडी वस्तू, तराजू, वजने, मोजण्याचे टेप, झाडांची पाने किंवा इतर कोणतीही स्थानिक उपलब्ध सामग्री, अशा प्रकारच्या साहित्याचा समावेश करता येईल.

**ई) ठोकळ्यांची (ब्लॉक) रचना क्षेत्र :** या क्षेत्रात वेगवेगळ्या रंगांचे व आकार असलेले ब्लॉक्स यांचा समावेश करता येईल. तसेच इंटरलॉकिंग ब्लॉक्स, फोम ब्लॉक्स, लाकडी ब्लॉक्स, अशा प्रकारचेही साहित्य वापरता येऊ शकेल.

**उ) गणिती क्षेत्र :** या क्षेत्रात कोडी, जुळणारी कार्ड्स, लेसिंग कार्ड्स, इनसेट बोर्ड, शंख–शिंपले, दगड, वर्गीकरण सामग्री, तार आणि मणी, लहान खेळणी (गाड्या, प्राणी) ॲबॅकस अशा प्रकारच्या साहित्याचा समावेश करता येईल.

**ऊ) वर्गाबाहेरील क्षेत्र** : या क्षेत्रात वाळू, माती, छोटी भांडी, बादली, तांब्या या प्रकारच्या साहित्याचा समावेश करता येईल.

**ए) कला क्षेत्र :** या क्षेत्रात विविध प्रकारचे रंगीत कागद, क्रेयॉन, पेन्सिल, मार्कर, पाटी, रंगीत खडू, कापडाचे तुकडे, रंग, ब्रश, टेप, चिकणमाती, पोळपाट–लाटणे, फळा, स्टेन्सिल, जुनी वर्तमानपत्रे, मासिके, आईस्क्रिमच्या कांड्या आणि इतर स्थानिक उपलब्ध साहित्य अशा प्रकारच्या साहित्याचा समावेश करता येईल.

**ऐ) संगीत आणि नृत्य क्षेत्र :** या क्षेत्रामध्ये खंजिरी, घंटा, वाट्या, बासरी, डफ, वाद्ये, खुळखुळा, विविध प्रकारची किंवा धातूंची भांडी, स्थानिक वाद्ये, रिबन किंवा रुमाल, ओढणी इ. मुलांच्या सर्जनशील हालचालींना प्रोत्साहन देण्यासाठी यांसारखी सामग्री किंवा साहित्याचा समावेश करता येईल.

## ४) पायाभूत साक्षरता :

साधारणपणे दोन वर्षे वयाची बहुसंख्य मुले लहान शब्द किंवा वाक्ये बोलू लागतात तीन वर्षे वयाच्या मुलांनी आपल्या बऱ्याचशा गरजा पूर्ण करण्याएवढी भाषा अवगत केलेली असते. हा भाषा विकास पुढे पायाभूत साक्षरतेसाठी उपयुक्त ठरतो. यासाठी शिक्षकांनी विविध अध्ययन अनुभव देऊन मुलांची भाषा साक्षरतेसाठी पायाभरणी करणे आवश्यक आहे ती पुढीलप्रमाणे :

**अ) मौखिक भाषा विकास :** शाळेत येण्यापूर्वी घरातून तसेच आजूबाजूच्या परिसरातून मुलाचा जो शब्दसंग्रह तयार झालेला असतो, त्यातून ते व्यक्त होत असते. त्यासाठी शिक्षकांनी विविध कृती कार्यक्रम घ्यावेत. उदा. मुलांमधील संवाद, अनुभवकथन, बडबडगीत गायन (एकट्याने किंवा सामूहिक) परिसरातील घटकांवर प्रश्न विचारणे, नवीन शब्दांचा अर्थ समजून घेण्यास प्रेरित करणे इ. या प्रकारच्या विविध उपक्रमांमध्ये त्यांना सहभागी होण्याची संधी देणे तसेच व्यक्त होताना त्यांच्या बोलीभाषेचा किंवा मातृभाषेचा स्वीकार करणे.

**आ) ध्वनींची जाण :** ध्वनी आणि चिन्हे यांचे एकत्रीकरण मुलांना अक्षर ओळखण्याच्या प्रक्रियेमध्ये मदत करते. मुलांना सातत्याने दिसणारे किंवा ऐकले जाणारे शब्द, ते अक्षर ओळख नसतानाही वाचू शकतात. अशा प्रकारच्या वाचनाला शब्दचित्रवाचन (लोगो ग्राफिक रीडिंग) म्हणतात. उदा. विद्यार्थी त्याच्या दैनंदिन वापरात येणारे शब्द सहजपणे ओळखू शकतो, जसे की– कप, टेबल, बिस्किट, पाणी इ. मुक्त खेळातील विविध क्षेत्रातील ध्वनींची जाणही त्यांच्यात निर्माण करता येईल.

**इ) प्रारंभिक वाचन :** प्रारंभिक वाचनामध्ये मुलांनी लिपीबद्ध चित्रवाचन करणे अपेक्षित असते. यासोबतच मुले अंदाजे मजकूर वाचनही करू लागतात. यासाठी वर्गात शिक्षकांनी काही चित्र व मजकूर असलेल्या पुस्तकांचा समावेश वाचन कोपरा या घटकात करावा.

**ई) प्रारंभिक लेखन :** आपल्या सभोवतालच्या वस्तू किंवा गोष्टींमधून मुले अक्षर व शब्द लेखनास सुरुवात करतात. हा एक पायाभूत लेखनाचा विकासात्मक टप्पा आहे. मुले जेव्हा अचूक लिहायला शिकतात, तेव्हाच ते लिहायला सुरुवात करतात हा एक सामान्य गैरसमज आहे. परंतु एकमेकांशी होणारा संवाद व त्यातून येणाऱ्या अनुभवांतून मुले चांगले लेखन करू शकतात. त्यामुळे शिक्षकांनी पायाभूत लेखनासाठी मुलांना मदत व्हावी या दृष्टीने खालील बाबी लक्षात घ्याव्यात :

उ) मुलांनी काय रेखाटले, गिरविले किंवा लिहिले हे त्यांना विचारावे.

ऊ) मुलांनी रेखाटलेल्या मजकुराबद्दल शिक्षक काय विचार करतात याचे उदाहरण मुलांसमोर ठेवावे.

**ए)** तेल खडू, खडू, पेन्सिल्स, वेगवेगळे मार्कर्स यांसारखे लेखन साहित्य वापरण्यास मुलांना प्रवृत्त करावे. मुलांना त्यांच्या आवडीच्या विषयांवर लेखन करण्यास प्रवृत्त करावे.

**ऐ)** हळूहळू मुलांनी रेखाटलेले आकार हे अक्षरासारखे दिसू लागतील. बऱ्याच वेळा चुकीची अक्षरे देखील लिहिली जातील. उदा. घ ऐवजी ध, व ऐवजी ब, र ऐवजी ल इ. यावेळी शिक्षकांनी मुलांचे हे लेखन देखील स्वीकारावे.

**ओ)** मुलांना नियमित पद्धतीने लेखन करण्यास काही वर्ष लागू शकतात हे शिक्षकांनी समजून घेणे महत्त्वाचे आहे.

### ५) पायाभूत संख्याज्ञान/परिसर अभ्यास/विज्ञान :

दैनंदिन जीवनातील सामाजिक समस्या तसेच विविध गरजा पूर्ण करण्यासाठी मुलांमध्ये गणितीय संबोध व कौशल्य अवगत करणे आवश्यक आहे. गणितीय कौशल्यात तर्क, संप्रेषण, खेळासाठी दैनंदिन नियोजन, सहसंबंध यांसारख्या प्रक्रियांचा समावेश होतो. मुलांना जुळणी करणे, वर्गीकरण करणे, क्रमवारिता येणे, मांडणी करणे, आकार व भरीव साहित्यासह आकृतिबंध बनविणे यांसारख्या क्षमता विकसित होण्याकरिता शिक्षकांनी विविध संधी निर्माण कराव्यात.

जसे की – गणित कोपरा. यादवारे मुलांना वेगवेगळे साहित्य हाताळण्याची संधी देता येईल. त्याचप्रमाणे शिक्षक अध्ययन–अध्यापन प्रक्रियेकरिता आवश्यकता भासल्यास स्वनिर्मित साहित्यही तयार करू शकतील. शाळांमध्ये असलेले गणिताचार्य भास्कराचार्य साहित्य संच, भाषा–गणित अध्ययन समृद्धी साहित्य संच यांचा वापर करता येईल. यासोबतच विविध कोडी असणारी कार्ड्स, जोडी कार्ड्स, वेगवेगळ्या बिया, वर्गीकरणाचे साहित्य अशा बाबींची उपलब्धता करून देता येईल. अशा प्रकारच्या संदर्भिय साहित्याची मुलांना गणित संबोधाचे आकलन व दृढीकरण करण्यासाठी मदत होईल.

तार्किक विचार व कारणमीमांसा या क्षमतांचा विकास करण्यासाठी पायाभूत संख्याज्ञानावर मुलांनी प्रभुत्व मिळविण्याकरिता शिक्षक–पालक यांनी जाणीवपूर्वक कृतींचे आयोजन करणे गरजेचे आहे. संख्यांची योग्य समज, संख्यांवरील चार मूलभूत क्रियांचा अचूक वापर इत्यादी बाबी जीवनाचा अविभाज्य भाग आहेत, त्याचबरोबर ते भविष्यातील किंवा पुढील शिक्षणाचा पाया आहेत, म्हणूनच मुलांच्या शिक्षणाच्या अगदी सुरुवातीच्या टप्प्यावर पायाभूत संख्याज्ञानाबाबत मुलांची संपादणूक उच्च पातळीवर होण्याकरिता प्रयत्न करणे गरजेचे आहे.

### पायाभूत संख्याज्ञान – महत्त्वाचे पैलू व घटक :

**अ) संख्यापूर्व संबोध :** मुलांमध्ये संख्यांची समज विकसित होण्यापूर्वी त्यांच्यामध्ये वर्गीकरण, क्रमबद्धता व एकास–एक संगती यांसारख्या क्षमतांचा विकास होणे आवश्यक असते. या क्षमतांच्या विकसनासाठी विविध साहित्यांचा वापर करून मुलांकडून विविध कृती करून घेता येतील. उदा.


गणित पेटीतील विविध आकार मुलांना देऊन त्यांच्या रंग, आकार इत्यादी गुणधर्मांच्या आधारे वर्गीकरण करणे. दोन गटांमध्ये एकास-एक संगतीने कमी-अधिक ठरविणे, इ.

**आ) संख्या व त्यांवरील क्रिया :** संख्यांचे वाचन, संख्यांचे अंकात लेखन, संख्यांची तुलना व संख्यांवर केल्या जाणाऱ्या 'मिळव व कमी कर' या दोन मूलभूत क्रियांवर भर देणे आवश्यक आहे. दशक दांडे-सुटे, जोडो ब्लॉक्स या साधनांच्या साहाय्याने स्थानिक किंमत, संख्यांचा लहान-मोठेपणा, मूलभूत क्रिया यांवर आधारित कृती घेता येतील.

**इ) आकार व अवकाशीय संबोधांचे आकलन :** आपण ज्या जगात वावरतो त्याचे वर्णन व वर्गीकरण करण्यासाठी आवश्यक व उपयुक्त असरणा हा घटक. यामध्ये विविध आकार, अवकाश, मापन, स्थान, दिशा व गती इत्यादींचा समावेश होतो. विविध चित्रे, परिसरातील उपलब्ध साहित्य यांचा उपयोग करून समान आकाराच्या वस्तू ओळखणे, दूर-जवळ, लहान-मोठे, वर-खाली, आत-बाहेर, डावीकडे उजवीकडे अशा संबोधांचे आकलन होण्यासाठी विविध कृतींचे आयोजन करणे.

**ई) मापन :** लांबी, वजन, आकारमान, तापमान इत्यादी राशींच्या मापनाकरिता अप्रमाणित एककांचा वापर व त्यातून प्रमाणित एककांची ओळख करून देणे आवश्यक आहे. याकरिता वस्तूंचे लांबी, वजन, आकारमान यांचे अप्रमाणित साधनाने मापन करून घेणे. त्यासोबत प्रमाणित साधनांची ओळख करून देणे.

**उ) आकृतिबंध :** हा गणिताच्या अभ्यासातील महत्त्वाचा घटक आहे. रोजच्या जीवनात व परिसरात विविध प्रकारचे आकृतिबंध आढळतात. नवीन आकृतिबंध तयार करणे, आकृतिबंधाची रचना व वर्णन, आकृतिबंध ओळखणे, विस्तार या बाबींचा समावेश या घटकात होतो.



## पर्यावरण जागरूकता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यासाठी उपक्रम :

मुलांमध्ये उपजतच कुतूहल असते. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचा स्वतः अर्थ लावण्याची आणि प्रतिसाद देण्याची क्षमता घेऊन ती जन्माला येतात. प्रत्यक्ष अनुभव आणि भौतिक, सामाजिक, नैसर्गिक वातावरणाशी संवाद साधून ती अधिकाधिक बळकट होत जाते. चिकित्सक विचार, तार्किक विचार, समस्या निराकरण व तुलना करणे. या क्षमता पर्यावरणीय व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यासाठी मदत करतात. या हेतूने विद्याप्रवेशमध्ये विविध उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

### ६) भोजन :

दैनंदिन किंवा नित्य क्रियांमधील एक महत्त्वाचा घटक म्हणजे 'जेवणाची सुटी' यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या जेवणासाठी, आरामासाठी, खेळण्यासाठी अधिक वेळ मिळतो. यासाठी किमान ३० मिनिटे द्यावीत. त्यातून सामाजिक विकास घडण्यास मदत होते. या काळात अनेक उपक्रम केले जाऊ शकतात, जसे की–

- आवश्यक स्वच्छतेच्या सवयींमधील जेवणापूर्वी योग्य पद्धतीने हात धुण्याची सवय लावणे.
- मित्र–मैत्रिणींसोबत आनंदाने जेवण करणे.
- जमिनीवर बसून न सांडता जेवण करणे.

### ७) सर्जनशीलतेचा विकास :

संगीत, नृत्य, चित्रकला आणि हस्तकला अशा विविध कलांद्वारे मुलांमध्ये सर्जनशीलता व सौंदर्यदृष्टी विकसित होण्यास मदत होते. या विविध कृतींमुळे त्यांना त्यांच्या भावना व्यक्त करण्याची आणि संवाद कौशल्य विकसित करण्याची संधी मिळते.

उदा. मातीकाम, कागदकाम, चिकटकाम, चित्रकला यांमुळे मुलांची लेखन पूर्वतयारी होते. त्यांना दैनंदिन जीवनातील अनुभव, स्वतःशी साधलेला संवाद यांचे सादरीकरण करण्याची संधी मिळते. यामुळे त्यांना वास्तविक जीवनातील वस्तू आणि घटना वेगवेगळ्या प्रकारे दर्शविल्या जाऊ शकतात, हे समजण्यास मदत होते. मुलांच्या कलाकृती भिंतींवर किंवा टेबलवर प्रदर्शित कराव्यात, ज्यामुळे त्यांना ती प्रक्रिया लक्षात ठेवण्यास मदत होईल, प्रोत्साहन मिळेल आणि अधिक सहभागासाठी मुले प्रेरित होतील. यामुळे त्यांचा आत्मसन्मान आणि आत्मविश्वास वाढेल, तसेच त्यांची कोणतीही कृती महत्त्वाची आहे याची जाणीव होईल. अशा प्रकारे, जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी कलेचे महत्त्व आहे, याची प्रचिती येण्यास मदत होईल.

### ८) मैदानावरील खेळ :

मुलांना रोज किमान ३० मिनिटे वर्गाबाहेरील खेळात सहभागी होण्याची संधी दिली पाहिजे. हे वर्गाबाहेरील खेळ मुलांना सभोवतालचे निरीक्षण करण्यास, गटांमध्ये खेळण्यास, एकमेकांशी संवाद साधण्यास आणि शरीरातील स्नायूंना एकमेकांशी समन्वय साधण्याकरिता मदत करतात. त्यासाठी वर्गाबाहेरील खेळ आणि उपक्रमांसाठी पुरेशी जागा उपलब्ध असावी. वर्गाबाहेरील खेळ मुले त्यांच्या आवडीप्रमाणे निवडू शकतात, जसे की धावणे, दोरीवरच्या उड्या मारणे किंवा खेळाच्या मैदानावरील साहित्यासह खेळणे, शारीरिक हालचाल आणि संतुलन यांसारख्या 'संरचित उपक्रम' आणि बागकाम, खोदणे आणि लागवड यांसारखे 'व्यावहारिक उपक्रम' पण मुलांना देता येतील.

**वर्गाबाहेरील खेळासाठी खालील मुद्दे लक्षात ठेवले पाहिजेत :**

- वाळू आणि पाणी खेळण्याचे क्षेत्र स्वच्छ आणि सुरक्षित असल्याची खात्री करावी.
- सर्व मुलांसाठी वर्गाबाहेरील खेळाचे साहित्य किंवा उपकरणे पुरेशी आहेत याची खात्री करावी.
- मैदानी खेळादरम्यान गटनिहाय संवादाच्या संधींची योजना करावी.
- मुलांसोबत स्वतः खेळात सहभागी व्हावे.
- मुलांचा खेळातील सक्रिय सहभाग सुनिश्चित करावा.
- वैयक्तिक खेळांसोबत सांघिक खेळांचा देखील अनुभव द्यावा.

### ९) निरोप (Good Bye Circle Time) :

दिवसभरात केलेल्या कृतींचा आढावा घ्यावा. यासाठी साधारणपणे ३० मिनिटे कालावधी असावा. असे करताना मुलांना, त्यांच्याबद्दल बोलण्याची संधी मिळते. आवडत्या कृती आणि कुठलीही संकल्पना समजली नाही, तर ती समजून घेण्याची संधी मिळते. यामुळे मुले उत्साहात घरी जातात व पुढील दिवसाच्या कृतीसाठी तयार होतात.

**वरील सर्व उपक्रम करताना शिक्षकांनी खालील बाबींची काळजी घेणे आवश्यक आहे :**

- कृती करताना मुलांबरोबर बसावे.
- प्रत्येक मुलाला प्रश्न विचारण्याची व त्याचे अनुभव सांगण्याची समान संधी द्यावी.
- प्रत्येक मुलाचे निरीक्षण करून त्याची नोंद ठेवावी, जी पालकांना सभेमध्ये दाखविता येईल.
- एखादे छानसे गाणे गाऊन/विनोद सांगून मुलांचा निरोप घ्यावा.

### मोकळिका :

एक कृती संपून दुसरी कृती सुरू होण्यामध्ये अवकाश असतो. मुले पुढील कृतीसाठी तयार होण्याच्या अनुषंगाने वेळेचे व्यवस्थापन महत्त्वाचे असते. यासाठी दोन कृतींमधील वेळेत शिक्षकांनी मोकळिका घेणे सोयीचे असते. जसे : बसून व्यायाम, तोंडी खेळ, हाताच्या वेगवेगळ्या हालचाली इ.

### सूचना :

1) G1 : Goal -1 ; G2 : Goal -2 ; G3 : Goal - 3 ;
2) HW : Health and Well being
3) ECL : Effective Communicator Language 1
4) IL : Involved Leaner

# १) साप्ताहिक कृती नियोजन

**महिना : पहिला** | **आठवडा : पहिला**

| ध्येय | वेळ (मि.) | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार |
|---|---|---|---|---|---|---|
| G1 - स्वागत भेट | ३० | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता |
| G1 - मुक्त खेळ | २० | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | | | | |
| G3 - संख्याज्ञान, परिसर आणि विज्ञान | ३५ | IL 2 विविध आवाज ऐकणे व ओळखणे<br>IL 67 आठवड्याचे वार ओळखा.<br>IL 3 सांगा सांगा लवकर सांगा, कोणता रंग हवा सांगा हा खेळ (टिपी टिपी टॉप टॉप) | IL 3 सांगा सांगा लवकर सांगा, कोणता रंग हवा सांगा. हा खेळ (टिपी टिपी टॉप टॉप)<br>IL 6 रंग ओळखणे<br>**(कृतिपत्रिका १)** | IL 7 चला खेळूया<br>IL 5 फळे व भाज्यांची ओळख **(कृतिपत्रिका २)** | IL 7 चला खेळूया<br>IL 14 लक्षात ठेवा. | IL 8 ओळख पाहू कशाचा हा वास?<br>IL 14 लक्षात ठेवा |
| G1 - उत्तम आरोग्य व समृद्ध जीवन व कला, सर्जनशीलता आणि सौंदर्यदृष्टीचा विकास | ३५ | HW 1 अवयवांची ओळख<br>HW 48 कागद फाडणे | HW 2 अवयवांची कामे व गप्पा<br>HW 48 कागद फाडणे | HW 2 अवयवांची कामे व गप्पा<br>HW 49 पानाफुलांची सजावट | HW 3 नेहमीपेक्षा वेगळे<br>HW 49 पानाफुलांची सजावट | HW 4 मित्र ओळख.<br>**(कृतिपत्रिका ३)**<br>HW 55 हत्तीला शेपूट लावणे. |
| भोजन | ३० | भोजन | भोजन | भोजन | भोजन | भोजन |
| गोष्ट/गाणे | ०५ | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे |

| ध्येय | वेळ (मि.) | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार |
|---|---|---|---|---|---|---|
| G2 -भाषा आणि साक्षरता (तोंडी भाषा, लेखन, वाचन) | ३५ | EC 1 कानगोष्टी – शब्द, वाक्य<br>EC 2 नाव सांगणे – स्वत:चे<br>EC 17 पुस्तके हाताळणे | EC 3 नावे सांगणे – फळांची/फुलांची/रंगांची<br>EC 38 वर्गातील सूचना पट्ट्यांचे वाचन<br>EC 24 चित्रवाचन 1 | EC 4 नाव सांगणे विशिष्ट जागा सांगून तेथील वस्तूंची नावे सांगणे.<br>EC 38 वर्गातील सूचना पट्ट्यांचे वाचन<br>EC 24 चित्रवाचन 1 | EC 4 नाव सांगणे विशिष्ट जागा सांगून तेथील वस्तूंची नावे सांगणे.<br>EC 50 वस्तूंच्या नावांचे शब्दकार्ड खेळ<br>EC 25 चित्रवाचन 2 | EC 4 नाव सांगणे विशिष्ट जागा सांगून तेथील वस्तूंची नावे सांगणे.<br>**(कृतिपत्रिका ४)**<br>EC 50 वस्तूंच्या नावांचे शब्दकार्ड खेळ<br>EC 27 चित्रवाचन – पूर्वानुभवावर गप्पा |
| G1 - मैदानावरील खेळ | ३० | HW 32 सरळ रेषेवरून चालणे<br>HW 38 लोळणे | HW 39 रेषांवरून चालणे<br>HW 38 लोळणे | HW 40 गमतीचा रस्ता | HW 40 गमतीचा रस्ता | HW 57 बादलीत चेंडू टाकणे. |
| निरोप | ३० | दिवसभरातील उपक्रमांचा आढावा तसेच गाणी, गोष्टी, गप्पा, गोष्ट वाचन. | | | | |
| **महिना : पहिला** | | | | | | **आठवडा : दुसरा** |
| G1 - स्वागत भेट | ३० | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी |
| G1 - मुक्त खेळ | २० | वाळू/पुस्तके/संगीत/ इतर खेळ | वाळू/पुस्तके/संगीत/ इतर खेळ | वाळू/पुस्तके/संगीत/ इतर खेळ | वाळू/पुस्तके/संगीत/ इतर खेळ | वाळू/पुस्तके/संगीत/ इतर खेळ |
| G3 - संख्याज्ञान, परिसर आणि विज्ञान | ३५ | IL 9 विविध वस्तू स्पर्श करून ओळखणे<br>IL 15 चित्रातील फरक ओळखा.<br>**(कृतिपत्रिका ५)** | IL 10 परिसरातील फुलांची ओळख<br>IL 15 चित्रातील फरक ओळखा **(कृतिपत्रिका ६)** | IL 4 धान्यांची ओळख<br>IL 26 आजचा आकार (गोल)<br>IL 27 विविध वस्तूंचा वापर करून आकारांची रचना करणे. | IL 4 धान्यांची ओळख<br>IL 26 आजचा आकार (त्रिकोण)<br>IL 27 विविध वस्तूंचा वापर करून आकारांची रचना करणे. | IL 4 धान्यांची ओळख<br>IL 26 आजचा आकार (चौकोन)<br>IL 27 विविध वस्तूंचा वापर करून आकारांची रचना करणे. |

| ध्येय | वेळ (मि.) | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार |
|---|---|---|---|---|---|---|
| G1 - उत्तम आरोग्य व समृद्ध जीवन व कला, सर्जनशीलता आणि सौंदर्यदृष्टीचा विकास | ३५ | HW 11 आमचे नियम<br>HW 26 स्वच्छता – हात धुणे कृती क्रम | HW 5 माझे वेगळेपण<br>HW 7 मला कोणाचे<br>HW 50 मातीकाम | HW 6 माझे कुटुंब<br>HW 59 बोटांचे ठसेकाम | HW 6 माझे कुटुंब<br>HW 59 बोटांचे ठसेकाम | HW 6 माझे कुटुंब<br>**(कृतिपत्रिका ७)**<br>HW 58 पाणी भरूया |
| भोजन | ३० | भोजन | भोजन | भोजन | भोजन | भोजन |
| गोष्ट/गाणे | ०५ | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे |
| G2 - भाषा आणि साक्षरता (तोंडी भाषा लेखन, वाचन) | ३५ | EC 5 नाव सांगणे – विशिष्ट कृतींची नावे<br>EC 31 वाक्यातील शब्द तोडणे–जोडणे.<br>EC 45 सहभागी वाचन 1 | EC 6 मला काही सांगायचे आहे.<br>EC 31 वाक्यातील शब्द तोडणे–जोडणे.<br>EC 45 सहभागी वाचन 2 | EC 41 तोंडी सूचनांचा खेळ – राजा म्हणतो.<br>EC 31 वाक्यातील शब्द तोडणे–जोडणे.<br>EC 47 सहभागी वाचन 3 | EC 41 तोंडी सूचनांचा खेळ – राजा म्हणतो.<br>EC 59 मॅचिंग सेट – चित्र शब्द कार्ड – चित्र चित्र जोडी<br>EC 72 मुक्त चित्र काढणे. | EC 42 चित्र कार्डावरून गोष्ट सांगणे.<br>EC 60 मॅचिंग सेट – चित्र शब्द कार्ड – चित्र शब्द जोडी<br>EC 43 घटनाक्रम |
| G1 - मैदानावरील खेळ | ३० | HW 45 स्टॅच्यू खेळ<br>HW 37 दोरीला लोंबकळणे. | HW 45 स्टॅच्यू खेळ<br>HW 37 दोरीला लोंबकळणे. | HW 34 दोन्ही पायांनी उड्या मारणे.<br>HW 56 चेंडू झेलणे, फेकणे. | HW 34 दोन्ही पायांनी उड्या मारणे.<br>HW 56 चेंडू झेलणे, फेकणे. | HW 45 स्टॅच्यू खेळ<br>HW 34 दोन्ही पायांनी उड्या मारणे. |
| निरोप | ३० | दिवसभरातील उपक्रमांचा आढावा तसेच गाणी, गोष्ट, गप्पा, गोष्ट वाचन, वाचन कोपरा, साहित्य वाचन इ. | | | | |

**महिना : पहिला** **आठवडा : तिसरा**

| ध्येय | वेळ (मि.) | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार |
|---|---|---|---|---|---|---|
| G1 - स्वागत भेट | ३० | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता |
| G1 - मुक्त खेळ | २० | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. |
| G3 - संख्याज्ञान, परिसर आणि विज्ञान | ३५ | IL 11 परिसरातील प्राणी – पाळीव व जंगली प्राणी ओळखणे<br>**(कृतिपत्रिका ८, ९, १०)**<br>IL 28 डोंगराला आग लागली पळा–पळा–पळा | IL12 तरंगणे/बुडणे<br>IL 28 डोंगराला आग लागली पळा–पळा–पळा<br>IL 60 हाताच्या पंजाची बाह्यरेषा | IL12 तरंगणे/बुडणे<br>IL 29 विविध आकारांनुसार वर्गीकरण | IL16 चित्रातली लपलेली चित्रे शोधा.<br>**(कृतिपत्रिका १२, १३)**<br>IL 52 लांब–आखूड/उंच बुटका | IL16 चित्रातली लपलेली चित्रे शोधा.<br>**(कृतिपत्रिका १४, १५)**<br>IL 53 लहान–मोठा ओळखणे. |
| G1 - उत्तम आरोग्य व समृद्ध जीवन व कला, सर्जनशीलता आणि सौंदर्यदृष्टीचा विकास | ३५ | HW 15 तर कसे वाटेल ?<br>HW 51 कागदकाम | HW 16 अक्कू हुई गुस्सा<br>HW 51 कागदकाम | HW 17 भावदर्शक चेहरे<br>**(कृतिपत्रिका ११)**<br>HW 55 हत्तीला शेपूट लावणे | HW 18 गोष्टीत काय झाले ?<br>HW 65 मणी ओवणे | HW 18 गोष्टीत काय झाले ?<br>HW 65 मणी ओवणे |
| भोजन | ३० | भोजन | भोजन | भोजन | भोजन | भोजन |
| गोष्ट/गाणे | ०५ | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे |

| ध्येय | वेळ (मि.) | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार |
|---|---|---|---|---|---|---|
| G2 - भाषा आणि साक्षरता (तोंडी भाषा लेखन, वाचन) | ३५ | EC 42 चित्र कार्डावरून गोष्ट सांगणे.<br>EC 30 वाक्यातील शब्द सुटे करणे.<br>EC 60 मॅचिंग सेट – चित्र शब्द कार्ड – चित्र शब्द जोडी | EC 8 वस्तूवरून गप्पा शिक्षकांनी बोलणे.<br>EC 30 वाक्यातील शब्द सुटे करणे.<br>EC 60 मॅचिंग सेट – चित्र शब्द कार्ड – चित्र शब्द जोडी | EC 9 समूहदर्शक शब्द<br>EC 31 शब्द जोडणे.<br>EC 61 मॅचिंग सेट – चित्र शब्द कार्ड – शब्द शब्द जोडी. | EC 9 समूहदर्शक शब्द<br>EC 31 शब्द जोडणे.<br>EC 61 मॅचिंग सेट–चित्र शब्द कार्ड–शब्द शब्द जोडी. | EC 10 तोंडी शब्द कार्ड सोडविणे.<br>EC 35 शब्दभेंड्या<br>EC 61 मॅचिंग सेट–चित्र शब्द कार्ड–शब्द शब्द जोडी. |
| G1 - मैदानावरील खेळ | ३० | HW 46 संगीत खुर्ची | HW 47 आम्ही सगळे सारखे | HW 46 संगीत खुर्ची | HW 47 आम्ही सगळे सारखे | HW 44 मामाचे पत्र हरवले |
| निरोप | ३० | दिवसभरातील उपक्रमांचा आढावा तसेच गाणी, गोष्ट, गप्पा, गोष्ट वाचन, वाचन कोपरा, साहित्य वाचन इ. | | | | |
| **महिना : पहिला** | | | | | | **आठवडा : चौथा** |
| G1 - स्वागत भेट | ३० | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता |
| G1 - मुक्त खेळ | २० | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. |
| G3 - संख्याज्ञान, परिसर आणि विज्ञान | ३५ | EC 65 क्षेत्रभेट – प्रत्यक्ष भेट | IL54 कृतिपत्रिका–लहान, मोठा, उंच, बुटका<br>**(कृतिपत्रिका १६)**<br>IL 17 चित्रातील अपूर्ण भाग ओळख<br>**(कृतिपत्रिका १७)** | IL13 पाण्याचा रंग आणि विरघळणे<br>IL 18 चित्रातील गमती जमती ओळखा.<br>**(कृतिपत्रिका १८)** | IL13 पाण्याचा रंग आणि विरघळणे<br>IL 36 प्रयोग करू<br>**(कृतिपत्रिका १९)** | IL55 दोन वस्तूंमधील जड–हलकी वस्तू ओळखणे.<br>IL 36 प्रयोग करू<br>**(कृतिपत्रिका २२)** |

| ध्येय | वेळ (मि.) | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार |
|---|---|---|---|---|---|---|
| G1 - उत्तम आरोग्य व समृद्ध जीवन व कला, सर्जनशीलता आणि सौंदर्यदृष्टीचा विकास | ३५ | EC 65 क्षेत्रभेट – प्रत्यक्ष भेट | HW8 आपले मदतनीस<br>HW50 मातीकाम | HW 9 ओळखा कोण?<br>HW 19 मला आज कसे वाटते? | HW 9 ओळखा कोण?<br>HW10 कोलाज काम | HW 24 मी मदत करतो.<br>HW10 कोलाज काम |
| भोजन | ३० | भोजन | भोजन | भोजन | भोजन | भोजन |
| गोष्ट/गाणे | ०५ | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे |
| G2 - भाषा आणि साक्षरता (तोंडी भाषा लेखन, वाचन) | ३५ | EC 66 क्षेत्रभेटीवर चर्चा<br>EC 67 क्षेत्रभेट – मुलांसाठी लिहिणे. | EC 22 जिभेची लगबग<br>EC 32 शब्दांच्या सुरुवातीचा व शेवटचा आवाज ओळखणे.<br>EC 68 क्षेत्रभेट – स्वलिपीतील लेखन | EC 20 गोष्ट सांगणे<br>EC 32 शब्दांच्या सुरुवातीचा व शेवटचा आवाज ओळखणे.<br>EC 40 प्रकट वाचन | EC 20 गोष्ट सांगणे.<br>EC 32 शब्दांच्या सुरुवातीचा व शेवटचा आवाज ओळखणे.<br>**(कृतिपत्रिका २०, २१)**<br>EC 40 प्रकट वाचन | EC 18 शब्द डोंगर<br>EC 34 शब्दांच्या सुरुवातीचा आवाज बदलणे/शेवटचा आवाज बदलणे |
| G1 - मैदानावरील खेळ | ३० | HW 37 दोरीला लोंबकळणे. | HW 40 गमतीचा रस्ता | HW 40 गमतीचा रस्ता | HW 36 गुडघ्यांच्या मध्ये चेंडू धरून चालणे. | HW 33 डोक्यावर वस्तू घेऊन चालणे. |
| निरोप | ३० | दिवसभरातील उपक्रमांचा आढावा तसेच गाणी, गोष्ट, गप्पा, गोष्ट वाचन, वाचन कोपरा, साहित्य वाचन इ. | | | | |

**महिना : दुसरा** **आठवडा : पाचवा**

| ध्येय | वेळ (मि.) | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार |
|---|---|---|---|---|---|---|
| G1 - स्वागत भेट | ३० | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते? | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते? | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते? | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते? | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते? |
| G1 - मुक्त खेळ | २० | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. |
| G3 - संख्याज्ञान, परिसर आणि विज्ञान | ३५ | IL 34 घटनाक्रम **(कृतिपत्रिका २३)**<br>IL 19 एकास एक संगती–पेक्षा जास्त | IL 34 घटनाक्रम **(कृतिपत्रिका २४, २५)**<br>IL 19 एकास एक संगती–पेक्षा जास्त | IL37 चांगले नागरिक **(कृतिपत्रिका २७)**<br>IL 20 एकास एक संगती–पेक्षा कमी | IL35 प्रश्न सोडवू<br>IL 20 एकास एक संगती–पेक्षा कमी | IL35 प्रश्न सोडवू<br>IL 20 एकास एक संगती– जेवढे तेवढे |
| G1 - उत्तम आरोग्य व समृद्ध जीवन व कला, सर्जनशीलता आणि सौंदर्यदृष्टीचा विकास | ३५ | HW 20 आमची कामे<br>HW 52 मुखवटे तयार करणे | HW 20 आमची कामे<br>HW 52 मुखवटे तयार करणे | HW 25 आम्ही भारी<br>HW 54 भिंगरी | HW 25 आम्ही भारी<br>HW 54 भिंगरी | HW 66 कातरकाम **(कृतिपत्रिका २८ व २८ अ)** |
| भोजन | ३० | भोजन | भोजन | भोजन | भोजन | भोजन |
| गोष्ट/गाणे | ०५ | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे |
| G2 - भाषा आणि साक्षरता (तोंडी भाषा लेखन, वाचन) | ३५ | EC 37 श्रवण भेद खेळ<br>EC 36 यमक जुळणारे शब्द सांगा/शोधा.<br>EC 44 गाण्यांचे वाचन | EC 37 श्रवण भेद खेळ<br>EC 36 यमक जुळणारे शब्द सांगा/शोधा.<br>EC 44 गाण्यांचे वाचन | EC 52 वर्गातील वस्तूंच्या नावांचे शब्दकार्ड खेळ–डॉमिनो<br>EC 23 आवडीची गोष्ट वाचणे | EC 23 आवडीची गोष्ट वाचणे | EC 7 मुलाखत<br>EC 73 गोष्टीचे चित्र काढणे |

| ध्येय | वेळ (मि.) | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार |
|---|---|---|---|---|---|---|
| G1 - मैदानावरील खेळ | ३० | HW 31 मूल्य खेळ | HW 31 मूल्य खेळ **(कृतिपत्रिका २६)** | HW 36 गुडघ्यांच्या मध्ये चेंडू धरून चालणे. | HW 35 प्राणी पक्षी व्हावे | HW 37 दोरीला लोंबकळणे. |
| निरोप | ३० | दिवसभरातील उपक्रमांचा आढावा तसेच गाणी, गोष्ट, गप्पा, गोष्ट वाचन, वाचन कोपरा, साहित्य वाचन इ. | | | | |
| **महिना : दुसरा** | | | | | | **आठवडा : सहावा** |
| G1 - स्वागत भेट | ३० | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता |
| G1 - मुक्त खेळ | २० | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. |
| G3 - संख्याज्ञान, परिसर आणि विज्ञान | ३५ | IL 19,20,21 एकास एक संगती<br>IL 59 वस्तूची बाह्यरेखा काढणे. | IL 19,20,21 एकास एक संगती<br>IL 56 तराजू | IL 19,20,21 एकास एक संगती<br>IL 56 तराजू | IL22 विधानांवरून वस्तू मांडून दाखविणे<br>IL57 सूक्ष्मवजन काटा | IL22 विधानांवरून वस्तू मांडून दाखविणे<br>IL57 सूक्ष्मवजन काटा |
| G1 - उत्तम आरोग्य व समृद्ध जीवन व कला, सर्जनशीलता आणि सौंदर्यदृष्टीचा विकास | ३५ | HW 14 रंग कोपरा बनवूया<br>HW 59 बोटांचे ठसेकाम | HW 21 पपेट शो | HW 22 प्रश्न सोडवूया **(कृतिपत्रिका २९)**<br>HW 60 इतर वस्तूंचा वापर करून ठसेकाम | HW 68 तराजू बनविणे | HW 23 मी आज कसा?<br>HW 61 वस्तूंचे ठसेकाम |
| भोजन | ३० | भोजन | भोजन | भोजन | भोजन | भोजन |
| गोष्ट/गाणे | ०५ | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे |

| ध्येय | वेळ (मि.) | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार |
|---|---|---|---|---|---|---|
| G2 - भाषा आणि साक्षरता (तोंडी भाषा लेखन, वाचन) | ३५ | EC 7 मुलाखत<br>EC 24 चित्रवाचन 1<br>EC 74 सूचना ऐकून चित्र काढणे | EC 25 चित्रवाचन 2<br>EC 35 शब्दभेंड्या<br>EC 72 मुक्त चित्र काढणे | EC 25 चित्रवाचन 2<br>EC 31 शब्द तोडणे जोडणे<br>EC 79 मुलांना त्यांच्या आवडत्या पुस्तकाचे बघून/न बघता चित्र काढून त्याबाबत लिहिण्यास सांगावे. | EC 25 चित्रवाचन 2<br>EC 32 शब्दांच्या सुरुवातीचा व शेवटचा आवाज ओळखणे.<br>EC 79 मुलांना त्यांच्या आवडत्या पुस्तकाचे बघून/न बघता चित्र काढून त्याबाबत लिहिण्यास सांगावे. | EC 26 चित्र वाचन–संवाद/गोष्ट गुंफणे<br>EC 29 चित्र वाचन–चित्रावरून गोष्ट लिहिणे. |
| G1 - मैदानावरील खेळ | ३० | HW 40 गमतीचा रस्ता | HW 40 गमतीचा रस्ता | HW 46 संगीत खुर्ची | HW 46 संगीत खुर्ची | HW 45 स्टॅच्यू खेळ |
| निरोप | ३० | दिवसभरातील उपक्रमांचा आढावा तसेच गाणी, गोष्ट, गप्पा, गोष्ट वाचन, वाचन कोपरा, साहित्य वाचन इ. | | | | |
| **महिना : दुसरा** | | | | | | **आठवडा : सातवा** |
| G1 - स्वागत भेट | ३० | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता |
| G1 - मुक्त खेळ | २० | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. |

| ध्येय | वेळ (मि.) | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार |
|---|---|---|---|---|---|---|
| G3 - संख्याज्ञान, परिसर आणि विज्ञान | ३५ | IL 23 दिलेल्या चित्रावरून विधान योग्य की अयोग्य ते ठरविणे. **(कृतिपत्रिका ३०)** IL67 आठवड्याचे वार ओळखा. | IL 23 दिलेल्या चित्रावरून विधान योग्य की अयोग्य ते ठरविणे. **(कृतिपत्रिका ३१)** IL68 महिने ओळखा. | EC 53 पाककृती प्रत्यक्ष पाककृती | IL 31 क्रमवारिता<br>IL 38<br>१० पर्यंत वस्तू मोजणे. (१ ते ५ मोजणे.) | IL 31 क्रमवारिता<br>IL 39<br>१० पर्यंत वस्तू मोजणे. (६ ते १० मोजणे.) |
| G1 - उत्तम आरोग्य व समृद्ध जीवन व कला, सर्जनशीलता आणि सौंदर्यदृष्टीचा विकास | ३५ | HW 27 आरोग्यदायी सवयी<br>HW 64 गाडी तयार करणे | HW 28 योग्य सवयी निवडा. **(कृतिपत्रिका ३२)**<br>HW 64 गाडी तयार करणे | EC 53 पाककृती – प्रत्यक्ष पाककृती | HW 29 पौष्टिक आहार निवडा **(कृतिपत्रिका ३३)**<br>HW58 पाणी भरूया | HW 29 पौष्टिक आहार निवडा **(कृतिपत्रिका ३४)**<br>HW 65 मणी ओवणे |
| भोजन | ३० | भोजन | भोजन | भोजन | भोजन | भोजन |
| गोष्ट/गाणे | ०५ | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे |
| G2 - भाषा आणि साक्षरता (तोंडी भाषा लेखन, वाचन) | ३५ | EC 11 मी कोठे सापडेन<br>EC 34 शब्दांच्या सुरुवातीचा आवाज बदलणे/शेवटचा आवाज बदलणे<br>EC 72 मुक्त चित्र काढणे | EC 12 असे झाले तर काय कराल?<br>EC 34 शब्दांच्या सुरुवातीचा आवाज बदलणे/शेवटचा आवाज बदलणे<br>EC 76 यादी तयार करणे. | EC 54 पाककृती पाककृतीवर चर्चा व कृतीचे लेखन | EC 13 डोळे झाकून वस्तू ओळखणे.<br>EC 55 पाककृती – पाककृतीचे चित्र व स्वलिपीत लेखन | EC 13 डोळे झाकून वस्तू ओळखणे<br>EC 56 पाककृती लेखनप्रकाराची ओळख |
| G1 - मैदानावरील खेळ | ३० | HW 56 चेंडू झेलणे – फेकणे | HW 44 मामाचे पत्र हरवले | HW 36 गुडघ्यांच्या मध्ये चेंडू धरून चालणे. | HW 46 संगीत खुर्ची | HW 45 स्टॅच्यू खेळ |
| निरोप | ३० | दिवसभरातील उपक्रमांचा आढावा तसेच गाणी, गोष्ट, गप्पा, गोष्ट वाचन, वाचन कोपरा, साहित्य वाचन इ. | | | | |

महिना : दुसरा | आठवडा : आठवा

| ध्येय | वेळ (मि.) | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार |
|---|---|---|---|---|---|---|
| G1 - स्वागत भेट | ३० | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता |
| G1 - मुक्त खेळ | २० | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. |
| G3 - संख्याज्ञान, परिसर आणि विज्ञान | ३५ | IL 32 क्रमवारितेची विधाने १<br>IL40 : १० पर्यंत वस्तू मोजणे सराव | IL 32 क्रमवारितेची विधाने १<br>IL40 : १० पर्यंत वस्तू मोजणे सराव | IL 33 क्रमवारितेची विधाने २<br>IL40 : १० पर्यंत वस्तू मोजणे सराव | IL 33 क्रमवारितेची विधाने २<br>IL 41 संख्येची गोष्ट | IL 33 क्रमवारितेची विधाने २<br>IL 42 उलट मोजणी |
| G1 - उत्तम आरोग्य व समृद्ध जीवन व कला, सर्जनशीलता आणि सौंदर्यदृष्टीचा विकास | ३५ | HW 30 चांगला स्पर्श आणि स्पर्श<br>HW 48 कागद फाडणे | HW 9 ओळखा कोण?<br>HW 51 कागदकाम | HW 16 अक्कु हुई गुस्सा<br>HW 49 पानाफुलांची सजावट | HW 18 गोष्टीत काय झाले?<br>HW 50 मातीकाम | HW 30 चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श<br>HW 50 मातीकाम |
| भोजन | ३० | भोजन | भोजन | भोजन | भोजन | भोजन |
| गोष्ट/गाणे | ०५ | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे |
| G2 - भाषा आणि साक्षरता (तोंडी भाषा लेखन, वाचन) | ३५ | EC 14 मी कसा मी कशी? शिक्षक व मुले<br>EC 61 मॅचिंग सेट – चित्र शब्द कार्ड – शब्द शब्द जोडी<br>EC 75 भेट कार्ड तयार करणे आणि शुभेच्छा लिहिणे. | EC 15 मी कसा–मी कशी? गटा–गटात<br>EC 62 मॅचिंग सेट – चित्र शब्द कार्ड–डॉमिनो<br>EC 51 वर्गातील वस्तूंच्या नावांचे शब्दकार्ड खेळ– जोड्या लावणे. | EC 16 मी कसा, मी कशी? सारखे पण वेगळे–वेगळे<br>EC 45 सहभागी वाचन 1<br>EC 57 पाककृती मला आवडणारी | EC 19 गाण्यांचे सादरीकरण<br>EC 46 सहभागी वाचन 2<br>EC 58 पाककृती मला आवडणारी, स्वलिपीत लेखन | EC 22 जिभेची लगबग<br>EC 47 सहभागी वाचन 3<br>EC 80 आवडत्या वस्तूंचे चित्र काढून स्वलिपीत त्या वस्तूबद्दल लिहिणे. |

| ध्येय | वेळ (मि.) | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार |
|---|---|---|---|---|---|---|
| G1 - मैदानावरील खेळ | ३० | HW 46 संगीत खुर्ची | HW 47 आम्ही सगळे सारखे | HW 42 लगोरी | HW 44 मामाचे पत्र हरवले | HW 42 लगोरी |
| निरोप | ३० | दिवसभरातील उपक्रमांचा आढावा तसेच गाणी, गोष्ट, गप्पा, गोष्ट वाचन, वाचन कोपरा, साहित्य वाचन इ. | | | | |
| **महिना : तिसरा** | | | | | | **आठवडा : नववा** |
| G1 - स्वागत भेट | ३० | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते? | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते? | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते? | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते? | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते? |
| G1 - मुक्त खेळ | २० | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. |
| G3 - संख्याज्ञान, परिसर आणि विज्ञान | ३५ | IL 44 गोलावरून चालणे<br>IL 46 मनोऱ्याचा खेळ | IL 44 गोलावरून चालणे<br>IL 46 मनोऱ्याचा खेळ | IL 44 गोलावरून चालणे<br>IL 62 आकृतिबंध – ओळख | IL 44 गोलावरून चालणे<br>IL 63 आकृतिबंध – तयार करा. | IL 44 गोलावरून चालणे<br>IL 63 आकृतिबंध – तयार करा. |
| G1 - उत्तम आरोग्य व समृद्ध जीवन व कला, सर्जनशीलता आणि सौंदर्यदृष्टीचा विकास | ३५ | HW 67 समअंगी चित्र पूर्ण करून रंगवा. **(कृतिपत्रिका ३५)** | HW 10 कोलाज काम | HW 8 आपले मदतनीस | HW 9 ओळखा कोण? | HW 52 मुखवटे तयार करणे |
| भोजन | ३० | भोजन | भोजन | भोजन | भोजन | भोजन |
| गोष्ट/गाणे | ०५ | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे |

| ध्येय | वेळ (मि.) | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार |
|---|---|---|---|---|---|---|
| G2 - भाषा आणि साक्षरता (तोंडी भाषा लेखन, वाचन) | ३५ | EC 21 गोष्टीचे नाटुकले सादर करणे<br>EC 69 अक्षर खेळ – आवाजाची ओळख 'क' | EC 21 गोष्टीचे नाटुकले सादर करणे<br>EC 69 अक्षर खेळ – आवाजाची ओळख 'क' | EC 64 चित्र वाक्य वाचा. **(कृतिपत्रिका ३६)**<br>EC 70 अक्षर खेळ – शब्द टोपली क<br>EC 76 यादी तयार करणे. | EC 18 शब्द डोंगर<br>EC 71 अक्षर खेळ – **(कृतिपत्रिका क्र. ३७)**<br>EC 73 गोष्टीचे चित्र काढणे. | EC 20 गोष्ट सांगणे<br>EC 63 शब्द ओळखा<br>EC 72 मुक्त चित्र काढणे. |
| G1 - मैदानावरील खेळ | ३० | HW 32 सरळ रेषेवरून चालणे<br>HW 38 लोळणे | HW 32 सरळ रेषेवरून चालणे<br>HW 38 लोळणे | HW 40 गमतीचा रस्ता | HW 40 गमतीचा रस्ता | HW 57 बादलीत चेंडू टाकणे |
| निरोप | ३० | दिवसभरातील उपक्रमांचा आढावा तसेच गाणी, गोष्ट, गप्पा, गोष्ट वाचन, वाचन कोपरा, साहित्य वाचन इ. | | | | |
| **महिना : तिसरा** | | | | | | **आठवडा : दहावा** |
| G1 - स्वागत भेट | ३० | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते ? | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते ? | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते ? | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते ? | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते ? |
| G1 - मुक्त खेळ | २० | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. |
| G3 - संख्याज्ञान, परिसर आणि विज्ञान | ३५ | IL 47 काय कमी काय जास्त<br>IL25 कितीने कमी कितीने जास्त | IL 47 काय कमी काय जास्त<br>IL25 कितीने कमी कितीने जास्त | EC 65 क्षेत्रभेट–प्रत्यक्ष भेट | IL 64 आकृतिबंध– **(कृतिपत्रिका ३९)**<br>IL 50 किती रुपये | IL 64 आकृतिबंध– ओळखा (परिसरातले)<br>IL 61 जोड्या लावा. **(कृतिपत्रिका ४०)** |

| ध्येय | वेळ (मि.) | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार |
|---|---|---|---|---|---|---|
| G1 - उत्तम आरोग्य व समृद्ध जीवन व कला, सर्जनशीलता आणि सौंदर्यदृष्टीचा विकास | ३५ | HW 21 पपेट शो | HW 64 गाडी तयार करणे. | HW 66 क्षेत्रभेटीवर चर्चा | HW 30 चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श | HW 52 मुखवटे तयार करणे |
| भोजन | ३० | भोजन | भोजन | भोजन | भोजन | भोजन |
| गोष्ट/गाणे | ०५ | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे |
| G2 - भाषा आणि साक्षरता (तोंडी भाषा लेखन, वाचन) | ३५ | EC 48 गोष्ट पूर्ण करूया<br>EC 69 अक्षर खेळ आवाजाची ओळख 'म' | EC 49 गोष्ट तयार करूया.<br>EC 69 अक्षर खेळ – आवाजाची ओळख 'म'<br>EC 73 गोष्टीचे चित्र काढणे. | EC 67 क्षेत्रभेट–मुलांसाठी लिहिणे.<br>IL 64 आकृतिबंध – कृतिपत्रिका **(कृतिपत्रिका ३८)** | EC 70 अक्षर खेळ शब्द टोपली 'म'<br>EC 68 क्षेत्रभेट – स्वलिपीतील लेखन | EC 71 अक्षर खेळ– कृतिपत्रिका 'म' **(कृतिपत्रिका ४१)**<br>EC 75 भेट कार्ड तयार करणे आणि शुभेच्छा लिहिणे. |
| G1 - मैदानावरील खेळ | ३० | HW 43 योगा | HW 43 योगा | HW 43 योगा | HW 43 योगा | HW 43 योगा |
| निरोप | ३० | दिवसभरातील उपक्रमांचा आढावा तसेच गाणी, गोष्ट, गप्पा, गोष्ट वाचन, वाचन कोपरा, साहित्य वाचन इ. | | | | |
| **महिना : तिसरा** | | | | | | **आठवडा : अकरावा** |
| G1 - स्वागत भेट | ३० | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते? | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते? | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते? | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते? | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता<br>HW 19 मला आज कसे वाटते? |
| G1 - मुक्त खेळ | २० | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. |

| ध्येय | वेळ (मि.) | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार |
|---|---|---|---|---|---|---|
| G3 - संख्याज्ञान, परिसर आणि विज्ञान | ३५ | IL 58 दोन वस्तूंमधील सामावून घेण्याच्या क्षमतांची तुलना व पाण्याच्या बाटलीची धारकता | IL 58 दोन वस्तूंमधील सामावून घेण्याच्या क्षमतांची तुलना व पाण्याच्या बाटलीची धारकता | IL 58 दोन वस्तूंमधील सामावून घेण्याच्या क्षमतांची तुलना व पाण्याच्या बाटलीची धारकता | IL 66 निष्कर्ष काढणे **(कृतिपत्रिका ४२)** IL 48 तोंडी गणिते–संच वाढणे | IL 66 निष्कर्ष काढणे **(कृतिपत्रिका ४४)** IL 48 तोंडी गणिते – संच वाढणे |
| G1 - उत्तम आरोग्य व समृद्ध जीवन व कला, सर्जनशीलता आणि सौंदर्यदृष्टीचा विकास | ३५ | HW 55 हत्तीला शेपूट लावणे. | HW 53 रांगोळी काढणे | HW 53 रांगोळी काढणे | HW 62 दोरीकाम | HW 62 दोरीकाम |
| भोजन | ३० | भोजन | भोजन | भोजन | भोजन | भोजन |
| गोष्ट/गाणे | ०५ | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे |
| G2 - भाषा आणि साक्षरता (तोंडी भाषा लेखन, वाचन) | ३५ | EC 48 गोष्ट पूर्ण करूया<br>EC 69 अक्षर खेळ आवाजाची ओळख<br>EC 28 चित्रवाचन – स्वलिपीत वर्णन लिहिणे. | EC 49 गोष्ट तयार करूया.<br>EC 69 अक्षर खेळ – आवाजाची ओळख 'न'<br>EC 72 मुक्त चित्र काढणे. | EC 70 अक्षर खेळ– शब्द टोपली 'न'<br>EC 80 आवडत्या वस्तूचे चित्र काढून स्वलिपीत त्या वस्तूबद्दल लिहिणे. | EC 71 अक्षर खेळ<br>**(कृतिपत्रिका ४३)** 'न'<br>EC 72 मुक्त चित्र काढणे | EC 70 अक्षर खेळ– शब्द टोपली (म.क.न.)<br>EC 81 आवडत्या व्यक्तीचे चित्र काढून स्वलिपीत आवडत्या व्यक्तीबद्दल लिहिणे. |
| G1 - मैदानावरील खेळ | ३० | HW 41 अडथळ्यांची शर्यत | HW 42 लगोरी | HW 41 अडथळ्यांची शर्यत | HW 42 लगोरी | HW 41 अडथळ्यांची शर्यत |
| निरोप | ३० | दिवसभरातील उपक्रमांचा आढावा तसेच गाणी, गोष्ट, गप्पा, गोष्ट वाचन, वाचन कोपरा, साहित्य वाचन इ. | | | | |
| **महिना : तिसरा** | | | | | | **आठवडा : बारावा** |
| G1 - स्वागत भेट | ३० | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता. | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता | HW 12 स्वागत, गीत, प्रार्थना<br>IL 1 हवामान तक्ता<br>HW 13 आमची दैनंदिनी हजेरी तक्ता |

| ध्येय | वेळ (मि.) | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार |
|---|---|---|---|---|---|---|
| G1 - मुक्त खेळ | २० | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. | विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. २० ते २२ नुसार मुक्त खेळाचे नियोजन करावे. |
| G3 - संख्याज्ञान, परिसर आणि विज्ञान | ३५ | IL 49 तोंडी गणिते – संच कमी/संचातील फरक | IL 49 तोंडी गणिते – संच कमी/संचातील फरक | IL 51 बाजार | IL 45 काहीच शिल्लक नाही<br>IL 30 अनेक गुणधर्मानुसार वर्गीकरण | IL 43 दिनदर्शिकेनुसार सुलट–उलट संख्या मोजणे<br>IL 30 अनेक गुणधर्मानुसार वर्गीकरण<br>**(कृतिपत्रिका ४५ व ४६)** |
| G1 - उत्तम आरोग्य व समृद्ध जीवन व कला, सर्जनशीलता आणि सौंदर्यदृष्टीचा विकास | ३५ | HW 63 बिया चिकटवून चित्रे | HW 63 बिया चिकटवून चित्रे | HW 51 कागदकाम | HW 51 कागदकाम | HW 51 कागदकाम |
| भोजन | ३० | भोजन | भोजन | भोजन | भोजन | भोजन |
| गोष्ट/गाणे | ०५ | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे | गोष्ट/गाणे |
| G2 - भाषा आणि साक्षरता (तोंडी भाषा लेखन, वाचन) | ३५ | EC 77 स्वतःचे पुस्तक बनविणे<br>EC 78 हवामान बघून त्याचे चित्र काढणे. त्याचे वर्णन स्वलिपीत लिहिणे. | EC 77 स्वतःचे पुस्तक बनविणे<br>EC 78 हवामान बघून त्याचे चित्र काढणे. त्याचे वर्णन स्वलिपीत लिहिणे. | EC 6 मला काही सांगायचे आहे<br>EC 23 आवडीची गोष्ट वाचणे.<br>EC 78 हवामान बघून त्याचे चित्र काढणे. त्याचे वर्णन स्वलिपीत लिहिणे. | EC 9 समूहदर्शक शब्द<br>EC 23 आवडीची गोष्ट वाचणे.<br>EC 78 हवामान बघून त्याचे चित्र काढणे. त्याचे वर्णन स्वलिपीत लिहिणे. | EC 11 मी कोठे सापडेल<br>EC 78 हवामान बघून त्याचे चित्र काढणे. त्याचे वर्णन स्वलिपीत लिहिणे. त्याचे सादरीकरण. |
| G1 - मैदानावरील खेळ | ३० | HW 43 योगा | HW 46 संगीत खुर्ची | HW 43 योगा | HW 46 संगीत खुर्ची | HW 43 योगा |
| निरोप | ३० | दिवसभरातील उपक्रमांचा आढावा तसेच गाणी, गोष्ट, गप्पा, गोष्ट वाचन, वाचन कोपरा, साहित्य वाचन इ. | | | | |

# १०) ध्येयानुसार कृतींबाबत मार्गदर्शक सूचना

## (G1) ध्येय १ - मुलांचे उत्तम आरोग्य व स्वास्थ्य (Goal 1 - Health and Well being)

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| HW 3.1 : स्वतःची व इतरांची शारीरिक वैशिष्ट्ये, लिंग, रुची, पसंती–नापसंती यांचे वर्णन करतो. | **कृती क्र. १ : अवयवांची ओळख**<br>१) स्वतःच्या एका अवयवावर हात ठेवून अवयवाचे नाव उच्चारा. विद्यार्थ्यांनाही तसेच करायला सांगा. जसे, डोक्यावर हात ठेवून म्हणा 'डोके', पायावर हात ठेवून म्हणा 'पाय'.<br>२) विद्यार्थ्यांना सूचना द्या 'मी अवयवाचे नाव सांगतो, तुम्ही त्या अवयवावर हात ठेवा.' सर्व विद्यार्थी योग्य अवयवावर हात ठेवत आहेत याकडे लक्ष ठेवा. | – | १ |
| | **कृती क्र. २ : अवयवांची कामे व गप्पा**<br>१) आपले अवयव कोणकोणती कामे करतात त्यावर चर्चा करूया. उदा. माझे हात लिहितात. असे म्हणून लिहिण्याची कृती करून दाखवा.<br>२) प्रत्येक विद्यार्थ्याला एका अवयवाचे नाव व त्याच अवयवाचे कार्य सांगण्यासाठी प्रोत्साहन द्या, मदत करा. मुलांना सांगता आले नाही, तर योग्य प्रश्न विचारा. 'तू जेवतोस कशाने' 'भांग कशाने पाडतोस'.<br>एखादी वस्तू उचलण्यासाठी तू कोणता अवयव वापरतोस?<br>गाणे ऐकण्यासाठी तू कोणता अवयव वापरतोस?<br>३) एखादया विद्यार्थ्याला एखादा अवयव नसल्यास ते कशा पद्धतीने काम करीत असतील? हे मुलांना विचारावे. विद्यार्थ्यांच्या कल्पना ऐकून घ्याव्यात. त्यांनी अशी एखादी व्यक्ती पाहिली आहे का असे विचारून त्यांचे अनुभव ऐकून घ्यावेत.<br>४) एखादा अवयव नसतानाही इतर अवयवांच्या साहाय्याने उत्तम आयुष्य जगता येऊ शकते या चर्चेकडे विद्यार्थ्यांना आणायचे आहे हे लक्षात ठेवावे.<br>**विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (CWSN) :** विद्यार्थ्यास बोलण्यास अडचण असेल तर दर्शविण्यास, कृती करून दाखविण्यास सांगावे. | – | १ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| HW 3.1 : स्वत:ची व इतरांची शारीरिक वैशिष्ट्ये, लिंग, रुची, पसंती–नापसंती यांचे वर्णन करतो. | **कृती क्र. ३ : नेहमीपेक्षा वेगळे**<br>विद्यार्थ्यांना त्यांचे हात/पाय, एक एक अवयव वेगळ्या पद्धतीने वापरून दाखविण्यास सांगावे. जसे – पायाने चालतो त्याऐवजी पायाने रंगकाम करतो याचा अभिनय करावा. इत्यादी. | – | १ |
| | **कृती क्र. ४ : मित्र ओळख**<br>१) मुलांना रिंगणात बसवावे.<br>२) आज आपण आपल्या मित्र–मैत्रिणींबद्दल गप्पा मारणार आहोत.<br>३) मुलांनी बोलते व्हावे यासाठी विविध प्रकारचे प्रश्न आपापसात विचारण्यास सांगावे जसे की, १) तुमच्या मित्राला/मैत्रिणीला खाण्याचे कोणते पदार्थ आवडतात? २) रंग कोणता आवडतो? ३) तुला कोणते फळ आवडते? यांसारखे प्रश्न विचारून मुलांना बोलते करावे.<br>४) कृतिपत्रिकेवरील सूचना वाचून दाखवावी व संख्येनुसार गट करून/जोड्यांमध्ये कृती करण्यास सांगावे.<br>५) या खेळात विद्यार्थ्यांनी इतरांशी संवाद साधणे, आपली व दुसऱ्यांची आवडनिवड, समजून घेणे महत्त्वाचे आहे.<br>**विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (CWSN) :** ज्या विद्यार्थ्यांना चार मित्र शोधणे अवघड जाईल, त्यांनी एक मित्र शोधला तरी ते मान्य करावे. | कृतिपत्रिका क्र. ३ | १ |
| | **कृती क्र. ५ : माझे वेगळेपण**<br>१) एका रिकाम्या खोक्याच्या तळाशी एक आरसा ठेवावा. ते खोके बंद करून ठेवावे.<br>२) विद्यार्थ्यांना सूचना देऊन खोक्यात काय आहे ते पाहण्यास सांगावे. विद्यार्थ्यांनी पाहावे व आपल्या जागेवर बसावे. कुणाशी बोलू नये. सर्व विद्यार्थ्यांचे पाहून झाल्यानंतर प्रत्येकाला तू खोक्यात काय पाहिलेस? तुला काय वाटले? हे विचारावे.<br>३) नंतर शिक्षकांनी सांगावे, की प्रत्येक मूल विशेष असते व त्या खोक्यात दिसणारी विशेष गोष्ट म्हणजे तुम्ही स्वत: आहात. प्रत्येकामध्ये काहीना–काही विशेष असते. हे शिक्षकांनी लक्षात आणून द्यावे. | | २ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| | ४) सर्व विद्यार्थ्यांना आपल्या आवडीचे खाद्य पदार्थ, रंग, खेळ इत्यादी विचारावे व ही जाणीव करून द्यावी, की प्रत्येकाच्या आवडीनिवडी वेगवेगळ्या असतात. | | |
| HW 3.2 : विस्तारित कुटुंबातील सदस्यांसह शाळापूर्व नात्याची समज व्यक्त करतो. | **कृती क्र. ६ : माझे कुटुंब**<br>१) विद्यार्थ्यांना रिंगणात बसवावे.<br>२) आज आपण आपल्या घरात कोण कोण आहेत याबाबत गप्पा मारणार आहोत, असे सांगावे. विद्यार्थ्यांना त्यांच्या घरी कोण कोण आहे हे विचारून आजी, आजोबा इ. नात्यांना त्यांच्या भाषेत काय म्हणतात हे विचारावे. उदा. काका कोणाला म्हणतात हे मुलांना सांगायचे आहे.<br>३) त्यानंतर कृतिपत्रिका ७ देऊन त्यांना त्यात घरातील व्यक्तींची चित्रे काढायला व त्यांची स्वलिपीत नावे लिहिण्यास सांगावे. | कृतिपत्रिका क्र. ७ | २ |
| | **कृती क्र. ७ : मला कोणाचे काय आवडते?**<br>विद्यार्थ्यांना गोलात बसवावे. तुमच्या कुटुंबामध्ये कोण-कोण आहे? हे विचारावे. तसेच घरातील सदस्यांची नावे विद्यार्थ्यांना विचारावी. तुमच्या घरातील आई, बाबा, आजी, आजोबा, ताई, दादा यांची कोणती गोष्ट आपल्याला आवडते याविषयी दोन मिनिटे विचार करण्यास सांगावे. यासाठी एखादे उदाहरण द्यावे. जसे की –<br>आईच्या हातची पुरणपोळी आवडते.<br>विद्यार्थ्यांना विचार करण्यास वेळ दिल्यानंतर घरातील उर्वरित सदस्यांची कोणती गोष्ट आवडते याबाबत प्रश्न विचारून मुलांना बोलते करावे.<br>जसे की – आजी गाणी म्हणते ते मला आवडते. काकू विणकाम खूप छान करते. आबा ढोलकी मस्त वाजवतात. | – | २ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| HW 3.2 : विस्तारित कुटुंबातील सदस्यांसह शाळापूर्व नात्याची समज व्यक्त करतो. | **कृती क्र. ८ : आपले मदतनीस**<br>१) आपल्याला कोण कोण मदत करते? जसे की आपल्याला एस. टी ने गावाला जायचे असेल तर कोणाची मदत होते? असा प्रश्न विचारून सुरुवात करता येईल. विद्यार्थ्यांना गाडी चालक/वाहक यांच्याबद्दल बोलते करून अजून इतर मदतनिसांबद्दल गप्पा मारता येतील.<br>२) गावातील एखादी व्यक्ती/पालक यांच्यापैकी कोणी पोस्टमन, डॉक्टर, पोलीस, कंडक्टर असे असल्यास त्यांना वर्गात मुलाखतीसाठी बोलविता येईल.<br>३) शिक्षकांनी विद्यार्थ्यांबरोबर चर्चा करून मुलाखतीसाठीचे प्रश्न एका छोट्या कागदावर लिहिण्यास सुरुवात करावी. कागद विद्यार्थ्यांना दिसेल असा भिंतीवर लावून या प्रश्नामध्ये आपण भर घालू शकतो याची विद्यार्थ्यांना कल्पना द्यावी. | आपले मदतनीस चित्र तक्ता | ४, ९ |
| | **कृती क्र. ९ : ओळखा कोण?**<br>१) दोन गटांमध्ये हा खेळ घेता येईल.<br>एक गट कोडे सांगेल, दुसरा गट मदतनीस ओळखेल. उदा. आजारी पडल्यावर मी ज्याच्याकडे जातो व गोळ्या, इंजेक्शन देतो तो कोण? असे कोडे विचारावे.<br>२) दैनंदिन काम करत असताना एखादी अडचण आली, तर तुम्ही कोणाची मदत घ्याल? उदा. चप्पल तुटली तर......., माठ घ्यायचा आहे तर......<br>**विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (CWSN) :** काही विद्यार्थ्यांना कदाचित हे करता येणार नाही. त्यांना इतरांनी मदत करावी. | | |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| HW 3.3 : कृती करताना स्वावलंबन दर्शवितो. | **कृती क्र. १० : कोलाज काम**<br>१) विद्यार्थ्यांना गोलाकार बसवावे व पुढील कोलाज कामाचा एक नमुना त्यांना करून दाखवावा.<br>२) तीन–चार छोटे पाठकोरे किंवा पेन्सिलने लिहिलेले कागद घ्यावेत. तेलखडूने प्रत्येक कागदाला एक एक रंग द्यावा. नंतर त्या कागदांचे मध्यम आकाराचे तुकडे करावेत. एका फुलस्केप एवढ्या कागदावर ते रंगीत तुकडे चिकटवून कोलाज काम करून निसर्गचित्र किंवा वस्तूचे चित्र बनवावे. विद्यार्थ्यांना सांगावे, की प्रत्येकाने वेगळे चित्र बनवायचे आहे. दुसऱ्या पेक्षा आपले चित्र वेगळे हवे. हे करताना तीन–चार मुलांच्या गटात तेलखडू, खळ एकत्रित द्यावी. सगळ्यांनी मिळून वापरायचे आहे. दुसऱ्याचे कागद घ्यायचे नाहीत. गरज असल्यास विचारून घ्यावेत अशा सूचना द्याव्यात.<br>३) प्रत्येक विद्यार्थी आपापला विचार करून कोलाजकाम करतो ना याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे. वस्तूंचा वापर करताना एकमेकांना मदत करतात का, मदत हवी असल्यास कशाप्रकारे मागतात याकडेही शिक्षकांनी बारकाईने लक्ष द्यावे. | कागद, खळ किंवा डिंक तेलखडू | ४. ९ |
| HW 3.4 : नियमांचे आणि सूचनांचे एकावेळी पालन करतो. | **कृती क्र. ११ : आमचे नियम**<br>विद्यार्थ्यांशी बोलून वर्गात पाळायचे नियम सोप्या भाषेत तयार करावेत. एका तक्त्यावर लिहून मुलांना दिसेल अशा ठिकाणी लावावेत.<br>जसे : खेळून झाल्यावर खेळणी जागेवर ठेवू.<br>आपली पिशवी व पाण्याची बाटली ठरलेल्या ठिकाणी रांगेत ठेवू.<br>**विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (CWSN) :** नियम अधिक स्पष्ट करण्यासाठी त्यांना चित्र स्वरूपात दाखवावे. जसे : पिशव्या ठेवायच्या ठिकाणी रांगेत ठेवलेल्या पिशव्या व बाटल्यांची रांग असे चित्र चिकटवावे. | तक्ता व स्केच पेन | २ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
| --- | --- | --- | --- |
| HW 3.5 : नियमित/दैनंदिन वेळापत्रकात झालेल्या कोणत्याही बदलाशी समायोजन साधतो. | **कृती क्र. १२ : करूया स्वागत**<br>१) वर्गाच्या दरवाज्याजवळ उभे राहून विद्यार्थी वर्गात प्रवेश करीत असताना विविध प्रकारांनी त्यांचे स्वागत करावे.<br>२) स्वागतासाठी विविध पद्धतींचा वापर करावा.<br>उदा : टाळी देणे, नमस्कार करणे, हसून स्वागत करणे, मिठी मारणे, हस्तांदोलन करणे इत्यादी, अशा विविध पद्धती वापरून स्वागत करावे. | | १, २, ३, ४, ५ |
| | **कृती क्र. १३ : आमची दैनंदिनी**<br>१) दर आठवड्याचे वेळापत्रक (आपण आठवड्यात काय काय करणार आहोत त्याचा तक्ता) लिहून ठेवावे.<br>२) रोज सुरुवातीला आज काय काय करणार हे विद्यार्थ्यांना तक्ता वाचून सांगावे. आज कोणते गाणे म्हणणार, कोणता खेळ खेळणार हे नमूद करावे.<br>३) उपक्रमाची सुरुवात गाण्याने करावी. (संपली वेळ स्वागताची – आता वेळ गोष्टीची – संपली वेळ गोष्टीची – आता वेळ खेळाची)<br>– उपक्रमाचा एक–एक टप्पा संपल्यानंतर गाणे घ्यावे.<br>**विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (CWSN) :** वेळापत्रक अधिक स्पष्ट करण्यासाठी त्यांना चित्र स्वरूपात दाखवावे. जसे : परिपाठाची वेळ दाखविण्यासाठी गोलात बसलेल्या बाई व विद्यार्थ्यांचे चित्र काढता येईल. जेवणाच्या वेळेला जेवणाच्या ताटाचे चित्र व विद्यार्थी ओळीने जेवायला बसले आहेत असे चित्र काढता येईल. | | १, २ |
| HW 3.6 : इतरांनी दिलेले काम/घटक पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करतो. | **कृती क्र. १४ : रंग कोपरा बनवूया**<br>१) विद्यार्थ्यांचे तीन गट करावेत. त्यांना तीन रंग ठरवून दयावेत. (किंवा त्यांना निवडायला सांगावेत. त्या रंगांच्या वस्तू जमवून त्या वस्तू त्या त्या कोपऱ्यात ठेवण्यास सांगावे. जसे : लाल कोपरा, हिरवा कोपरा इ.<br>२) त्यासाठी विद्यार्थ्यांना एक दिवसाचा वेळ द्यावा. जसे आज गट केल्यास दुसऱ्या दिवशी त्यांनी त्यांचा कोपरा सजवायचा आहे. | घोटीव कागद | ६ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| | ३) तयारीसाठी आवश्यक वस्तू उपलब्ध करून द्यायच्या आहेत. जसे : वस्तू मांडण्यासाठी टेबल, कागद, रंग, दोरा इ.<br>४) शक्य असल्यास शिक्षकांनी हा उपक्रम घेण्याआधी एका रंगाचा कोपरा तयार करून दाखवावा. | | |
| HW 3.7 : शाब्दिक व अशाब्दिक पद्धतीने भावना व्यक्त करतो. (हावभाव दर्शविणारी चित्रे) | **कृती क्र. १५ : तर कसे वाटेल?**<br>१) विद्यार्थ्यांना वेगवेगळे प्रसंग सांगून, त्यांना त्याविषयी काय वाटले हे एका वाक्यात सांगायला सांगावे. जसे : माझा ड्रेस फाटला. – मुले उत्तर देतील. मला वाईट वाटेल, रडू येईल./ मला भीती वाटेल, आई ओरडेल म्हणून/ मला राग येईल/ आनंद होईल, नवा ड्रेस मिळेल म्हणून.. इ.<br>२) विद्यार्थ्यांची सर्व उत्तरे स्वीकारावीत. त्यांमागील कारण सांगण्यास मुलांना प्रोत्साहित करावे. गरज पडल्यास त्यांना कारण शोधून सांगण्यास मदत करावी.<br>३) आपल्या सगळ्यांना वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या भावना जाणवत असतात. आपल्याला नक्की काय वाटते हे ओळखता येणे, शब्दांत मांडता येणे महत्त्वाचे. हे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवायचे आहे.<br>**विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (CWSN) :** काही प्रसंगचित्रे वापरून विद्यार्थ्यांना बोलण्यास मदत करावी. | मुलांच्या भावविश्वाशी निगडित विविध प्रसंगांची यादी | ३ |
| | **कृती क्र. १६ : अक्कू हुई गुस्सा**<br>ही गोष्ट मुलांना सांगावी व या कथेतील मुलगी जशी तिचा राग चित्रातून व्यक्त करते तशी तुम्ही कोणतीही एक भावना चित्रातून दाखवायची आहे. विद्यार्थ्यांना चित्र काढण्यास द्यावे.<br>जसे : तुम्हांला आनंद कशाने होतो? | https://storyweaver.org.in/stories/13861-akku-hui-guss?mode=read<br>(शिक्षकांनी सदर लिंकद्वारे गोष्ट ऐकावी व नंतर विद्यार्थ्यांना सांगावी. | |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| HW 3.7 : शाब्दिक व अशाब्दिक पद्धतीने भावना व्यक्त करतो. (हावभाव दर्शविणारी चित्रे.) | **कृती क्र. १७ : भावदर्शक चेहरे**<br>१) कृतिपत्रिकेत दिलेल्या चेहऱ्यांमध्ये वेगवेगळ्या भावना काढण्यास विद्यार्थ्यांना मदत करावी.<br>२) तसेच चेहरे दुसऱ्या स्वतंत्र कागदावर काढून ते छोटे–छोटे चेहरे कापून त्याला खाली काठी चिकटवावी. आता प्रत्येकाजवळ प्रत्येक भावनेचा एक चेहरा असेल. या मार्गदर्शिकेच्या शेवटी चेहऱ्यावरील वेगवेगळ्या भावना दिल्या आहेत त्याचा वापर करावा. | कृतिपत्रिकेतील चेहरे, मुखवटे व कृतिपत्रिका क्र. ११ | ३ |
| | **कृती क्र. १८ : गोष्टीत काय झाले?**<br>आता प्रत्येकाकडे विविध भावना दर्शविणारे चेहरे असतील. विद्यार्थ्यांना एखादी गोष्ट सांगत मध्येच थांबून, 'त्याला कसे वाटले असेल? तुमच्या जवळचा चेहरा उचलून दाखवा' असे सांगावे. जसे : एक म्हातारी आजीबाई होती. ती एकटीच रहायची. तिला तिच्या लेकीची खूप आठवण येत होती. (येथे थांबून तिला कसे वाटत असेल? मला वाटते तिला खूप वाईट वाटत असेल. असे सांगून शिक्षकांनी त्यांच्या जवळील दु:खी चेहरा उचलून दाखवावा. विद्यार्थ्यांनाही दाखविण्यास सांगावे.) तिने ठरविले लेकीला भेटायला जायचे. पण वाटेत खूप घनदाट जंगल होते. (तिला काय वाटत असेल रे? असे विचारावे व दिलेल्या चेहऱ्यांपैकी एक उचलून दाखविण्यास सांगावे.) अशा प्रकारे गोष्ट पुढे न्यावी.<br>**विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (CWSN) :** काही विद्यार्थ्यांना एखादी भावना पुन्हा पुन्हा वर्णन करून सांगावी लागेल. | विविध भावना दर्शविणारे छोटे चेहरे मुखवटे | ३, ८ |
| | **कृती क्र. १९ : मला आज कसे वाटते?**<br>हजेरी तक्त्याशेजारीच मुलांना त्यांच्या मन:स्थिती (मूड) नुसार, त्यांना आज कसे वाटते दर्शविणारा चेहरा चिकटविण्यास जागा द्यावी.<br>**विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (CWSN) :** विद्यार्थ्यांची भावनिक व मानसिक स्थिती समजून घेण्यासाठी ही अत्यंत उपयोगी कृती आहे. एखादा विद्यार्थी सतत दु:खी, रागावलेला किंवा निराश असतो का याकडे लक्ष द्यावे. काही समस्यांमधून, भावनिक | विविध भावना दर्शविणारे छोटे चेहरे, हजेरी तक्ता– चेहरे रोज बदलता येतील अशी सोय असलेला तक्ता (रबर बँड लावता | ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| | उलघालीतून जाणाऱ्या विद्यार्थ्यांना वेळीच शोधता येईल. असेही काही विद्यार्थी असू शकतात, ज्यांना स्वतःच्या भावना ओळखता येत नाहीत किंवा नीटशा मांडता येत नाहीत. असे विद्यार्थी आढळल्यास त्यांच्याबरोबर स्वतंत्रपणे काम करावे. | येईल किंवा वेलक्रोचा वापर करता येईल.) | |
| HW 3.8 : जबाबदारी घेतो आणि स्वतःची रुची आणि पसंतीनुसार निवड करतो. | **कृती क्र. २० : आमची कामे**<br>शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वर्गातील काही कामे वाटून द्यावीत. दर आठवड्याला कामे बदलावीत व दर आठवड्याची कामे व जबाबदार व्यक्ती यांची यादी वर्गात फळ्याशेजारी लावून ठेवावी.<br>जसे : विद्यार्थ्यांच्या चपला रांगेत आहेत ना हे बघणे. – राज, संदीप<br>गणितपेटीतील सामान जागेवर ठेवणे. – मीना, रोहन इ.<br>जेवणाआधी हातावर साबण देणे व पाणी ओतणे. – मंजू, रेवा इ. | वर्गातील कामांची यादी, पेपर व स्केचपेन, चिकटपट्टी | ५ |
| HW 3.9 : समस्येवर उपाय सुचवितो व वयानुरूप समायोजन करतो. | **कृती क्र. २१ : पपेट शो**<br>पपेटस्‌द्वारे गोष्ट सांगताना काही काल्पनिक समस्या निर्माण करून, विद्यार्थ्यांना आता काय करावे असे विचारून गोष्ट पूर्ण करता येईल. जसे : संगीता आणि मंजू मैत्रिणी आहेत. त्या खूप खेळतात, पण आज त्यांचे काही तरी बिनसले आहे. दोघींनाही एकाच वेळेला ठोकळे खेळायचे आहेत. | पपेट (गोष्टीला अनुसरून) | ६, १० |
| | **कृती क्र. २२ : प्रश्न सोडवूया**<br>कृतिपत्रिकेत दिलेल्या प्रसंगावर विद्यार्थ्यांसोबत चर्चा करावी. दिलेली समस्या कशी सोडविता येईल? यावर चर्चा करावी. त्यानंतर विद्यार्थ्यांना कृतिपत्रिका सोडविण्यास सांगावी व चर्चा करावी. | कृतिपत्रिका क्र. २९ | ६ |
| HW 3.10 : खेळ व आंतरक्रिया दरम्यान दुसऱ्यांच्या कल्पनांचा समावेश करण्याबाबत इच्छा दर्शवितो. | **कृती क्र. २३ : मी आज कसा?**<br>रोज ५ मुलांना समोर बोलावून मी आज काय चांगले केले?<br>मी कोणाला कशी मदत केली? त्याबाबत मुलांशी बोलावे? | | ६ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| | ३) चांगल्या केलेल्या कामासाठी चांदणी देता येईल व दर पंधरा दिवसांनी कोणाकडे किती चांदण्या झाल्या हे सर्वांना दाखवून कौतुक करता येईल. | | |
| HW 3.11 : लहान व मोठ्या गटात कृती करताना, मदतीची गरज असणाऱ्या वर्ग मित्रांना मदत करतो. | **कृती क्र. २४ : मी मदत करतो**<br>१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना रिंगणात बसवून घ्यावे.<br>२) शिकारी, कबुतर व मुंगीच्या गोष्टी सारख्या गोष्टी ऐकवून चर्चेला सुरुवात करता येईल. आठवड्यातून एकदा अशी चर्चा घेता येईल.<br>३) आठवड्याभरात कोणाला काय मदत केली, हे प्रत्येक मुलाला सांगण्यास सांगावे.<br>४) तुम्ही आईला, मित्र–मैत्रिणींना, शिक्षकांना, शेजाऱ्यांना मदत केल्यानंतर त्यांना व तुम्हांला कसे वाटले याविषयी चर्चा घडवून आणावी.<br>५) पुढील आठवड्यात कोणाला काय मदत करणार हे सर्वांसमोर सांगावे.<br>६) ही चर्चा एखाद्या पालक सभेत घेता येईल व पालकांची शाळेत काय मदत घेता येईल हे ठरविता येईल. जसे : क्षेत्रभेटी दरम्यान, एखादा खेळ बनविण्यासाठी, काही दुरूस्ती करण्यासाठी इ.<br>**विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (CWSN) :** गरज असल्यास या कृतीबाबत पालकांशी संवाद साधावा व विद्यार्थ्यांना जी कामे/मदत करायची असेल ती करण्यास वाव देण्यास सांगावे. | | ४ |
| HW 3.12 : विशेष गरजा असणाऱ्या मुलांसह विविध पार्श्वभूमीतून आलेल्या मुलांप्रति संवेदनशीलता आणि स्वीकारार्हता दर्शवितो. | **कृती क्र. २५ : आम्ही भारी**<br>विद्यार्थ्यांना कण्णा पन्ना, पकडा त्या मांजराला अशा गोष्टी वाचून दाखवाव्यात. | https://youtu.be/pAGwZ_JAM8c?si=FYW2SMIH8Gp_BK6L | ५ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| HW 3.13 : मूलभूत आरोग्य, स्वच्छता, स्वच्छता विषयक सवयी आणि खाण्याच्या आरोग्यदायी सवयींचे अधिक स्वतंत्रपणे पालन करतो आणि दर्शवितो. | **कृती क्र. २६ : हात धुणे – कृती क्रम**<br>१) हाताच्या स्वच्छतेचे महत्त्व लक्षात घेऊन, हात धुण्याच्या कृती विशिष्ट क्रमाने विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिकासह करून घ्याव्यात.<br>२) अधिक मनोरंजक व्हावे म्हणून हात धूत असताना 'हात धुण्याचे गाणे' कृतियुक्त गाण्यास सांगावे.<br>३) वेळच्या वेळी हात धुण्याचे महत्त्व समजावून सांगावे. | साबण, पाणी<br>नॅपकीन | २ |
| HW 3.13 : मूलभूत आरोग्य, स्वच्छता, स्वच्छता विषयक सवयी आणि खाण्याच्या आरोग्यदायी सवयींचे पालन करतो आणि दर्शवितो. | **कृती क्र. २७ : आरोग्यदायी सवयी**<br>१) आरोग्यदायी सवयींना अनुसरून विद्यार्थ्यांशी संवाद साधावा. या सवयी विद्यार्थी प्रत्यक्षात अमलात आणतात की नाही हे गप्पांच्या माध्यमातून जाणून घ्यावे.<br>२) आरोग्यदायी सवयीदर्शक चित्रतक्ता दाखवून, या सवयींचे महत्त्व विद्यार्थ्यांना अनौपचारिकपणे सांगावे. 'सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंतची दिनचर्या' यावर विद्यार्थ्यांशी गप्पा माराव्यात.<br>जसे : जेवणापूर्वी व जेवणानंतर हात स्वच्छ धुणे, जेवणानंतर चूळ भरणे, सकाळी लवकर उठणे, नियमित व्यायाम करणे, सकस आहार घेणे. इत्यादी...<br>**विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (CWSN) :** या सवयींचा चित्ररूप तक्ता विद्यार्थ्यांना दिसेल अशा ठिकाणी लावून ठेवावा. | आरोग्यदायी सवयीदर्शक चित्रतक्ता<br>कृतिपत्रिका क्र. ३२ | ७ |
| | **कृती क्र. २८ : योग्य सवयी निवडा**<br>स्वच्छतेच्या सवयींविषयी तोंडी खेळ घ्यावा. एका गटाने अवयवाचे नाव सांगावे/वस्तूचे नाव सांगावे व दुसऱ्या गटाने कशाने स्वच्छता करतो हे सांगावे.<br>जसे : कंगवा–केस, साबण–पूर्ण अंग. | | ७ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| | **कृती क्र. २९ : पौष्टिक आहार निवडा**<br>कृतिपत्रिकेत दिल्यानुसार विद्यार्थ्यांना कोणते अन्न निवडावे यावर खुणा करू द्याव्यात. त्यानंतर ते का निवडले, ते का नाही निवडले याबाबत मुलांना विचारावे. ही कृती दोन दोनच्या जोड्यांमध्ये देखील करता येईल. मुलांना एकमेकांना कारण सांगण्यास सांगावे. | कृतिपत्रिका क्र. ३३, ३४. | ७ |
| HW 3.14 : चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श यांतील फरक समजतो आणि अनोळखी व्यक्तींशी अंतर ठेवून वागतो. सावध राहतो. | **कृती क्र. ३० : चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श**<br>१) पोस्टरच्या/मोबाईलच्या साहाय्याने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चांगले स्पर्श कोणते वाईट स्पर्श कोणते या बद्दल मोकळेपणाने चर्चा करावी.<br>२) विद्यार्थ्यांना हे सांगताना/ दाखविताना विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया काय आहे, याचे बारकाईने निरीक्षण करावे. | व्हिडिओ लिंक Good Touch Bad Touch Copyright Podar Jumbo Kids - YouTube https://youtu.be/EZAV4uvefis | ८, ८, १० |
| HW 3.15 : घरी, अंगणवाडी, बालवाडी आणि मैदानावर सुरक्षेच्या मूलभूत नियमांचे पालन करतो. | **कृती क्र. ३१ : मूल्य खेळ**<br>१) सापशिडीत दिलेल्या चित्रांवर चर्चा करा व त्यानंतर सापशिडीप्रमाणे तो खेळ खेळायला सांगा. | मूल्य खेळाचा बोर्ड गेम, सोंगटी, फासे, कृतिपत्रिका क्र. २६ | ५ |
| HW 3.16 : योग्य समन्वय, नियंत्रण आणि शक्तीसह स्थूलकारक कौशल्यांचा वापर करतो. | **कृती क्र. ३२ : सरळ रेषेवरून चालणे**<br>१) प्रथम सर्व विद्यार्थ्यांना वर्गखोलीच्या एका बाजूला बसवावे.<br>२) वर्गखोलीच्या मध्यभागी समांतर अशा प्रकारे सरळ रेषा आखाव्या.<br>३) दोन ओळीत विद्यार्थ्यांना बोलावून त्यांना रेषांवरून चालत जायला सांगावे.<br>४) चालताना विद्यार्थी त्यांच्या एका पायाच्या अंगठ्याला दुसऱ्या पायाची टाच लावून चालत आहे की नाही हे बघावे. | | ३, ९ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| | ५) अशा प्रकारे सर्व विद्यार्थ्यांना रेषेवरून चालण्याची संधी द्यावी.<br>**विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (CWSN) :** जर का विद्यार्थी तोल सांभाळू शकत नसेल किंवा सतत पडत असेल, खेळात सहभागी होण्यास नकार देत असेल किंवा हात पाय दुखतात, इतर अवयव दुखतात अशी तक्रार करत असेल, तर पालकांशी चर्चा करावी, अधिक माहिती जाणून घ्यावी. तसेच विशेष प्रशिक्षण असणाऱ्या शिक्षकांशी संपर्क साधावा. | | |
| | **कृती क्र. ३३ : डोक्यावर वस्तू घेऊन चालणे**<br>मुलांना डोक्यावर पुस्तक, कंपासपेटी अशी एखादी छोटी वस्तू घेऊन तोल सांभाळत (ती वस्तू पडू न देता) सरळ रेषेत चालण्यास सांगावे. | | ४, ७ |
| | **कृती क्र. ३४ : दोन्ही पायांनी उड्या मारणे**<br>वर्गामध्ये गोल आखावेत. मुलांना सूचना द्यावी. एका वेळी एका गोलावरून दुसऱ्या गोलावर दोन्ही पायांवर उडी मारा. अशा प्रकारे सर्व गोलांवर एका वेळी ५ ते ६ विद्यार्थ्यांना ही कृती करण्यास द्यावी. | | २ |
| HW 3.16 : योग्य समन्वय, नियंत्रण आणि शक्तीसह स्थूलकारक कौशल्यांचा वापर करतो. | **कृती क्र. ३५ : प्राणी पक्षी व्हावे**<br>प्राण्यापक्ष्यांसारख्या हालचाली करायला सांगणे. जसे : बेडूक उडी, ससा उडी, बदका सारखे चाला, हत्तीसारखे चाला, अळी सारखे चाला, सापा सारखे सरपटत जा इ. | | ५ |
| HW 3.17 : संगीत आणि हालचालयुक्त कृतींमध्ये सक्रियपणे आणि सर्जनशीलपणे सहभाग घेतो आणि त्यात स्वत:करिता संधी शोधतो. | **कृती क्र. ३६ : गुडघ्यांच्या मध्ये चेंडू धरून चालणे**<br>१) विद्यार्थ्यांना दोन्ही गुडघ्यांमध्ये मध्यम आकाराचा चेंडू धरून तो पडू न देता चालण्यास सांगावे. | चेंडू | ४, ५, ७ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| | **कृती क्र. ३७ : दोरीला लोंबकळणे**<br>१) दाराच्या चौकटीला एक हुक लावून घ्यावा.<br>२) त्याला जमिनीपासून २-३ फूट वर येईल अशी दोरी बांधावी.<br>३) त्या दोरीला खाली एक गाठ बांधावी व मधे-मधे एक दोन गाठी माराव्यात. गाठींचा आधार घेऊन मुलांना लोंबकळण्यास सांगावे. एका वेळी एकाच मुलाने ही कृती करावयाची आहे.<br>४) शाळेजवळ वडाचे पारंब्या असलेले झाड असल्यास ही कृती शिक्षकांच्या देखरेखीखाली तिथेच घ्यावी. | दोरी | २, ४, ५ |
| | **कृती क्र. ३८ : लोळणे**<br>१) हा उपक्रम घेण्याआधी वर्ग स्वच्छ झाडलेला असावा.<br>२) जमिनीवर सतरंजी अंथरावी व मुलांना त्यावर झोपून एका जागेवरून दुसऱ्या जागेवर लोळत जाण्यास सांगावे. | | १, ९ |
| | **कृती क्र. ३९ : रेषांवरून चालणे**<br>१) जमिनीवर सरळ, तिरप्या, नागमोडी, वर्तुळाकार अशा विविध प्रकारच्या रेषा आखाव्यात. प्रथम विद्यार्थ्यांना मुक्तविचार करू द्यावा. मग प्रात्यक्षिक करून दाखवावे.<br>२) त्यानंतर त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना त्या रेषांवरून चालण्यास प्रेरित करावे. मुलांचा आनंद वृद्धिंगत होण्यासाठी याला खेळाचे, स्पर्धेचे स्वरूप देता येईल. ही कृती करत असताना दोरीचा उपयोग केला तरी चालेल. | फक्की किंवा खडू टप्पे | १ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| HW 3.16 : योग्य समन्वय, नियंत्रण आणि शक्तीसह स्थूलकारक कौशल्यांचा वापर करतो. | **कृती क्र. ४० : गमतीचा रस्ता**<br>फरशीवर मोठा खेळ आखावा, ज्यामध्ये विविध कृती ओळीने करण्यास दिल्या असतील. जसे : दोन पायांनी उड्या मारत चौकोनातून या. मग पाच बेडूक उड्या मारत गोलात जा. मग लंगडी घालत त्रिकोणात या. इ. नमुन्यादाखल एक खेळ शिक्षक मार्गदर्शिकेत दिला आहे; तो खेळ जमिनीवर आखून मुलांना खेळण्यास द्यावा. (शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. १२१)<br>**विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (CWSN) :** विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यास इतर विद्यार्थी मैदानावर खेळत असताना वर्गात एकटेच बसू देऊ नये. | खडू, फरशी | १, ४, ६, ९ |
| | **कृती क्र. ४१ : अडथळ्यांची शर्यत**<br>१) शिक्षकांनी वर्गात किंवा मैदानात काही वस्तू ठेवून अडथळ्यांचा रस्ता तयार करावा व विद्यार्थ्यांना तो पार करत शेवटपर्यंत पोहचावयास सांगावे.<br>२) पुढील प्रकारचे अडथळे तयार करता येतील. जसे : दोरी खालून सरपटत जाणे, खुर्चीवर चढून मग खाली उडी मारून जाणे, रस्त्यात ठेवलेले दगड गोळा करत ठेवलेल्या बादलीत टाकून मग पुढे पळणे इ.<br>३) एक एक वेळा खेळून अडथळे लक्षात आल्यावर समान रस्ता तयार करून दोन मुलांमध्ये शर्यत घेता येईल. | अडथळ्यांसाठी विविध वस्तू | ११ |
| | **कृती क्र. ४२ : लगोरी**<br>लगोरीचा खेळ घ्यावा. | चेंडू, लगोरी | ८ |
| | **कृती क्र. ४३ : योगा**<br>शिक्षकांनी विद्यार्थ्यांना काही साधी सोपी आसने शिकवावीत. जसे : ताडासन, पद्मासन, भुजंगासन, वज्रासन इ. | | १०, १२ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| HW 3.16 : योग्य समन्वय, नियंत्रण आणि शक्तीसह स्थूलकारक कौशल्यांचा वापर करतो. | **कृती क्र. ४४ : मामाचं पत्र हरवलं**<br>१) शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना गोलाकार बसवावे.<br>२) गोलाकार बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी एका विद्यार्थ्याकडे रुमाल किंवा छोटे कापड द्यावे.<br>३) त्यानंतर ज्या विद्यार्थ्याकडे रूमाल किंवा कापड आहे, त्या विद्यार्थ्याला 'मामाचं पत्र हरवलं' असे मोठ्याने म्हणण्यास सांगून गोलाकार बसलेल्या विद्यार्थ्यांच्या पाठीमागून पळण्यास सांगावे.<br>४) तो विद्यार्थी रूमाल किंवा छोटे कापड घेऊन पळत असताना शिक्षकांनी मधेच अचानकपणे शिट्टी वाजवावी.<br>५) शिट्टी वाजविल्यानंतर लगेचच ज्या विद्यार्थ्याकडे रूमाल/कापड आहे त्या विद्यार्थ्याने थांबावे व ज्या विद्यार्थ्याच्या मागे तो थांबला असेल त्याच्या पाठीमागे तो रुमाल ठेवून पळावे.<br>६) ज्या विद्यार्थ्याच्या मागे..रुमाल/कापड ठेवलेले असेल, त्याने रूमाल उचलून आधीच्या विद्यार्थ्यास पकडायचा प्रयत्न करावा परंतु बाद करण्याच्या आधी तो आधीचा मुलगा रिकाम्या जागी येऊन बसल्यास नवीन विद्यार्थ्यावर 'राज्य' आले असे समजून त्याने खेळ पुढे खेळावा. | रुमाल/कापड | ३, ७, ८ |
| HW 3.17 : संगीत आणि हालचालयुक्त कृतींमध्ये सक्रियपणे आणि सर्जनशीलपणे सहभाग घेतो आणि त्यात स्वत:करिता संधी शोधतो. | **कृती क्र. ४५ : स्टॅच्यू खेळ**<br>१) विद्यार्थ्यांना संगीत ऐकवावे.<br>२) या संगीतावर विद्यार्थ्यांना नृत्य करण्यास सांगावे.<br>३) संगीत अचानक थांबल्यावर विद्यार्थ्यांना आहे त्या स्थितीत थांबण्यास सांगावे.<br>४) थोड्या वेळाने पुन्हा संगीत सुरू करून हीच कृती सुरू ठेवावी.<br>५) विद्यार्थ्यांना नृत्याचा आणि विविध स्टॅच्यू स्थितीचा आनंद उपभोगू द्यावा. | मोबाईल,<br>खंजिरी,<br>टेपरेकॉर्डर | ३, ७, ८ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| HW 3.17 : संगीत आणि हालचालयुक्त कृतींमध्ये सक्रियपणे आणि सर्जनशीलपणे सहभाग घेतो आणि त्यात स्वत:करिता संधी शोधतो. | **कृती क्र. ४६ : संगीत खुर्ची**<br>१) एका रांगेत विरुद्ध दिशांना तोंड करून खुर्च्या मांडाव्यात.<br>२) या खेळात खेळाडूंपेक्षा एक खुर्ची कमी ठेवावी. उदा. ६ खेळाडू असल्यास ५ खुर्च्या ठेवाव्यात.<br>३) खेळाडूंना खुर्च्यांच्या समोर उभे राहण्यास सांगावे. संगीत सुरू झाल्यानंतर त्यांना पळण्यास सांगावे. संगीत थांबल्यानंतर त्यांनी खुर्च्यावर बसणे अपेक्षित आहे. ज्या खेळाडूला खुर्ची मिळणार नाही तो खेळाडू खेळातून बाद होईल.<br>४) या खेळात प्रत्येक वेळी एक खुर्ची कमी करत जावी. याप्रकारे हा खेळ एक खुर्ची शिल्लक असेपर्यंत घ्यावा. या खुर्चीमध्ये शेवटी बसलेल्या खेळाडूला विजेता घोषित करावे.<br>**विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (CWSN) :** जे विद्यार्थी हा खेळ खेळण्यास नकार देत असतील किंवा इच्छुक नाहीत असे वाटेल त्यांच्याशी बोलावे. त्यांना काय वाटते ते समजून घेऊन मदत करावी. | खुर्च्या, टेपरेकॉर्डर, मोबाईल किंवा इतर वाद्ये | ३, ६, ८, ११ |
| | **कृती क्र. ४७ : आम्ही सगळे सारखे**<br>विद्यार्थ्यांना गोलाकार उभे करावे. गोलामध्ये एक छोटा गोल काढावा. त्यात स्वत: उभे राहून सांगावे, की या गोलात जो उभा असेल त्याच्या सारखेच आपण हुबेहूब वागायचे. तो जे बोलेल, करेल तेच करायचे. सुरूवातीला शिक्षकांनी आपल्यापासून सुरुवात करावी. वेगवेगळ्या कृती कराव्यात/वेगवेगळ्या भूमिका घ्याव्या त्याचप्रमाणे सर्व मुलांना एकदम करायला सांगावे. जसे : शिक्षक उड्या मारतील/भाजीवाली होऊन भाजी घ्या.. म्हणत अभिनय करतील, तर सर्व मुलांनी लगेच तसेच करणे अपेक्षित आहे. पूर्ण वर्गाचा वापर करत, मुक्त हालचाली करत हा खेळ घ्यावा. एकदा खेळ मुलांच्या लक्षात आला, की वेगवेगळ्या मुलांना गोलात उभे करून त्यांना खेळाचे नेतृत्व करण्यास सांगावे. | | |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| HW 3.18 (अ) : स्पष्टता व नियंत्रणासह सूक्ष्मकारक कौशल्य दर्शवितो. | **कृती क्र. ४८ : कागद फाडणे**<br>१) मुलांना वर्गात गोलाकार बसवावे. शाळेतील निरुपयोगी असलेले सर्व कागद प्रत्येक मुलाला वाटून द्यावे.<br>२) त्यानंतर कागद फाडण्याच्या विविध पद्धतींनी कागद फाडायला लावावे. उदा. दोन बोटांनी कागद फाडणे. त्यानंतर सर्व फाडलेले कागद एकत्र करून एक चेंडू तयार करावा.<br>३) विद्यार्थ्यांना गोलात उभे करून चेंडू फेकणे व चेंडू झेलणे हा खेळ घ्यावा. चेंडू कोणीही कोणाकडे फेकू शकेल, याप्रमाणे सूचना दयावी म्हणजे विद्यार्थी खेळामध्ये लक्षपूर्वक सहभागी होतील. | उपयोगात नसलेले कागद | ८ |
| | **कृती क्र. ४९ : पानाफुलांची सजावट**<br>१) घरासमोर स्वच्छ अंगणात आई रोज रांगोळी काढत असते, हे बऱ्याच विद्यार्थ्यांना माहीत असते. त्याचप्रमाणे आपली शाळा आणि वर्ग सुंदर ठेवण्याची जबाबदारी आपली आहे याची जाणीव विद्यार्थ्यांना द्यावी. यासाठी दररोज गटानुसार परिसरात उपलब्ध असलेल्या झाडांची पाने आणि फुले यांची सजावट करण्यास सांगावे.<br>२) त्यांच्या सजावटीत त्रुटी न काढता कौतुकाची थाप द्यावी. पाने तोडत असताना ती झाडाच्या प्रकारानुसार आवश्यक तेवढीच तोडावी याबाबत सूचना द्याव्यात. | पाने, फुले | ८ |
| | **कृती क्र. ५० : मातीकाम**<br>विद्यार्थ्यांना लाल/काळी चिकट माती किंवा बाजारात मिळणारा क्ले किंवा शाडूची माती यांपैकी उपलब्ध कोणतेही साहित्य द्यावे. त्यापासून विविध वस्तू बनविण्यास प्रोत्साहन व मोकळीक द्यावी. | लाल चिकट माती, क्ले किंवा शाडूची माती | २, ४, ८ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| HW 3.18 (अ) : स्पष्टता व नियंत्रणासह सूक्ष्मकारक कौशल्ये दर्शवितो. | **कृती क्र. ५१ : कागदकाम**<br>रद्दी कागदापासून पुढील कृती विद्यार्थ्यांना करण्यास सांगाव्यात. यासाठी कृतींचे प्रात्यक्षिक दाखवावे.<br>– कागदाची दरवाजाची घडी घालणे.<br>– कागदाची रुमाली घडी घालणे.<br>– कागदाची त्रिकोणी घडी घालणे.<br>– हाताने कागद फाडणे.<br>– कागदाचा चेंडू तयार करणे,<br>– कागदाची गुंडाळी करणे. | रद्दी कागद | ३, ८ |
| | **कृती क्र. ५२ : मुखवटे तयार करणे**<br>१) पेपर डिशवर प्राण्यांच्या चेहऱ्यांचे आकार काढावेत.<br>२) रंगीत स्केचपेननी चेहरे रंगवावेत.<br>३) दोन्ही बाजूंनी कानांत अडकविण्यासाठी रबर किंवा दोरा अडकवावा.<br>४) विद्यार्थ्यांना चेहऱ्यावर मुखवटा लावण्यास सांगावे. | पेपर डिश, पेन, पेन्सिल, स्केच पेन, रबर, दोरा | ५, ९, १० |
| | **कृती क्र. ५३ : रांगोळी काढणे**<br>१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना रांगोळी/बारीक वाळू देऊन त्यापासून विविध प्रकारची नक्षी काढण्यास प्रोत्साहन द्यावे. | रांगोळी | ७, ११ |
| | **कृती क्र. ५४ : भिंगरी**<br>१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना भिंगरी कशाप्रकारे फिरवावी हे दाखवावे.<br>२) भिंगरी हातात घेऊन ती जमिनीवर फिरविण्याचा सराव करून घ्यावा.<br>३) एखाद्या विद्यार्थ्यास भिंगरी तयार करता येत असल्यास, त्याला आवश्यक साहित्य देऊन वर्गात प्रात्यक्षिक करून दाखविण्यास सांगावे. विद्यार्थ्यांकडून भिंगरीशी संबंधित गीते म्हणवून घ्यावीत. | साहित्य – पुठ्ठा, रंग, छोटी काडी | ५ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| HW 3.18 (अ) : स्पष्टता व नियंत्रणासह सूक्ष्मकारक कौशल्य दर्शवितो. | **कृती क्र. ५५ : हत्तीला शेपूट लावणे**<br>१) मुलांना अर्धगोलात बसवावे.<br>२) फलकावर शेपटी नसलेल्या एका हत्तीचे चित्र काढावे.<br>३) त्यानंतर एकेका विद्यार्थ्याला समोर बोलावून, त्याच्या डोळ्याला एखादा रूमाल किंवा पट्टी बांधावी व नंतर फलकापासून थोड्या अंतरावर उभे करून त्याला फलकावरील हत्तीस शेपूट काढण्यास सांगावे.<br>४) हाच खेळ कधी एखाद्या चेहऱ्याच्या चित्रावर टिकली लावणे असाही घेता येईल. | रुमाल/कापडी पट्टी | ११ |
| | **कृती क्र. ५६ : चेंडू झेलणे-फेकणे**<br>विविध आकारांच्या चेंडूने झेलणे-फेकणे हा खेळ घ्यावा.<br>खेळ संपल्यावर मुलांना गोलात बसण्यास सांगावे. चेंडू पकडण्यासाठी काय काय करावे लागते ते विचारावे. | चेंडू | २, ७ |
| | **कृती क्र. ५७ : बादलीत चेंडू टाकणे**<br>१) विद्यार्थ्यांना मैदानामध्ये किंवा घरामध्ये विशिष्ट अंतरावर उभे राहून रिकाम्या बादलीत चेंडू फेकण्यास सांगावे. या कृतीसाठी तीन संधी दयाव्यात.<br>२) रिकाम्या बादलीत चेंडू पडल्यास विद्यार्थ्यास शाबासकी द्यावी.<br>३) या कृतीविषयीचा अनुभव विद्यार्थ्याला विचारावा. | रिकामी बादली, चेंडू, टप्पे | १, ८ |
| HW 3.18 (ब) : अतिशय गुंतागुंतीच्या कार्याकरिता समन्वयीत हालचालींचा उपयोग करतो. जसे : रेषेपासून कापणे, पाणी ओतणे, बटण लावणे. | **कृती क्र. ५८ : पाणी भरूया**<br>१) यासाठी घरात किंवा वर्गात उपलब्ध असणाऱ्या साधनांचा वापर करावा.<br>२) सुरुवातीला बादलीत पाणी घेऊन ग्लासने पाणी बाटलीत भरण्यास सांगावे.<br>३) नंतर ती बादली रिकामी करून तांब्याने पाणी बाटलीत भरण्यास सांगावे.<br>४) वरील दोन्ही कृतींवर आधारित प्रश्न विचारावेत.<br>५) त्याच बाटलीत चमच्याने पाणी भरल्यास काय होईल? यासारखे विचारप्रवर्तक प्रश्न विचारावेत.<br>पाणी जपून भरायचे आहे. कमीत कमी सांडायचे अशी सूचना द्यावी. | ग्लास, तांब्या, बाटली, बादली व उपलब्ध असणारी इतर साधने | २, ७ |

| | | | |
|---|---|---|---|
| HW 3.18 (ब) : अतिशय गुंतागुंतीच्या कार्याकरिता समन्वयीत हालचालींचा उपयोग करतो. जसे : रेषेपासून कापणे, पाणी ओतणे, बटण लावणे. | **कृती क्र. ५९ : बोटांचे ठसेकाम**<br>१) विद्यार्थ्यांना गोलाकार बसवावे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ठसेकामाचा एक नमुना करून दाखवावा.<br>२) प्रत्येक तीन ते चार विद्यार्थ्यांमध्ये एक रंगाची वाटी ठेवावी.<br>३) प्रत्येक विद्यार्थ्याला रंगात बोट बुडवून ठसे उमटवायला सांगावेत.<br>४) विद्यार्थ्यांना ठशाला आकार देता येतो का ते बघावे. ठसे वाळल्यानंतर नमुन्यादाखल ठशाला वेगळा आकार देऊन दाखवावा. नंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनेनुसार ठशापासून फुलपाखरू, वाघ इ. बनवून द्यावे.<br>५) कधी ठशांची रचना करण्याचा उपक्रम घ्यावा. | साहित्य – वाटी, कागद, रंग, स्पंज. | २, ६ |
| | **कृती क्र. ६० : इतर वस्तूंचा वापर करून ठसेकाम**<br>१) विद्यार्थ्यांना गोलाकार बसवावे.<br>२) प्रत्येक तीन ते चार विद्यार्थ्यांमध्ये एक रंगाची वाटी ठेवावी.<br>३) प्रत्येक विद्यार्थ्याला त्यादिवशी ठरविलेला आकार/वस्तू रंगात बुडवून ठसे करण्यास सांगावे.<br>४) त्यातून काही चित्र किंवा विशिष्ट नक्षी करण्यास सुचवावे. | वाटी, रंग, कागद, विविध आकाराचे स्पंज/भेंडीचे तुकडे/कांद्याचे गोल काप/ झाडांची विविध आकारांची पाने/ दोऱ्याचे रिकामे रीळ इ. | ६ |
| | **कृती क्र. ६१ : वस्तूंचे ठसेकाम**<br>१) किल्ली, कंगवा किंवा नाणी यांपैकी एक वस्तू पेन्सिल, रंगीत खडू व कागद विद्यार्थ्यांना द्यावा.<br>२) कागदाखाली वस्तू ठेवून त्यावरून खडू घासावयास सांगावे.<br>३) अशाप्रकारे विद्यार्थ्यांना आवडेल त्या वस्तूचे ठसे घ्यावयास सांगावे. | किल्ली, कंगवा, नाणी, रंगीत खडू, पेन्सिल कागद इ. | ६ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| HW 3.18 (ब) : अतिशय गुंतागुंतीच्या कार्याकरिता समन्वयीत हालचालींचा उपयोग करतो. जसे : रेषेपासून कापणे, पाणी ओतणे, बटण लावणे. | **कृती क्र. ६२ : दोराकाम**<br>१) विद्यार्थ्यांना गोलाकार बसवावे. मुलांना एक चित्र करून दाखवावे.<br>२) एक कोरा कागद घेऊन मधोमध दुमडावा. एक मध्यम जाडीचा दोरा किंवा लोकर रंगात (पातळ रंग) बुडवून घ्यावा. कागदाच्या घडीच्या मधोमध ठेवावा. कागद दुमडून हाताने दाबून हाताने दोरा खालून ओढून बाहेर काढावा. आता घडी उलगडून बघितल्यास दोऱ्यांमुळे कागदावर समअंगी रंगीत चित्र तयार झालेले दिसेल.<br>३) या नंतर विद्यार्थ्यांना तीन/चार च्या गटात बसवून आवश्यक साहित्य देऊन असे चित्र काढण्यास मदत करावी. | दोरा, पाणी, रंग, कागद | ११ |
| | **कृती क्र. ६३ : बिया चिकटवून चित्र**<br>१) विद्यार्थ्यांना झाडाखाली पडणाऱ्या विविध बिया किंवा कलिंगडाच्या बिया इ. जमा करून आणण्यास सांगावे व बिया चिकटवून, थोडा कापूस, वाळलेले गवत चिकटवून त्यापासून चित्र बनविण्यास प्रोत्साहन द्यावे. | बिया, कापूस इ., कागद, फेविकॉल | १२ |
| HW 3.18 (क) : चित्रकला आणि लेखनासाठी बसवावे. साधने पकडण्यासाठी व हाताळण्यासाठी चिमट्याची पकड वापरतो. | **कृती क्र. ६४ : गाडी तयार करणे**<br>१) रिकाम्या आगपेटीचे खोके घेऊन त्याला दोरा बांधावा.<br>२) या खोक्याला चाकं म्हणून जुन्या शर्टची बटणे लावावीत.<br>३) ही कृती करताना/गाडीची सजावट करताना विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य द्यावे. | रिकाम्या आगपेटीचे खोके, चिकट–पट्टी, दोरा, बटणे इत्यादी. | ७, १० |
| | **कृती क्र. ६५ : मणी ओवणे**<br>१) विद्यार्थ्यांना गोलाकार बसवावे. प्रत्येक दोन विद्यार्थ्यांमध्ये मणी ठेवलेली एकेक वाटी द्यावी.<br>२) शिक्षकांनी दोन दोन मणी कसे ओवायचे ते ओवून दाखवावे. नंतर विद्यार्थ्यांना ओवण्यास द्यावे.<br>३) विद्यार्थ्यांना मणी ओवण्याचा पुरेसा सराव झाल्यावर विशिष्ट रंगांचे मणी ओवायला सांगावे.<br>४) काही विशिष्ट आकृतिबंध दाखवून त्याप्रमाणे मणी ओवण्यास सांगावे.<br>जसे : विद्यार्थ्याला दोन लाल दोन पांढरे दोन लाल दोन पांढरे असे मणी ओवून दाखवावे, मग विचारावे. | मध्यम आकाराचे मणी, प्लॅस्टिकची दोरी, वाटी. | ३, ७ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| HW 3.18 (क) : चित्रकला आणि लेखनासाठी बसवावे. साधने पकडण्यासाठी व हाताळण्यासाठी चिमट्याची पकड वापरतो. | आता कोणते मणी ओवायचे? मुलाने लाल असे सांगितले, तर पुढे त्याला करण्यास द्यावे. आकृतिबंध लक्षात न आल्यास आधी ओवलेले मणी परत दाखवत आकृतिबंध लक्षात आणून द्यावा व पुढे ओवण्यास द्यावे.<br>५) असे वेगवेगळे आकृतिबंध मणी ओवताना मुलांना देता येतील. | | ५, १० |
| | **कृती क्र. ६६ : कातरकाम**<br>कृतिपत्रिकेत दिलेले आकार रंगवून नंतर ते कापून कृतिपत्रिकेत दिलेल्या चित्राप्रमाणे दुसऱ्या स्वतंत्र कागदावर चिकटवून चित्र तयार करावे. | तेलखडू, खळ, कात्री, पाठकोरे/कोरे कागद कृतिपत्रिका क्र. २८ व २८ अ | ९ |
| | **कृती क्र. ६७ : समअंगी चित्र पूर्ण करून रंगवा**<br>कृतिपत्रिका ३५ प्रमाणे इतर काही चित्रांचा सराव विद्यार्थ्यांना देता येईल. | रंगीत पेन्सिल/ तेलखडू, कृतिपत्रिका क्र. ३५ | ९ |
| | **कृती क्र. ६८ : तराजू बनविणे**<br>सोबत दिलेल्या व्हिडिओमध्ये दाखविल्याप्रमाणे मुलांना खेळण्यातला तराजू बनविण्यास मदत करावी. लिंबाच्या सालांचा, काड्यापेटीच्या पेटीचा किंवा बाटलीच्या झाकणांचा छोटासा तराजू बनविण्यास मुलांना मदत करावी. | https://youtu.be/BpnqHss7Okl?si=5C2xCYGBWVzyiHpM | ६ |

## (G2) ध्येय २ : मुले प्रभावी संवादक बनतात. (Goal 2 - Effective Communicator Language)

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.1 शाळेमध्ये किंवा घरी अनोळखी व्यक्ती, शिक्षक, नवीन मित्र, शाळेचे कर्मचारी आणि इतर प्रौढ व्यक्तींबरोबर स्वत:च्या भाषेमध्ये संभाषण करण्याचा प्रयत्न करतो. | **कृती क्र. १ : कानगोष्टी, शब्द, वाक्य**<br>विद्यार्थ्यांना गोलाकार बसवून कानगोष्टीचा खेळ घ्यावा. सांगितलेल्या शब्दाचे चित्र दाखवून सांगितलेला शब्द शेवटपर्यंत बरोबर पोहोचला का हे बघावयास सांगावे, तर कधी शेवटी तो शब्द किंवा वाक्य फळ्यावर लिहून दाखवावे.<br>**विशेष गरज असणाऱ्या मुलांसाठी (CWSN) :** ज्या विद्यार्थ्यांना कमी ऐकू येत असेल, अशा विद्यार्थ्यांपासून सुरुवात करता येईल. शब्द सांगताना सुरुवातीला त्यांना चित्रदेखील दाखविल्यास अधिक स्पष्टता येईल. | फळा, खडू | १ |
| | **कृती क्र. २ : नाव सांगणे – स्वत:चे**<br>शिक्षक विद्यार्थ्यांसोबत गोलात उभे राहून हा खेळ खेळतील.<br>१) गोलामधे उभे राहून एकमेकांकडे चेंडू टाकत जायचे. ज्या विद्यार्थ्याकडे चेंडू येईल त्याने स्वत:चे नाव सांगावे.<br>२) कधी ज्याच्याकडे चेंडू टाकू त्याचे नाव चेंडू टाकणाऱ्याने सांगावे.<br>३) कधी ओळीने एकेकाच्या नावाची भर टाकत सर्वांची नावे सांगावीत.<br>उदा. : पहिला मुलगा – संतोष दुसरी मुलगी – संतोष, मीनल<br>तिसरा मुलगा – संतोष, मीनल, रवी | चेंडू | १ |
| | **कृती क्र. ३ : नावे सांगणे – फळांचे/फुलांचे/रंगांची**<br>शिक्षक विद्यार्थ्यांसोबत गोलात उभे राहून हा खेळ खेळतील. कधी फळांची, फुलांची, रंगांची नावे घेऊ शकतात.<br>गोलामध्ये उभे राहून एकेकाकडे चेंडू टाकत जायचे. ज्या विद्यार्थ्याकडे चेंडू येईल त्याने नाव सांगावे. | चेंडू | १ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.1 शाळेमध्ये किंवा घरी अनोळखी व्यक्ती, शिक्षक, नवीन मित्र, शाळेचे कर्मचारी आणि इतर प्रौढ व्यक्तींबरोबर स्वत:च्या भाषेमध्ये संभाषण करण्याचा प्रयत्न करतो. | **कृती क्र. ४ : विशिष्ट जागा सांगून तेथील वस्तूंची नावे सांगणे**<br>१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांसोबत रिंगणात उभे राहून हा खेळ घ्यावा. विशिष्ट जागा सांगून तेथील वस्तूंची नावे विचारावीत. उदा. स्वयंपाकघर, किराणा मालाचे दुकान, गोठा, शाळा.<br>२) विद्यार्थी जी नावे सांगतील, त्याची यादी शिक्षकांनी फळ्यावर लिहावी व शेवटी प्रत्येक शब्दावर बोट फिरवत वाचून दाखवावीत.<br>३) विद्यार्थ्यांच्या घरच्या भाषेतील नावे/शब्द यांचा स्वीकार करावा व त्यासाठीचे मराठी नाव, शब्द विद्यार्थ्यांना सांगावे.<br>४) फळ्यावर दोन्ही भाषांतील शब्द लिहावेत.<br>५) नंतर विद्यार्थ्यांना या खेळावर आधारित कृतिपत्रिका सोडवायला द्यावी. | कृतिपत्रिका ४ | १ |
| | **कृती क्र. ५ : नाव सांगणे – विशिष्ट कृतींची नावे**<br>शिक्षक विद्यार्थ्यांसोबत रिंगणात उभे राहून हा खेळ खेळतील.<br>एका विद्यार्थ्याने न बोलता काही काम/कृती करून दाखवावी. इतर विद्यार्थ्यांनी ती ओळखावी.<br>जसे : स्वयंपाक घरातील कामे – चिरणे, धुणे, पाखडणे इ./ झाडणे, पाणी हापसणे. इ. | – | २ |
| | **कृती क्र. ६ : मला काही सांगायचे आहे**<br>शाळेच्या पहिल्या दिवशी/आदल्या दिवशी झालेल्या घटना, अनुभव यांवर चर्चा करणे व विद्यार्थ्यांना त्यांचे अनुभव सांगायला सांगावे. जसे : विद्यार्थ्यांनी शाळेतून घरी जाताना ज्या घटना, अनुभव घेतले आहेत, त्यावर बोलण्यास प्रोत्साहन द्यावे. | – | २ |
| | **कृती क्र. ७ : मुलाखत**<br>१) विद्यार्थ्यांना शाळेतील कोणत्याही दोन व्यक्तींना भेटून (खूप ओळखीच्या नसणाऱ्या व्यक्ती) त्यांच्यांशी बोलायचे आहे, त्यांची थोडी माहिती घ्यायची आहे असे सांगावे. कमीत कमी पुढील प्रश्नांची उत्तरे विचारून, ती वर्गात येऊन सर्वांसमोर सांगायची आहेत असे सांगावे.<br>प्रश्न : १) तुमचे नाव काय? २) तुम्ही कोठे राहता? ३) तुमचा आवडता पदार्थ कोणता? किंवा तुमचा आवडता खेळ किंवा छंद कोणता? | – | ५, ६ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.1 शाळेमध्ये किंवा घरी अनोळखी व्यक्ती, शिक्षक, नवीन मित्र, शाळेचे कर्मचारी आणि इतर प्रौढ व्यक्तींबरोबर स्वत:च्या भाषेमध्ये संभाषण करण्याचा प्रयत्न करतो. | २) दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांना आपल्या घराजवळ राहणाऱ्या, परंतु खूप ओळख नसणाऱ्या व्यक्तीस हेच प्रश्न किंवा त्यांच्या कामाबद्दलची माहिती विचारून येण्यास सांगावे. | | |
| | **कृती क्र. ८ : वस्तूंवरून गप्पा-शिक्षकांनी बोलणे**<br>शिक्षकांनी एखादी वस्तू वर्गात आणून त्याविषयी विद्यार्थ्यांशी गप्पा कराव्यात. जसे : छत्री कोणकोणत्या आकाराची, कोणकोणत्या रंगांची असते हे विचारावे. आणलेल्या छत्रीचे निरीक्षण करण्यास प्रोत्साहन द्यावे. त्याची उंची, कशी उघडते, आपण त्याचा वापर कधी व कसा करतो? इ. तसेच विद्यार्थ्यांना त्या वस्तूशी निगडित इतर अनुभवही सांगायला प्रोत्साहन द्यावे. जसे : छत्री घेण्यासाठी पैसे कसे साठवले?/छत्री दुरुस्त कशी केली? इ. | छत्री, हेल्मेट, बॉटल, मास्क इत्यादी | ३ |
| | **कृती क्र. ९ : समूहदर्शक शब्द**<br>१) चित्र वापरत विद्यार्थ्यांना समूहदर्शक शब्दांची माहिती करून द्यावी. उदा. हरणांचा कळप, पक्ष्यांचा थवा, फुलांचे गुच्छ इ.<br>२) समूहदर्शक शब्द वापरून वाक्ये तयार करण्यास सांगावे. | चित्रे | ३ |
| | **कृती क्र. १० : तोंडी शब्दकोडे सोडविणे**<br>शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढीलप्रमाणे कोडे घालावे. विद्यार्थ्यांना उत्तर शोधण्यास मदत करावी.<br>उदा. मी आहे पक्षी, रंग माझा काळा, काव काव करतो, तुमच्या आजूबाजूला ओरडतो बघूया तुम्ही ओळखता काय? सांगा माझे नाव काय ?<br>१) मुलांना अशा प्रकारची कोडी बनविण्यास मदत करावी.<br>२) घरच्या भाषेतील पारंपरिक कोड्यांची माहिती विचारून घेण्यास सांगावे. | | ३ |
| | **कृती क्र. ११ : मी कोठे सापडेन**<br>मुलांना पिके/धान्ये/वस्तू/विशिष्ट व्यक्ती यांची नावे सांगावीत/चित्र दाखवावे व ते कोठे सापडेल यावर चर्चा करावी. उदा. हळद – शेतात, दुकानावर, घरी इ.<br>पोस्टमन – गावात, पोस्ट ऑफिसमध्ये किंवा त्यांच्या घरी<br>(मुलांकडून विविध उत्तरे अपेक्षित आहेत, याचे कारण समजावून घेऊन सर्व उत्तरांचा स्वीकार करावा.) | पिके, धान्ये यांची चित्रे, विविध वस्तू | ७ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.1 शाळेमध्ये किंवा घरी अनोळखी व्यक्ती, शिक्षक, नवीन मित्र, शाळेचे कर्मचारी आणि इतर प्रौढ व्यक्तींबरोबर स्वत:च्या भाषेमध्ये संभाषण करण्याचा प्रयत्न करतो. | **कृती क्र. १२ : असे झाले तर काय कराल?**<br>विद्यार्थ्यांना एखादा प्रसंग देऊन, तुम्ही काय बोलाल किंवा काय कराल याची कल्पना करून त्याचा अभिनय करण्यास सांगावा. जसे : तुमची चप्पल तुटली/तुम्हांला पुस्तकातील एखादे पात्र भेटले? | | ७ |
| | **कृती क्र. १३ : डोळे झाकून वस्तू ओळखणे**<br>एका पिशवीमध्ये विविध वासाच्या आणि स्पर्शाच्या वस्तू गोळा कराव्यात. विद्यार्थ्यांच्या डोळ्याला पट्टी बांधून स्पर्श, रंग, आकार, वास, पोत यांच्या साहाय्याने वस्तू ओळखण्यास सांगावे. | विविध वस्तू | ७ |
| | **कृती क्र. १४ : मी कसा, मी कशी–शिक्षक व मुले**<br>मी कसा, मी कशी? (विशेषण)<br>१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गोलाकार बसून घ्यावे,<br>२) शिक्षकांनी काही परिचित वस्तू दाखवाव्यात. (कमीत कमी चार ते पाच)<br>३) वस्तूचे नाव सांगून ही वस्तू तुम्हांला कशी दिसत आहे? किंवा वस्तू हातात आल्यावर ती कशी जाणवते आहे हे सांगा.<br>४) विद्यार्थी आपल्या शब्द संपत्तीनुसार उत्तरे देतील.<br>५) या व्यतिरिक्त वस्तूंची इतर अधिक विशेषणे शिक्षक सांगतील.<br>उदा. : पाण्याची बाटली – चौकोनी, उभी, गोल, रंगीत, प्लॅस्टिकची विद्यार्थ्यांनी सांगितलेली विशेषणे) दंडगोलाकार, स्टीलची/लाकडी, गुळगुळीत (शिक्षकांनी सांगितलेली विशेषणे)<br>**विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी (CWSN) :** विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सूचना कमी शब्दांत व अचूक द्याव्यात. भाषा विकासात समस्या असणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठी वाक्ये अवघड वाटू शकतात. सूचनांची पुनरावृत्ती करावी. मुलांनी एक दोन शब्दांत वस्तूचे वर्णन केले तरी ते स्वीकारावे. | विविध वस्तू | ८ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.1 शाळेमध्ये किंवा घरी अनोळखी व्यक्ती, शिक्षक, नवीन मित्र, शाळेचे कर्मचारी आणि इतर प्रौढ व्यक्तींबरोबर स्वत:च्या भाषेमध्ये संभाषण करण्याचा प्रयत्न करतो. | **कृती क्र. १५ : मी कसा मी कशी? गटा-गटात**<br>मी कसा मी कशी ? (विशेषण)<br>हाच खेळ दोन गटात घ्यावा. मुलांनी विविध वस्तू जमा कराव्यात. त्या मांडून एकेका वस्तूचे वर्णन करावे दुसऱ्या गटातील मुलांनी वस्तू ओळखून दाखवावी. | विविध वस्तू | ८ |
| | **कृती क्र. १६ : मी कसा मी कशी? सारखे पण वेगळे-वेगळे**<br>विशेषणांच्या खेळाचाच हा पुढील टप्पा आहे. विद्यार्थ्यांना आता समान वस्तू शोधून आणण्यास सांगावी. जसे : पान – परंतु प्रत्येकाचे पान वेगळे असावे. काही विशेष असावे. सर्वांनी आपली पाने एकत्रित गोलात ठेवावीत. आपल्या पानाचे विशेषण सांगावे. इतरांनी ते पान ओळखावे. | | ८ |
| ECL 1 3.2 वाचन कोपरा/ वाचन क्षेत्र यांतील पुस्तक निवडतो आणि चित्रांच्या साहाय्याने गोष्ट समजून घेण्याचा प्रयत्न करतो व लिहिलेल्या गोष्टीविषयी भाकीत करू शकतो. | **कृती क्र. १७ : पुस्तके हाताळणे**<br>वाचन कोपऱ्याची निर्मिती करावी.<br>१) विद्यार्थ्यांसाठी योग्य पुस्तके उपलब्ध करून घ्यावी.<br>२) पहिल्या दिवशी सर्व साहित्य उपलब्ध करून घेऊन, पुस्तके लावताना विद्यार्थ्यांचाही सहभाग घ्यावा.<br>३) विद्यार्थ्यांबरोबर वाचन कोपऱ्याचे नियम ठरवून घ्यावेत.<br>४) वर्गातील एका कोपऱ्यात भिंतीवर तार लावून, तारेवर/दोरीवर/पिशवीत पुस्तके विद्यार्थ्यांना सहज दिसतील, हाताळता येतील अशी ठेवावीत.<br>५) काही पुस्तकांतील काही भाग विद्यार्थ्यांना वाचून दाखवावा.<br>६) विद्यार्थ्यांना वाचलेल्या पुस्तकाविषयी बोलण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.<br>७) वाचन कोपऱ्यासाठी निश्चित केलेली पुस्तके विद्यार्थ्यांना सातत्याने हाताळण्यास उपलब्ध करून द्यावी.<br>(पुस्तक फाटणे, हरविणे यांसारखे प्रकार होतात, म्हणून विद्यार्थ्यांना पुस्तकापासून दूर ठेवू नये.)<br>८) विद्यार्थ्यांना आवडीची पुस्तके घेऊन आभासी वाचन करण्यास प्रोत्साहन द्यावे.<br>**विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी (CWSN) :** पुस्तके न हाताळणाऱ्या मुलांकडे लक्ष द्यावे. त्यांना पुस्तके दाखवावी. पुस्तक कसे धरायचे कसे उघडायचे, कुठून सुरुवात करायची इ. गोष्टी त्यांना दाखवाव्यात. | विविध प्रकारची पुस्तके | १, ८ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.3 स्वत:च्या गोष्टी किंवा कविता वाचनाचा अनुभव त्यांच्या स्वत:च्या भाषेत व्यक्त करतो. त्याविषयी बोलतो आणि मित्रांमध्ये चर्चा करतो. | **कृती क्र. १८ : शब्द डोंगर**<br>प्रथम वर्गात फळ्यावर एक शब्द द्यावा. शब्द वाचून दाखवत त्याच शब्दात विद्यार्थ्यांना आणखी एक एक शब्द वाढवत वाक्य वाढवत नेण्यास सांगावे. जसे : भाजी – ताजी भाजी – मेथीची ताजी भाजी – मेथीची ताजी भाजी केली. – ताईने मेथीची ताजी भाजी केली. ....... | खडू, फळा | ४, ९ |
| ECL 1 3.4 (अ) आवडीच्या कविता किंवा गाणी स्वतःच्या भाषेमध्ये पाठ करताना आवाजातील योग्य चढउतार किंवा स्वरनियमांचा वापर करतो. | **कृती क्र. १९ : गाण्यांचे सादरीकरण**<br>विद्यार्थ्यांना त्यांचे आवडते गाणे एकट्याने/जोडीने/गटाने सादर करण्यास प्रोत्साहन द्यावे. विद्यार्थ्यांना गाणे सादर करताना कसे वाटले? गटात गाणे तयार करताना काय काय मजा आली? घरच्या भाषेतील गाण्याशी निगडित त्यांचे अनुभव सांगण्यास प्रोत्साहन द्यावे. जसे : गाण्यामागील गोष्ट, कोण व कधी म्हणते हे गाणे इ. | विविध गाण्यांचा संग्रह (सोपी ते अवघड) | ८ |
| | **कृती क्र. २० : गोष्ट सांगणे**<br>विद्यार्थ्यांच्या घरच्या भाषेतील एखादी गोष्ट किंवा विद्यार्थ्यांना येणारी एखादी गोष्ट सांगण्यास सांगावी.<br>**विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी (CWSN) :** सर्वांसमोर गोष्ट सांगू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मित्राबरोबर ही कृती करण्यास सांगावी किंवा दुसऱ्या विद्यार्थ्याने गोष्ट सांगितल्यावर सांगण्यास सांगावी किंवा शिक्षकांनी सुरुवात करून विद्यार्थ्यास ती पूर्ण करण्यास सांगावे. प्रत्येक विद्यार्थ्याने त्यांच्या त्यांच्या स्तरावर सहभागी होणे महत्त्वाचे आहे. | गोष्टींचा संग्रह | ४ |
| | **कृती क्र. २१ : गोष्टीचे नाटुकले सादर करणे**<br>विद्यार्थ्यांना आवडेल त्या गोष्टीचे नाटुकले सादर करण्यास मदत करावी.<br>उदा. ससा–कासवाची गोष्ट इ. | गोष्टींचा संग्रह | ९ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.4 (ब) : अस्खलित पाठांतर करतो. | **कृती क्र. २२ : जिभेची लगबग**<br>विद्यार्थ्यांना गंमत वाक्ये ऐकवावीत. तीच वाक्य पुन्हा-पुन्हा गतीने म्हणण्यास सांगावीत. त्यात कोणती गंमत जाणवली यावर बोलते करावे. उदा. कच्चा पापड, पक्का पापड यांसारखी वाक्ये.<br>**विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी (CWSN) :** जर विद्यार्थ्यास हे करता येत नसेल किंवा सांगितलेले वाक्य कळत नसेल, तर सर्वांसमोर विद्यार्थ्यांस फार जोर न देता एकट्याने नंतर म्हणण्यास मदत करावी. विद्यार्थ्यांना कमीपणा वाटणार नाही, त्यांचा अपमान होणार नाही याची काळजी घ्यावी. | गंमत वाक्यांचे संकलन | ४, ८ |
| ECL 1 3.5 (अ) : शिक्षकांना गोष्ट सांगण्यासाठी त्यांच्या आवडीची पुस्तके देतो. | **कृती क्र. २३ : आवडीची गोष्ट वाचणे**<br>आळीपाळीने विद्यार्थ्यांना वाचन कोपऱ्यातून/ग्रंथालयातून त्यांच्या आवडीचे पुस्तक आणायला सांगावे. त्या पुस्तकातील गोष्ट मुलांना वाचून दाखवावी. | पुस्तके | ५ |
| ECL 1 3.5 (ब) : चित्रातील वस्तूंचे लक्षपूर्वक निरीक्षण करतो, त्यांच्याविषयी बोलतो आणि शोधलेल्या अक्षरात त्यांचे लेखन करतो. | **कृती क्र. २४ : चित्र वाचन १**<br>विद्यार्थ्यांना परिचयाचे चित्र दाखवून चित्रात काय दिसते ते विचारावे? विद्यार्थ्यांनी एका शब्दात उत्तर दिले/घरच्या भाषेत उत्तर दिले तरी त्याचा स्वीकार करावा.<br>विद्यार्थ्यांना पूर्ण वाक्यात वर्णन करण्यास प्रोत्साहन द्यावे. | चित्र | १, ६ |
| | **कृती क्र. २५ : चित्र वाचन २**<br>चित्रात दिलेल्या माहिती पलीकडे जाऊन विचार करायला लागेल असे प्रश्न विचारावेत. जसे : ही मुले कोठे चालली असतील? चित्रातील मनी काय शोधत आहे असे तुम्हांला वाटते? अशा प्रश्नांची अनेक उत्तरे असू शकतात. मुलाने दिलेल्या उत्तरामागचे कारण समजावून घ्यावे व सर्व उत्तरांचा स्वीकार करावा. | चित्र | १, ६ |
| | **कृती क्र. २६ : चित्र वाचन – संवाद/गोष्ट गुंफणे**<br>चित्रातील पात्रांवरून गोष्ट गुंफण्यास प्रोत्साहन द्यावे. पात्रांमध्ये काय संवाद चालू असेल? पुढे काय झाले असेल? | चित्र | ६ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| | **कृती क्र. २७ : चित्र वाचन – पूर्वानुभवावर गप्पा**<br>चित्रातील घटना पूर्वानुभवाशी जोडून त्यावर बोलण्यास प्रोत्साहन द्यावे.<br>कृती क्र. २४ ते कृती क्र. २७ – एकच चित्र वापरावे. | चित्र | १ |
| ECL 1 3.5 (ब) चित्रातील वस्तूंचे लक्षपूर्वक निरीक्षण करतो, त्यांच्याविषयी बोलतो आणि शोधलेल्या अक्षरात त्यांचे लेखन करतो. | **कृती क्र. २८ : चित्र वाचन – स्वलिपीत वर्णन लिहिणे**<br>चित्रात काय काय दिसते त्यांचे चित्र काढून स्वलिपीत त्यांना नावे देण्यास प्रोत्साहन द्यावे.<br>स्वलिपीत चित्रांचे वर्णन लिहिण्यास प्रोत्साहन द्यावे. | चित्र वाचनासाठी उपयुक्त चित्रांचा संच, कागद–पेन्सिल | ११ |
| | **कृती क्र. २९ : चित्र वाचन – चित्रावरून गोष्ट लिहिणे**<br>चित्रावरून स्वलिपीत गोष्ट लिहिण्यास प्रोत्साहन द्यावे.<br>(विद्यार्थ्यांनी काय चित्र काढले आहे? स्वलिपीत काय लिहिले आहे हे विचारून विद्यार्थ्यांच्याच शब्दांत ठळक अक्षरात त्यांच्या समोर त्यांच्या लेखनाजवळच लिहावे.) | चित्र वाचनासाठी उपयुक्त चित्रांचा संच, कागद–पेन्सिल | ६ |
| ECL 1 3.6 (अ) छापील वस्तूंचे समजपूर्वक वाचन करतो. | **कृती क्र. ३० : शब्द तोडणे, जोडणे**<br>१) वाक्यातील शब्द सुटे करणे या खेळाप्रमाणेच शब्दातील प्रत्येक ध्वनींसाठी / आवाजासाठी एक टाळी असा खेळ घ्यावा. जसे : टेबल – 'टे 'टाळी, 'ब' टाळी, 'ल' टाळी<br>२) त्याचप्रमाणे शब्द जोडून सांगण्याचा खेळ घ्यावा. जसे : शिक्षकांनी सांगावे रु– मा – ल (प्रत्येक आवाजा नंतर थांबत) मुलांनी 'रुमाल' हा शब्द जोडून सांगावा.<br>३) हा खेळ जोडी जोडीतही खेळायला देऊ शकतो. | वाक्यांचा सराव – तीन शब्दांचे वाक्य ते पाच शब्दांच्या वाक्यापर्यंत | २ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.6 (अ) : छापील मजकुराचे समजपूर्वक वाचन करतो. | **कृती क्र. ३१ : वाक्यातील शब्द सुटे करणे**<br>आपण एक खेळ खेळणार आहोत असे सांगून सुरुवात करावी. मी एक वाक्य सांगते. असे म्हणून एक वाक्य सांगावे. उदा. : माझे नाव रमेश आहे. आता हे वाक्य मी कसे म्हणते ऐका, असे म्हणून पुन्हा तेच वाक्य तोडत एका शब्दासाठी एक टाळी वाजवीत म्हणावे.<br>हीच कृती विद्यार्थ्यांकडून करून घ्यावी. मुलांना नवे वाक्य देऊन त्यांना शब्द सुटे करण्यासाठी मदत करावी. अशा प्रकारे सुरुवातीला काही वाक्ये समूहात/एकत्रित करून घ्यावीत. नंतर एकेका मुलाकडून स्वतंत्रपणे वाक्य सुटे करून घ्यावे.<br>हा खेळ कधी टाळी वाजवत तर कधी फरशीवर गोल आखून, एका शब्दासाठी एका गोलात उडी मारणे अशा प्रकारे घेऊ शकतो.<br>**विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी (CWSN) :** पुढील वाचनासाठी ही कृती खूपच उपयोगी ठरू शकते. यावर जास्त वेळ काम करावे. | – | ३.६ |
| | **कृती क्र. ३२ : शब्दांच्या सुरुवातीचा व शेवटचा आवाज ओळखणे**<br>१) शब्द उच्चारून शब्दाच्या सुरुवातीला कोणता आवाज येतो याकडे लक्ष वेधून घ्यावे. सुरुवातीला समान आवाजाने सुरू होणारे शब्द सांगावेत. मध्येच एखादा वेगळ्या आवाजाने सुरू होणारा शब्द सांगावा.<br>२) अशाच प्रकारे शब्दाच्या शेवटी कोणता आवाज येतो? हा खेळ घ्यावा.<br>**विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी (CWSN) :** ही कृती आवाजांमध्ये भेद न करू शकणाऱ्या मुलांसाठी उपयुक्त ठरू शकते. | | ४.६ |
| | **कृती क्र. ३३ : शब्दांच्या सुरुवातीचा व शेवटचा आवाज ओळखणे – कृतिपत्रिका सोडविणे**<br>सारख्या आवाजाने सुरु/शेवट होणाऱ्या चित्रांच्या जोड्या लावा. अशी कृतिपत्रिका सोडवून घ्यावी. | कृतिपत्रिका क्र. २०, २१ | ४ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
| --- | --- | --- | --- |
| | **कृती क्र. ३४ : शब्दांच्या सुरुवातीचा आवाज बदलणे/शेवटचा आवाज बदलणे**<br>मान या शब्दांत सुरूवातीला कोणता आवाज येतो असे विचारावे, आता ''मी 'मा' च्या जागी 'पा' घालून 'पान' असा शब्द तयार करते'', असे सांगत मुलांना शब्दातील पहिला आवाज बदलून दुसरा अर्थपूर्ण शब्द बनविण्यास सांगावे. कधी कधी शब्द अर्थहीन होतील. परंतु येथे आवाज सुटा करता येणे व त्याजागी दुसरा आवाज घालता येणे हे अधिक महत्त्वाचे आहे. | | |
| ECL 1 3.6 (अ) छापील वस्तूंचे समजपूर्वक वाचन करतो. | **कृती क्र. ३५ : शब्दभेंड्या**<br>गाण्यांच्या भेंड्यांप्रमाणे शब्दांच्या भेंड्या घ्याव्यात. जसे : भाजी – जिना – नाक | – | ३, ६ |
| | **कृती क्र. ३६ : यमक जुळणारे शब्द सांगा.**<br>१) यमकयुक्त शब्द असणारा वाचन पाठ वाचून दाखवावा. यमक जुळणारे शब्द म्हणजे काय हे सांगावे. उदा. पान–कान, कार–चार<br>२) यमकयुक्त शब्द सांगण्यास प्रोत्साहन द्यावे.<br>३) शिक्षकांनी शब्दांच्या जोड्या सांगाव्यात. यमकयुक्त जोडी असेल, तर मुलांनी टाळी वाजवावी. असा खेळ घ्यावा. हा खेळ विद्यार्थ्यांना एकमेकांबरोबर खेळायला सांगा. | भाषापेटीतील यमकयुक्त शब्दांच्या जोड्यांचा संच | ५ |
| | **कृती क्र. ३७ : श्रवण भेद खेळ**<br>१) शिक्षक मार्गदर्शिकेत दिल्याप्रमाणे चित्रपट्ट्या तयार कराव्यात.<br>२) चित्रावर बोट ठेवून सर्व चित्र पट्ट्यांचे वाचन विद्यार्थ्यांकडून करून घ्यावे. जसे : पान, फूल, पान, फूल. (शिक्षक मार्गदर्शिका पृष्ठ क्र. १२२)<br>३) त्यानंतर सर्व चित्रपट्ट्या विद्यार्थ्यांसमोर एकत्रित करून ठेवाव्यात. तुम्ही सांगाल ती चित्रपट्टी निवडून देण्यास सांगावी. | श्रवण भेद खेळ कार्ड | ५ |
| | **कृती क्र. ३८ : वर्गातील सूचना पट्ट्यांचे वाचन**<br>शिक्षकांनी वर्गात विविध सूचना पट्ट्या लावाव्यात. त्यांचे वाचन करून दाखवावे. पुरेशा सरावानंतर विद्यार्थ्यांना सूचना पट्टीवर काय लिहिले आहे हे वाचण्यास प्रोत्साहन द्यावे. सूचना पट्ट्या – १) जेवणापूर्वी हात स्वच्छ धुवा. २) चपला येथे रांगेत काढा. ३) पिशव्या व दप्तरे येथे रांगेत ठेवा. ४) कचरा येथे टाका. | वर्गातील सूचना पट्ट्या | १ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
| --- | --- | --- | --- |
| ECL 1 3.6 (अ) : छापील वस्तूंचे समजपूर्वक वाचन करतो. | **कृती क्र. ३९ : सूचना पट्ट्यांचा खेळ**<br>१) शिक्षकांनी छोट्या-छाट्या सूचना पट्ट्या तयार कराव्यात. उदा. पळत जा. दरवाज्याला हात लावून ये./चार दगड आण./स्वत:भोवती गिरकी घे.<br>२) विद्यार्थ्यांसमोर सर्व सूचना पट्ट्या टाकून, त्यातून एक निवडायला सांगावी.<br>३) मी आता सूचनापट्टीवर लिहिलेले वाचून दाखविणार आहे. त्याप्रमाणे तुम्ही कृती करायची. असे सांगावे.<br>४) विद्यार्थ्याने उचलेली सूचना पट्टी वाचून दाखवावी. इतर विद्यार्थ्यांना त्याप्रमाणे कृती करण्यास प्रोत्साहित करावे.<br>**विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी (CWSN) :** कदाचित काही मुलांना मदतीची गरज भासेल. सर्व विद्यार्थ्यांना सूचना समजतात की नाही, सूचनांचा अर्थ कळतो ना याकडे लक्ष द्यावे. | सूचना पट्ट्यांचा संच | ५ |
| | **कृती क्र. ४० : प्रकटवाचन**<br>१) शिक्षकांनी गोष्ट वाचून दाखविण्याआधी २ ते ३ वेळा वाचलेली असावी.<br>२) चित्ररूप गोष्टीचे पुस्तक घेऊन विद्यार्थ्यांसोबत गोलाकार बसावे<br>३) पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील व मलपृष्ठावरील चित्र दाखवावे व लेखकाचे नाव वाचून दाखवावे. गोष्टीचे नाव वाचून दाखवावे.<br>४) मुखपृष्ठावरील चित्रावरून व गोष्टीच्या नावावरून गाभा काय असेल याबाबत विद्यार्थ्यांना प्रश्न विचारावे.<br>५) पुस्तक वाचून दाखविताना काही ठरावीक टप्प्यांवर थांबत, असे का झाले? काय होईल? असे का वाटले? असे प्रश्न मुलांना विचारावे.<br>६) गोष्ट पूर्ण झाल्यावर गोष्टीतले काय आवडले? काय नाही आवडले यावर चर्चा करावी (येथे गोष्टीचे तात्पर्य विचारू नये.) | चित्ररूप गोष्टीची पुस्तके | ४ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.6 (ब) : चित्रांचा योग्य क्रम लावून, समजपूर्वक गोष्टींचे वाचन करतो. | **कृती क्र. ४१ : तोंडी सूचनांचा खेळ – राजा म्हणतो**<br>१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना तोंडी सूचना द्याव्यात. मुले सूचना लक्षात ठेवून त्याप्रमाणे करतात का हे पाहावे.<br>२) सोप्या सूचनांपासून कठीण सूचनांकडे जावे. जसे : सोपी सूचना – उभे रहा. दोन उड्या मारा.<br>कठीण सूचना – उभे राहून, स्वतःभोवती दोन गिरक्या घेऊन, बेडूके उड्या मारत, दरवाज्याला हात लावून, पळत परत येत एक उडी मारून जागेवर बसा.<br>३) नंतर मुलांना एकमेकांना अशा सूचना देण्यास सांगाव्यात. | सूचनांचा संग्रह (दोन शब्द, शब्दाच्या) | २ |
| | **कृती क्र. ४२ : चित्र कार्डावरून गोष्ट सांगणे**<br>१) विद्यार्थ्यांना गोष्ट चित्र कार्ड दाखवून निरीक्षण करण्यास सांगावे व प्रत्येक भागात काय दिसत आहे यावर चर्चा करावी. तसेच शिक्षकांनी शेवटी गोष्ट पूर्ण सांगावी.<br>२) त्यानंतर गोष्ट चित्र कार्ड विद्यार्थ्यांना देऊन, विद्यार्थ्यांना त्यावरून गोष्ट सांगण्यास सांगावे. हा उपक्रम परत घेताना विद्यार्थ्यांना नवीन गोष्ट तयार करण्यास प्रोत्साहन द्यावे. यासाठी भाषा पेटीतील चित्रकार्ड वापरता येतील. | चित्रकार्ड संच | २ |
| | **कृती क्र. ४३ : घटनाक्रम**<br>१) काही छोट्या–छोट्या कृती क्रमाने कराव्या लागतात. अशा परिचित कृती घटनाक्रमासाठी निश्चित कराव्यात. साहित्यात दिलेल्या घटनाक्रमांची कार्डे विद्यार्थ्यांना देऊन योग्य क्रमाने लावण्यास सांगावीत. जसे : कपडे धुण्याची क्रिया<br>२) शिक्षकांनी कार्डे क्रमाने लावल्यावर त्याखालील वाक्य वाचून दाखवावे. वाक्यपट्टी वाक्याशी जोडावी.<br>३) पुरेशा सरावानंतर केवळ वाक्यपट्ट्या क्रमाने लावण्यास मदत करावी. | घटनाक्रमाची कार्डे | २ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.7 : परिचित कथा/ कवितेमध्ये पुनरावृत्ती होणाऱ्या शब्दांचे ध्वनी ओळखतो. | **कृती क्र. ४४ : गाण्यांचे वाचन**<br>वर्गात घेतली जाणारी गाणी चार्ट पेपरवर लिहून वर्गात लावावीत. मुलांबरोबर गाण्यांचे सहभागी वाचन करावे. मुलांच्या घरच्या भाषेतील मूळ गाणीही चार्ट पेपरवर लिहावीत. | विविध गाण्यांचे संग्रह (सोपी ते अवघड) चार्ट पेपर, स्केचपेन, चिकटपट्टी/ दोरी व चिमटे (चार्ट पेपर विद्यार्थ्यांना सहज वाचता येईल अशा उंचीवर टांगण्यासाठी) | ५ |
| | **कृती क्र. ४५ : सहभागी वाचन १**<br>१) शिक्षकांनी स्पष्ट चित्र असणाऱ्या व मोठ्या अक्षरात लिहिलेल्या गोष्टीच्या पुस्तकाची निवड करावी. पुस्तकात प्रत्येक पानावर एक किंवा दोन छोटी छोटी वाक्ये असावीत. पुस्तकात वाक्यांची पुनरावृत्ती होईल व ध्वनी दर्शक शब्द असतील असे विद्यार्थ्यांच्या परिसराशी निगडित विषयाचे पुस्तक निवडावे किंवा असे छोटे पुस्तक तयार करावे.<br>२) विद्यार्थ्यांना अर्ध गोलाकार बसवावे व लक्ष वेधून घ्यावे.<br>३) मुखपृष्ठ दाखवून गोष्टीचे नाव सांगावे.<br>४) आत काय असेल याचा हे मुखपृष्ठावरून अंदाज बांधण्यास सांगावे<br>५) प्रत्येक शब्दावर पेन्सिल/पट्टी/काठी ठेवून वाचून दाखवावे व मुलांना सोबत वाचण्यास सांगावे.<br>६) जेथे शब्दांची पुनरावृत्ती असेल त्यांचे विद्यार्थ्यांकडून परत-परत वाचन करून घ्यावे. | सहभागी वाचनास योग्य अशा पुस्तकांचा संच | २, ८ |
| | **कृती क्र. ४६ : सहभागी वाचन २**<br>१) विद्यार्थ्यांना अर्धगोलाकार बसवावे.<br>२) गोष्टीचे पुस्तक सर्व मुलांना दिसेल याची खात्री करावी व आधीच्या कृतीप्रमाणे आजही मुलांचा सहभाग घेत गोष्ट पूर्ण वाचून दाखवावी. | | २, ८ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.7 परिचित कथा/ कवितेमध्ये पुनरावृत्ती होणाऱ्या शब्दांचे ध्वनी ओळखतो. | **कृती क्र. ४७ : सहभागी वाचन ३**<br>१) तीच गोष्ट सर्वांना दिसेल या पद्धतीने ठेवून मुलांना अर्धगोलाकार बसवावे. गोष्ट वाचताना वाक्यात येणारी उद्गारवाचक चिन्हे, पूर्ण विराम, स्वल्पविराम, प्रश्नार्थक चिन्हे मुलांना दाखवावीत व त्यांची माहिती द्यावी.<br>२) मुख्यत: कोणते चिन्ह असताना कसे वाचायचे याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना करून दाखवावे. | | २, ८ |
| ECL 1 3.8 (ब) : लिहिलेल्या मजकुरावर किंवा बघितलेल्या चित्रांवर आपल्या अनुभवांवर आधारित भाकीत करतो. | **कृती क्र. ४८ : गोष्ट पूर्ण करूया**<br>शिक्षकांनी एखाद्या काल्पनिक गोष्टीची केवळ सुरुवात सांगावी. आता पुढे काय होईल? असे विचारून विद्यार्थ्यांना ती गोष्ट पूर्ण करण्यास सांगावे. | | १० |
| | **कृती क्र. ४९ : गोष्ट तयार करूयात**<br>आपण एक गोष्ट बनविणार आहोत असे सांगावे. शिक्षकांनी पहिले वाक्य सांगावे. प्रत्येक मुलाने एक एक वाक्य सांगत गोष्टीत भर घालावी व गोष्ट तयार करावी. गोष्ट तयार करताना शिक्षक फळ्यावर लिहू शकतात. | | १० |
| | **कृती क्र. ५० : वर्गातील वस्तूंच्या नावांचा शब्द कार्ड खेळ**<br>वर्गामध्ये असणाऱ्या विविध वस्तूंच्या नावांची शब्द कार्डे ठळक व मोठ्या अक्षरात लिहून तयार करून त्या वस्तूला लावावी. विद्यार्थ्यांना प्रत्येक वस्तू जवळ नेऊन हे काय आहे असे विचारून याचे नाव लिहून मी येथे चिकटविले आहे असे सांगून नाव वाचून दाखवावेत. सर्व शब्द कार्डे किमान दोन वेळा वाचून दाखवावीत.<br>उदा. 'फळा' शब्द कार्ड<br>सर्व शब्द कार्डांचे अजून सेट करावेत. मुलांकडे दोन दोन शब्द कार्डे देऊन त्यांच्या हातातील शब्दा सारखा शब्द कुठे चिकटविला आहे ते शोधण्यास सांगावे. शब्द शोधता न आल्यास हातातील शब्द वाचून दाखवावा व चिकटविलेल्या कार्डाचे व हातातील शब्दाचे निरीक्षण करण्यास सांगावे. | शब्द कार्डांचे संच | १ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.8 (ब) : लिहिलेल्या मजकुरावर किंवा बघितलेल्या चित्रांवर आपल्या अनुभवांवर आधारित भाकीत करतो. | **कृती क्र. ५१ : वर्गातील वस्तूंच्या नावांचा शब्द कार्ड खेळ – जोड्या लावणे**<br>वर्गातील वस्तूंच्या नावांच्या शब्द कार्डांचे अजून सेट करावेत. मुलांकडे दोन दोन कार्डे देऊन त्यांच्या हातातील शब्दा सारखा शब्द कुठे चिकटविला आहे ते शोधण्यास सांगावे. शब्द शोधता न आल्यास हातातील शब्द वाचून दाखवावा व चिकटविलेल्या कार्डाचे व हातातील शब्दाचे निरीक्षण करण्यास सांगावे.<br>हाच खेळ दोन दोन च्या जोड्यांमध्ये किंवा दोन गटांत खेळता येईल. सर्वांत आधी सर्व शब्द कार्डे जो गट ओळखेल त्यांना शाबासकी द्यावी. | शब्द कार्डांचे संच | ८ |
| | **कृती क्र. ५२ : वर्गातील वस्तूंच्या नावांचा शब्द कार्ड खेळ – डॉमिनो**<br>वर्गातील वस्तूंच्या नावांच्या डॉमिनो खेळायला देणे. | डॉमिनो | ५ |
| | **कृती क्र. ५३ : पाककृती – प्रत्यक्ष पाककृती**<br>पाककृती – (भेळ)<br>१) शिक्षिकेने कोणती पाककृती करायची ते ठरवावे व त्याप्रमाणे साहित्य तयार ठेवावे.<br>२) आदल्या दिवशी मुलांना कोणता पदार्थ बनविणार आहोत याची कल्पना द्यावी व काय काय साहित्य लागेल याची चर्चा करत फळ्यावर साहित्याची यादी लिहावी.<br>३) सर्व विद्यार्थ्यांना अर्धगोलाकार बसवावे.<br>४) त्यांच्यासमोर भेळीचे साहित्य मांडून मुलांना वस्तू ओळखण्यास सांगावे. जसे : मुरमुरे (चुरमुरे), कांदा, टोमॅटो, कोथिंबीर, फरसाण, मीठ, लिंबू इ. त्याचप्रमाणे डाव, मोठे पातेले याही वस्तू दाखवाव्यात.<br>५) पाककृती करताना क्रम व प्रमाण खूप महत्त्वाचे असते. सर्व विद्यार्थ्यांना दिसेल अशा रीतीने विद्यार्थ्यांशी बोलत/कृतीचे वर्णन करत पाककृती पूर्ण करावी. आपण काय काय केले याची क्रमवार उजळणी करावी. सर्व विद्यार्थ्यांना भेळ खाण्यास द्यावी.<br>६) त्याचप्रमाणे मुले घरी भेळ कशी करतात किंवा त्यासारखा एखादा पदार्थ याबद्दल बोलण्यास त्यांना प्रोत्साहन द्यावे. | जी पाककृती ठरवतील त्याप्रमाणे सर्व साहित्य | ७ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.8 (ब) : लिहिलेल्या मजकुरावर किंवा बघितलेल्या चित्रांवर आपल्या अनुभवांवर आधारित भाकीत करतो. | **कृती क्र. ५४ : पाककृती – पाककृतीवर चर्चा व कृतीचे लेखन**<br>पाककृती – (भेळ)<br>प्रत्यक्ष पदार्थ करून, खाऊन झाल्यानंतर आपण पाककृती करताना काय काय केले हे विचारत फळ्यावर लिहावे. मुलांनी कृतीचा क्रम मागेपुढे सांगितल्यास, त्यांच्याशी चर्चा करून पाककृतीचा क्रम जसा आहे तसा लिहावा.<br>भेळीचा रंग, वास, चव याबाबत मुलांशी बोलावे. त्या संबंधातील मुलांच्या घरच्या भाषेतील शब्द, काही नवे शब्द यांची ओळख करून द्यावी.<br>**विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी (CWSN) :** कदाचित काही मुलांना आठवण्यास अवघड जाईल; तर अशा वेळेस भेळीच्या कृतीचे फोटो किंवा चित्र दाखवून आठवण्यास प्रोत्साहन द्यावे. | | ७ |
| | **कृती क्र. ५५ : पाककृती – पाककृतीचे चित्र व स्वलिपीत लेखन**<br>पाककृती – (भेळ)<br>मुलांना हाच पदार्थ किंवा या सारखा दुसरा पदार्थ ते कशा पद्धतीने बनवितात त्याचे चित्र काढण्यास सांगावे व स्वलिपीत लिहिण्यास सांगावे. जसे : भेळीप्रमाणे कच्च्या पोह्यांचा चिवडा, किंवा चुरमुरे न घालता सुका भात घालून भेळ करत असतील तर ती पाककृती. | | ७ |
| | **कृती क्र. ५६ : पाककृती – लेखन प्रकाराची ओळख**<br>पाककृती – (भेळ)<br>या टप्प्यावर पाककृती या लेखन प्रकाराची ओळख करून द्यायची आहे. पाककृती ज्या क्रमाने लिहिली जाते. त्याक्रमाने त्याची उजळणी करत फळ्यावर/चार्टपेपरवर लिहावी. जसे : नाव, प्रमाणासह साहित्य, क्रमवार कृती, काही विशेष सूचना | | ७ |
| | **कृती क्र. ५७ : पाककृती – मला आवडणारी**<br>विद्यार्थ्यांना एखादी पाककृती विचारावी व वर्गासमोर/गटात सांगण्यास सांगावी. | | ७ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.8 (ब) : लिहिलेल्या मजकुरावर किंवा बघितलेल्या चित्रांवर आपल्या अनुभवांवर आधारित भाकीत करतो. | **कृती क्र. ५८ : पाककृती – मला आवडणारी (स्वलिपीत लेखन)**<br>विद्यार्थ्यांना त्यांनी सांगितलेल्या पाककृतीसाठी लागणाऱ्या साहित्याची यादी व नंतर कृती चित्र स्वरूपात व स्वलिपीत लिहिण्यास सांगावी. | कागद, तेलीखडू<br>पेन्सिल | ७ |
| | **कृती क्र. ५९ : मॅचिंग सेट – चित्र व शब्द कार्ड – चित्र चित्र जोडी**<br>चित्र शब्द कार्डे (एका वेळी ५ चा संच) मुलांसमोर ठेवावीत. साम्य असणाऱ्या चित्रांचे कार्ड घेऊन मुलांना ते जोडण्यास सांगावीत. चित्रावर बोट ठेवून चित्रांचे वाचन करावे. | मॅचिंग सेट –<br>चित्र शब्द कार्ड<br>संच<br>मराठी भाषा पेटी | २ |
| | **कृती क्र. ६० : मॅचिंग सेट – चित्र शब्द कार्ड – चित्र शब्द जोडी**<br>विद्यार्थ्यांनी समान चित्रांची जोडी लावल्यावर, त्याखाली लिहिलेल्या शब्दावर बोट ठेवून शब्द वाचून दाखवावा. व समान शब्द कार्ड त्याखाली ठेवून दाखवावे. विद्यार्थ्यांना चित्राला चित्र व शब्दाला शब्द लावण्याचा सराव द्यावा. | मॅचिंग सेट –<br>चित्र शब्द कार्ड<br>संच<br>मराठी भाषा पेटी | २, ३ |
| | **कृती क्र. ६१ : मॅचिंग सेट – चित्र शब्द कार्ड – शब्द शब्द जोडी**<br>विद्यार्थ्यांना शब्दाला शब्द कार्ड लावायला सांगावे. | शब्द कार्ड संच<br>मराठी भाषा पेटी | ३, ८ |
| | **कृती क्र. ६२ : मॅचिंग सेट – चित्र शब्द कार्ड – डॉमिनो**<br>चित्र शब्द चा डॉमिनो खेळण्यास द्यावा. | डॉमिनो | ८ |
| | **कृती क्र. ६३ : शब्द ओळखा**<br>एका टोपलीत आता पर्यंत शिकविलेले दृक्‌शब्दांचे कार्डे ठेवावेत. विद्यार्थ्यांनी कोणतेही कार्ड उचलावे व दृक् शब्द वाचून दाखवावे. जसे : फळा/ गाय | दृक्‌शब्दांचे कार्डे | ९ |
| | **कृती क्र. ६४ : चित्र वाक्य वाचा**<br>दृक्‌शब्द वाचन, दिलेल्या चित्रांचे वाचन करत मुलांना कृतिपत्रिकेत दिलेली वाक्ये वाचण्यास प्रोत्साहन द्यावे. जसे : गाय (दुधाचे चित्र)<br>मुलांनी वाचावे. गाय दूध देते. | कृतिपत्रिका<br>क्र. ३६ | ९ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.9 स्वत:चे नाव, मित्रांची नावे आणि आजूबाजूच्या परिसरातील वस्तूंची नावे लिहिण्यात रस दाखवितो. | **कृती क्र. ६५ : क्षेत्रभेट – प्रत्यक्ष भेट**<br>क्षेत्रभेट – क्षेत्रभेटीचा उद्देश केवळ माहिती संकलन नसून, एक समृद्ध अनुभव देणे हा असावा.<br>विद्यार्थ्यांच्या परिसरातील एखाद्या विशिष्ट जागेला भेट देण्यासाठी मुलांना न्यावे. जसे : गोठा, पंक्चर काढायचे दुकान, धोबीघाट, पोस्ट ऑफिस, एखादा लघुउद्योग इ.<br>१) आपण क्षेत्रभेटीसाठी कोठे, कधी, किती वाजता जाणार आहोत याबद्दल मुलांशी व पालकांशी बोलावे. क्षेत्रभेटी दरम्यान मुलांना सांभाळण्यासाठी काही पालकांची मदत घ्यावी. मुलांना आवश्यक वस्तू बरोबर घेण्यास सांगावे. जसे : टोपी, पाण्याची बाटली इ.<br>२) क्षेत्रभेटी दरम्यान विद्यार्थ्यांना निरीक्षण करण्यास मदत करण्यासाठी मुद्दे लिहून ठेवावेत. विशिष्ट शब्द, क्रिया यांची मुलांना ओळख करून दयायची असल्यास त्यांची नोंद करावी.<br>३) मुलांना पूर्वकल्पना दिल्यावर आपण तेथे काय पहाणार आहोत याची थोडी कल्पना दयावी. मुलांच्या मनात त्या जागेबद्दल/कामाबद्दल काही प्रश्न असतील, तर ते विचारून नमूद करून ठेवावेत.<br>४) मुलांना त्या ठिकाणी सूचना न करता सहज बोलण्यातून क्षेत्राचे नीट निरीक्षण करण्यास सांगावे.<br>५) मुलांना प्रश्न विचारण्यास, अधिक जाणून घेण्यास प्रोत्साहन दयावे. शक्य असेल तेथे वास, स्पर्श, चव इ. चा अनुभव घेण्यास मदत करून, क्षेत्रभेटीचा अनुभव अधिकाधिक समृद्ध करावा.<br>**विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी (CWSN) :** काही विद्यार्थ्यांना निरीक्षण करण्यास अडचण असू शकते. अशा विद्यार्थ्यांना योजनाबद्ध रीतीने निरीक्षण करण्यास मदत करावी. त्यांना काही प्रश्न भेटी दरम्यान, आधी व नंतर विचारून मदत करावी. तसेच भेटीआधी काही फोटो दाखवून, निरीक्षणासाठीची पूर्व तयारी करून घेता येईल. | | ७ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.9 स्वत:चे नाव, मित्रांची नावे आणि आजूबाजूच्या परिसरातील वस्तूंची नावे लिहिण्यात रस दाखवितो. | **कृती क्र. ६६ : क्षेत्रभेटीवर चर्चा**<br>१) क्षेत्रभेट झाल्यावर वर्गात आल्यानंतर मुलांनी काय काय पाहिले/काय निरीक्षण केले/ त्यांना कसे वाटले? याबाबत गप्पा माराव्यात. त्यांना या सहलीत काय आवडले? काय नाही आवडले? काय नव्याने कळले? कशाचे आश्चर्य वाटले? अजून काही प्रश्न मनात आले का? हे प्रश्न आणि त्यांचे पूर्वानुभव या बाबत गप्पा माराव्यात. | | ४<br>४, १० |
| | **कृती क्र. ६७ : क्षेत्रभेट विद्यार्थ्यांसाठी लिहिणे**<br>१) यानंतर मुलांचे निरीक्षण/अनुभव एकेकाला विचारत फळ्यावर लिहावेत. (विद्यार्थ्यांना एक किंवा दोन वाक्यात सांगण्यास सांगावे.) त्यासमोर मुलाचे नाव लिहावे.<br>२) वाक्य लिहिताना प्रत्येक शब्दाचा मोठ्याने उच्चार करत वाक्य फळ्यावर लिहावे.<br>३) त्यानंतर सर्व वाक्ये वाचून दाखवीत कोणी कोणते वाक्य सांगितले हे विचारावे.<br>४) ही वाक्ये एका चार्टपेपर वर लिहून वर्गात मुलांना येता जाता वाचता येतील अशा ठिकाणी लावून ठेवावीत.<br>५) काही दिवसांनी ही वाक्ये विद्यार्थ्यांना पुन्हा वाचून दाखवावीत.<br>६) एखाद्या क्षेत्रभेटी दरम्यान रस्त्याने जाताना येताना तुम्हांला कोणकोणत्या पाट्या दिसल्या हे विचारून, त्यावरील मजकूर फळ्यावर लिहावा व त्यांचे वाचन करून घ्यावे. | | ४, १० |
| | **कृती क्र. ६८ : स्वलिपीतील लेखन**<br>क्षेत्रभेटीचे चित्र काढण्यास सांगावे व स्वलिपीत चित्राखाली त्यांचा अनुभव लिहिण्यास सांगावे. | | ४, १० |
| | **कृती क्र. ६९ : अक्षर खेळ – आवाजाची ओळख**<br>ठरविलेल्या अक्षराचा आवाज असणाऱ्या वस्तू शिक्षकांनी गोळा कराव्यात. वस्तू दाखवीत, वस्तूचे नाव विचारत या शब्दांत म असा आवाज आला का? असे विचारावे. त्यानंतर मुलांना म आवाज असणारे शब्द सांगण्यास मदत करावी. त्यासाठी सूचक प्रश्नांची यादी तयार ठेवावी.<br>जसे : चिव चिव करणारी कोण? पाण्यात रहाणारा कोण?<br>हाच उपक्रम नंतर इतर आवाजांची ओळख करून देताना करावा. जसे : क, म , न.... | अशा वस्तू / चित्र ज्यांच्या नावात 'म' आवाज आहे. जसे : चमचा, रुमाल, माप 'क' आवाज घेताना – कप, केरसुणी, कात्री, कागद इ. | ९, १०<br>११ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.9 स्वतःचे नाव, मित्रांची नावे आणि आजूबाजूच्या परिसरातील वस्तूंची नावे लिहिण्यात रस दाखवितो. | **कृती क्र. ७० : अक्षर खेळ – शब्द टोपली**<br>शब्द टोपली – एका पिशवीत खूप साऱ्या वस्तू ठेवाव्यात. त्यातील 'म' आवाज असणाऱ्या वस्तू मुलांनी ओळखून उचलाव्यात.<br>हाच उपक्रम नंतर इतर आवाजांची ओळख करून देताना करावा. जसे – क, म, न.... | विविध वस्तू त्यांची छोटी चित्रे (माकडाचे, मगरीचे, माशांचे चित्र,) मोठी टोपली/खोके | ९, १०, ११ |
| | **कृती क्र. ७१ : अक्षर खेळ – कृतिपत्रिका**<br>कृतिपत्रिकेवर म आवाज असणाऱ्या चित्रांना गोल करण्यास सांगावे.<br>हाच उपक्रम नंतर इतर आवाजांची ओळख करून देताना करावा.<br>जसे – क, म, न.... | कृतिपत्रिका क्र. ३७, ४१, ४३ | ९, १०, ११ |
| | **कृती क्र. ७२ : मुक्त चित्र काढणे**<br>मुलांना आवश्यक साहित्य देऊन, त्यांना हवे ते चित्र काढण्यास सांगावे. (त्यांना कोणताही विषय अथवा बघून काढण्यासाठी चित्र देऊ नये.)<br>दुसऱ्या दिवशी त्या चित्राखाली स्वलिपीत चित्राचे वर्णन लिहिण्यास सांगावे. | कागद (पाठ कोरे पण चालतील), तेलीखडू, पाण्याचे रंग, फळा, पांढरा/रंगीत खडू, फरशी | ९, १०, १२ |
| | **कृती क्र. ७३ : गोष्टीचे चित्र काढणे.**<br>मुलांना त्यांनी ऐकलेल्या गोष्टीचे चित्र काढण्यास सांगावे. स्वलिपीत चित्राला नाव देण्यास/गोष्ट लिहिण्यास सांगावे. शिक्षकांनी त्याखाली मुलांना विचारत गोष्ट पुन्हा लिहून काढावी. | कागद, पेन्सिल, खडू, पुस्तक | ५, ९, १० |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.9 स्वत:चे नाव, मित्रांची नावे आणि आजूबाजूच्या परिसरातील वस्तूंची नावे लिहिण्यात रस दाखवितो. | **कृती क्र. ७४ : सूचना ऐकून चित्र काढणे**<br>१) मुलांना सूचना ऐकून त्याप्रमाणे चित्र काढण्यास सांगावे.<br>उदा. कागदाच्या मधोमध एक गोल काढा, गोलावर एक फूल काढा. गोलाच्या खाली एक चांदणी काढा.<br>२) सूचना टप्प्या–टप्प्याने अवघड/गुंतागुंतीच्या करत जाव्यात. | कागद, पेन्सिल, खडू, पुस्तक | ६, ८ |
| | **कृती क्र. ७५ : भेट कार्ड तयार करणे आणि शुभेच्छा लिहिणे**<br>१) विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्य देऊन त्यांना भेट कार्ड तयार करण्यास सांगावे.<br>२) भेट कार्डावर स्वलिपीत शुभेच्छा लिहिण्यास सांगावे. आवश्कतेनुसार मदत करावी. काय लिहिले हे विचारून शिक्षकांनी त्याखाली लिहावे. | कागद, पेन्सिल, खडू, पुस्तक | ८, १० |
| | **कृती क्र. ७६ : यादी तयार करणे**<br>विद्यार्थ्यांना एखाद्या जागेशी निगडित वस्तूंची/आवडत्या पदार्थासाठी लागणाऱ्या सामानाची स्वलिपीत यादी करण्यास सांगावी. विविध विषय देता येतील. उदा. स्वयंपाकघर, बाग. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विचारून त्याशेजारी लिहावे. | कागद, पेन्सिल, खडू, पुस्तक | ७, ९ |
| | **कृती क्र. ७७ : स्वत:चे पुस्तक बनविणे**<br>मुलांना साहित्य उपलब्ध करून द्यावे. त्याचा उपयोग करून ४ पानांचे/६ पानांचे पुस्तक तयार करण्यास सांगावे. विषय मुले निवडू शकतात– माझे कुटुंब किंवा मी कसा? मला काय आवडते. किंवा आमचे पाहुणे इ. | कागद, पेन्सिल, खडू, पुस्तक | ७, ९ |
| | **कृती क्र. ७८ : हवामान बघून त्याचे चित्र काढणे. त्याचे वर्णन स्वलिपीत लिहिणे**<br>विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर जाऊन आज वातावरण कसे आहे त्याचे निरीक्षण करण्यास सांगावे. त्याचे चित्र काढून आजचे हवामान कसे आहे त्यांची स्वलिपीत नोंद करण्यास सांगावे. सलग पाच दिवस ही नोंद ठेवल्यावर, पाचव्या दिवशी मुलांनी आपापल्या नोंदी सादर करून त्यावरून आठवडा भर हवामान कसे होते याबाबत निष्कर्ष मांडावेत.<br>आकाश कसे दिसते – ऊन आहे की ढग आहेत? थंडी आहे का? धुके आहे की हवा साफ आहे, असे काही मुद्दे निरीक्षणासाठी सुचविता येतील. | कागद, पेन्सिल, खडू, पुस्तक | १२ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| ECL 1 3.9 स्वतःचे नाव, मित्रांची नावे आणि आजूबाजूच्या परिसरातील वस्तूंची नावे लिहिण्यात रस दाखवितो. | **कृती क्र. ७९ : विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडत्या पुस्तकाचे चित्र बघून/न बघता काढण्यास त्याबाबत लिहिण्यास सांगावे.**<br>विद्यार्थ्यांना वाचन कोपऱ्यातून त्यांचे आवडते पुस्तक आणून त्याचे चित्र काढण्यास सांगावे. काढलेल्या चित्रावरून गोष्ट लिहिण्यास प्रोत्साहित करावे. नंतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विचारून स्वलिपीखाली त्यांनी सांगितलेली गोष्ट त्यांच्याच शब्दांत लिहावी. | कागद, पेन्सिल, खडू, पुस्तक | ६ |
| | **कृती क्र. ८० : आवडत्या वस्तूचे चित्र काढून स्वलिपीत त्या वस्तूबद्दल लिहिणे.**<br>विद्यार्थ्यांना कोणतीही आवडती वस्तू स्वतःसमोर आणून ठेवण्यास सांगावे. वस्तू बघून त्याचे चित्र काढण्यास सांगावे व त्या बाबत स्वलिपीत लिहिण्यास सांगावे. त्या वस्तूबद्दल काय व का आवडते? काय आवडत नाही हे लिहिण्यास मदत करावी. जसे : एखाद्या मुलाचे दप्तर, त्याचा रंग आवडतो किंवा ते मला माझ्या आजीने दिले म्हणून आवडते. | कागद, पेन्सिल, खडू, पुस्तक | ८, १२ |
| | **कृती क्र. ८१ : आवडत्या व्यक्तीचे चित्र काढून स्वलिपीत आवडत्या व्यक्तीबद्दल लिहिणे.**<br>विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडत्या व्यक्तीचे चित्र काढून, त्या चित्रातील व्यक्तीचे काय आवडते त्याबाबत लिहिण्यास सांगावे. यामध्ये मुलांनी त्यांच्या घरातील प्राण्यांचा, पक्ष्यांचा समावेश केला, तर त्याचा कौतुकाने स्वीकार करावा. | कागद, पेन्सिल, खडू, पुस्तक | १२ |

## (G3) ध्येय ३ - मुले सक्रिय अध्ययनार्थी बनतात आणि त्यांच्या लगतच्या परिसराशी जोडली जातात. (Goal 3 - Involved Learner)

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.1 : सभोवतालच्या परिसराची माहिती जाणून घेण्यासाठी व निरीक्षणासाठी सर्वसंवेदी अंगांचा किंवा अवयवांचा वापर करतो. | **कृती क्र. १ : हवामान तक्ता**<br>शैक्षणिक साहित्यात दिल्याप्रमाणे हवामान तक्ता तयार करावा. विद्यार्थ्यांनी रोज वर्गाबाहेर जाऊन निरीक्षण करावे व तक्त्यावर त्याची नोंद करावी. | चार्ट पेपर, स्केचपेन, रबर, कात्री | १ |
| | **कृती क्र. २ : आवाज ऐकणे व ओळखणे.**<br>१) विद्यार्थ्यांना अर्धगोलात बसवावे.<br>२) विद्यार्थ्यांना डोळे बंद करून वर्गातील व परिसरातील आवाज लक्षपूर्वक ऐकायला सांगावे.<br>३) कोणकोणते आवाज ऐकले यासंदर्भात चर्चा करावी.<br>४) मोबाईलचा आणि विविध तत्सम साधनांचा वापर करून विविध आवाज ऐकवावे.<br>५) ते आवाज कशाचे आहेत ते ओळखण्यास सांगावे.<br>६) तसा आवाज तुम्हांला काढता येतो का? तसा प्रयत्न करा. असे विद्यार्थ्यांना सांगावे. डबीतील विविध वस्तूंचे ध्वनी ऐकविणे व ओळखणे. डबीतील वस्तू विद्यार्थ्यांना दाखवाव्यात. डबी बंद करून व डबी हलवून आवाज ऐकवावा. विद्यार्थ्यांना डोळे बंद करून आवाज ऐकवावेत. ते आवाज ओळखण्यास सांगावे. (उदा. विविध प्राण्यांचे, पक्ष्यांचे आवाज मोबाईलवरून ऐकवावे.)<br>**विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी (CWSN) :** काही विद्यार्थी नीट आवाज ओळखू शकत नसतील, तर त्यांचे आवाज न ओळखण्याचे कारण समजून घेण्यासाठी त्यांना आणखी काही आवाज ऐकवावे. तरीही आवाज ऐकण्यास/ओळखण्यास अडचण येत असेल, तर त्या विद्यार्थ्याला ऐकण्यात अडचण येत नाही ना? याबाबत त्याच्या पालकांशी चर्चा करावी. | मोबाईल किंवा उपलब्ध साहित्य<br><br>डब्या – साखर, तांदूळ, गोट्या, दगड, घुंगरू | १ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.1 : सभोवतालच्या परिसराची माहिती जाणून घेण्यासाठी व निरीक्षणासाठी सर्वसंवेदी अंगांचा किंवा अवयवांचा वापर करतो. | **कृती क्र. ३ : ‘सांगा सांगा लवकर सांगा, कोणता रंग हवा सांगा’ हा खेळ (टिपी टिपी टिप टॉप)**<br>१) विद्यार्थ्यांना मैदानात घेऊन जावे किंवा बाक नसलेल्या वर्गातही हा खेळ घेता येईल.<br>२) आज आपण ‘टिपी टिपी टिप टॉप’ हा खेळ खेळणार आहोत. तुम्ही ‘सांगा सांगा लवकर सांगा, कोणता रंग हवा सांगा’ असे विचारा. मग मी एक रंग सांगेन; जसे की – लाल मग तुम्ही लाल रंगाच्या वस्तूला स्पर्श करायचा. ज्याला लाल रंगाची वस्तू सापडणार नाही त्याच्यावर राज्य येईल आणि तो पुढील रंग सांगेल. अशाप्रकारे विद्यार्थ्यांना खेळाची ओळख करून द्यावी. एखादा डाव खेळून झाल्यावर विद्यार्थ्यांना त्यांचे त्यांना खेळू द्यावे.<br>**विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी (CWSN) :** खेळ मित्र (play buddy) विशेष गरज असणाऱ्या विद्यार्थ्यांना खेळ मित्र (play buddy) द्यावा. | विविध रंगांच्या वस्तू | १ |
| | **कृती क्र. ४ : धान्यांची ओळख.**<br>१) वेगवेगळ्या वाट्यांमध्ये वेगवेगळी धान्ये ठेवावीत. जसे – तांदूळ, गहू, वेगवेगळ्या डाळी, बाजरी, नाचणी, ज्वारी इ.<br>२) विद्यार्थ्यांना प्रत्येक धान्य दाखवीत पुढील प्रश्न विचारावेत. – याला काय म्हणतात? याचे काय काय बनवितात, हे कोणत्या रंगाचे आहे? याचा आकार कसा आहे? हात लावल्यावर कसे लागते?<br>३) विद्यार्थ्यांना विचार करून उत्तर देण्यास वेळ द्यावा.<br>४) योग्य उत्तराची पुनरावृत्ती करत त्यातील बारकाव्यांकडे लक्ष वेधावे. जसे – बाजरी राखाडी व एका बाजूने पांढरट आहे.<br>५) पुढे जाऊन दोन धान्यांतल्या फरकांकडे लक्ष वेधावे. जसे – मूगडाळ व उडीदडाळ सारखीच आहे का? काय फरक दिसतो? किंवा ज्वारी आणि नाचणी दोन्ही गोलच आहेत. मग फरक काय दोन्हीत? विद्यार्थ्यांना निरीक्षण करून बोलण्यास वाव द्यावा. | विविध धान्ये | १, २ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.1 : सभोवतालच्या परिसराची माहिती जाणून घेण्यासाठी व निरीक्षणासाठी सर्वसंवेदी अंगांचा किंवा अवयवांचा वापर करतो. | ६) शिक्षकांनी नवीन शब्दांची भर घालावी. निरीक्षणास मदत करतील असे प्रश्न विचारावेत. योग्य उत्तर न आल्यास आपण स्वत: उत्तर द्यावे.<br>७) शेवटी उजळणी करावी.<br>८) काही दिवस धान्य वाटीत ठेवावे. नंतर प्लॅस्टिकच्या पिशवीत घालून त्याखाली नाव लिहून तक्ता करावा व विद्यार्थ्यांना सहज दिसेल असा लावून ठेवावा. | | |
| | **कृती क्र. ५ : फळे व भाज्यांची ओळख.**<br>कृतिपत्रिकेत दिल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना फळे व भाज्या ओळखण्यास सांगावे. वर्गात चर्चा घ्यावी. | कृतिपत्रिका<br>क्र. २<br>पेन्सिल | १ |
| | **कृती क्र. ६ : रंग ओळखणे.**<br>कृतिपत्रिकेत दिल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना विविध आकारांमध्ये, दिलेले रंग भरण्यास सांगावेत. | कृतिपत्रिका<br>क्र. १ तेलखडू | १ |
| | **कृती क्र. ७ : चला खेळूया.**<br>१) वेगवेगळ्या चवीचे पदार्थ एका मोठ्या ताटात किंवा वेगवेगळ्या वाट्यांमध्ये घ्यावेत. वाट्या झाकलेल्या असाव्यात.<br>२) एका विद्यार्थ्याचे डोळे बांधून एकेक पदार्थ त्याच्या तोंडात घालत पदार्थ ओळखण्यास सांगावे. त्याची चव कशी लागली हे सांगण्यास सांगावे. (चव सांगताना, पदार्थाचे नाव सांगताना, विद्यार्थ्याच्या घरच्या भाषेतील शब्दांचा स्वीकार करावा. आवर्जून विचारावे.)<br>३) पहिल्या विद्यार्थ्याला ५ ते ६ पदार्थ ओळखण्यास सांगितल्यावर आता पुढील विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी हा खेळ घेतील. असे करत चव/पदार्थाचे नाव योग्य सांगितले की, नाही हे विद्यार्थ्यांना ठरविण्यास सांगावे.<br>४) दुसऱ्या दिवसासाठी या खेळाची तयारी दोन गटांत विद्यार्थ्यांना करायला सांगावी. गटातील एका विद्यार्थ्याला चव न ओळखता आल्यास दुसऱ्या विद्यार्थ्याला संधी देता येईल. गटातील सर्व विद्यार्थ्यांना एक एक पदार्थ ओळखण्यास सांगावे. जो गट सर्वाधिक चवी बरोबर ओळखेल तो गट जिंकेल. | लिंबू, मीठ, साखर, तुरटी, चिंच, कारले, कांदा, लसूण इ. | १ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.1 : सभोवतालच्या परिसराची माहिती जाणून घेण्यासाठी व निरीक्षणासाठी सर्वसंवेदी अंगांचा किंवा अवयवांचा वापर करतो. | ५) पदार्थांमध्ये रोजच्या वापरातील पदार्थ घ्यावेत. जसे – गूळ, साखर, मीठ, कढीपत्ता, लिंबू, टोमॅटो, चिंच, बडीशेप, लसूण, आलं, काकडी, गाजर, मेथी, शेपू, कोथिंबीर, पोळीचा तुकडा, भाकरीचा तुकडा, भात, बिस्किटाचा तुकडा, आवळा इ.<br>६) काही विशिष्ट भागातील भाज्या असतील, शिजवलेले पदार्थ असतील, तर तेही यात घेता येतील. | | |
| | **कृती क्र. ८ : ओळख पाहू कशाचा हा वास?**<br>१) 'चव ओळखा' खेळाप्रमाणेच पटकन वास येणारे आणि सहज ओळखता येणारे पदार्थ जमा करून गंध ओळखण्याचा खेळ घेता येईल. विद्यार्थ्यांनी वास घेऊन वस्तूचे नाव ओळखायचे आहे.<br>२) केवळ वासावरून ओळखता न आल्यास चव किंवा नंतर स्पर्श करून बघता येईल. (उदा. फुले, लसूण, कांदा, लिंबू, पुदिना, कढीपत्ता, लोणचे इ.)<br>३) हा खेळ विद्यार्थी शिक्षकांसाठी किंवा पालकसभेला पालकांसाठी घेता येऊ शकेल.<br>४) सर्व प्रकारचे वास एकत्रित हुंगण्यास देऊ नयेत. जास्तीत-जास्त ३-४ वासच एकावेळी द्यावेत. | लसूण, व्हिक्स, डेटॉल, कांदा, कापूर, हिंग, अत्तर, साबण इ. | १ |
| | **कृती क्र. ९ : विविध वस्तू स्पर्श करून ओळखणे.**<br>१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट करावेत. एका गटातील विद्यार्थी शाळेच्या परिसरात फेरफटका मारून काही वस्तू गोळा करून आणतील. (जसे की – दगड, झाडांची पाने, फुले, जवळ पिकणारी एखादी भाजी, वर्गातील काही वस्तू इ.<br>२) सर्व वस्तू एका पिशवीत किंवा पुठ्ठ्याच्या बॉक्समध्ये ठेवाव्यात.<br>३) दुसऱ्या गटातील विद्यार्थ्यांचे डोळे बांधून त्यांना एक एक वस्तू स्पर्श करून, हाताळून ओळखण्यास सांगावी.<br>४) नंतर हाच खेळ दुसऱ्या गटासाठी घेता येईल.<br>**विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी (CWSN)** : जर दिव्यांग विद्यार्थी असेल, तर त्याला कृती करण्यासाठी जोडीदार सोबत द्यावा. | वेगवेगळ्या वस्तू उदा. कापड, लोकर, ठोकळा, दगड, चेंडू, पान इ. | २ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.1 : सभोवतालच्या परिसराची माहिती जाणून घेण्यासाठी व निरीक्षणासाठी सर्वसंवेदी अंगांचा किंवा अवयवांचा वापर करतो. | **कृती क्र. १० : परिसरातील फुलांची ओळख.**<br>१) विद्यार्थ्यांना बाहेर जाऊन आपल्या आसपास कोणकोणती फुले दिसतात हे बघून येण्यास सांगावे. जवळ फुले नसतील, तर आदल्या दिवशी विद्यार्थ्यांना सांगावे की, तुमच्या आसपास दिसणारी वेगवेगळी फुले बघून या; शक्य असल्यास एक एक फूल नमुन्यादाखल आणा. हे करताना जवळजवळ राहाणाऱ्या विद्यार्थ्यांची जोडी करावी व त्यांना मिळून फुले आणण्यास सांगावे.<br>२) सर्व विद्यार्थ्यांची फुले एकत्रित ठेवून, समान फुलांचे गट करण्यास सांगावेत.<br>३) त्यानंतर एक एक फूल घेत ते कोठून आणले? त्यांचे नाव काय? त्याचा वास कसा आहे? ते कधी कधी दिसते? त्याचा काय वापर करतात? अशा प्रश्नांच्या माध्यमातून फुलांची ओळख करून द्यावी. | परिसरातील फुले | २ |
| IL 3.2 : सभोवतालच्या परिसरातील वस्तू, पदार्थ, ध्वनी, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी आणि घटना इत्यादींची.<br>त्यांच्या नावासह ओळख सांगतो आणि त्यांचे सूक्ष्म गुण– वैशिष्ट्यांसह वर्णन करतो. | **कृती क्र. ११ : परिसरातील प्राणी**<br>**पाळीव व जंगली प्राणी ओळखणे.**<br>१) विद्यार्थ्यांना अर्धगोलात बसवावे.<br>२) जंगलात राहतात त्यांना जंगली प्राणी म्हणतात आणि जे प्राणी घरात पाळले जातात, त्यांना पाळीव प्राणी म्हणतात, एवढे सांगून कृतिपत्रिका द्यावी. ८, ९, १० पहाण्यास सांगावे.<br>३) कृतिपत्रिकेत दिल्याप्रमाणे प्राण्यांची चित्रे कापून जंगली प्राण्यांना जंगलाच्या चित्रात (कृतिपत्रिका १०) चिकटवायला सांगावे, तर पाळीव प्राण्यांना घराच्या चित्रात (कृतिपत्रिका ९) चिकटवायला सांगावे, प्रत्येक विद्यार्थ्याला आपापली कृती करू द्यावी. विद्यार्थ्यांना प्राणी ठरविण्यात अडचण येत असल्यास मदत करावी.<br>४) सर्व विद्यार्थ्यांचे काम पूर्ण झाल्यावर एकेका प्राण्याचे नाव घेत त्याबद्दल चर्चा करावी? जसे – हा प्राणी जंगली प्राणी का? तो काय खातो? दिवसभर काय करतो? आपले रक्षण कसे करतो? तुम्ही याला कोठे पाहिले आहे? प्रत्यक्ष किंवा टीव्ही वर? | कृतीपत्रिका क्र. ८, ९, १०<br>कात्री, तेलीखडू, खळ | ३ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| | ५) या प्राण्याचे तुम्हांला काय आवडते? कशाची भीती वाटते? जसे – रंग आवडतो, नखांची भीती वाटते असे. | | |
| IL 3.2 : सभोवतालच्या परिसरातील वस्तू, पदार्थ, ध्वनी, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी आणि घटना इत्यादींची.<br>त्यांच्या नावासह ओळख सांगतो आणि त्यांचे सूक्ष्म गुण– वैशिष्ट्यांसह वर्णन करतो. | **कृती क्र. १२ : तरंगणे/बुडणे**<br>१) मैदानात एक पाण्याची बादली किंवा मोठा टब भरून पाणी ठेवावे. विद्यार्थ्यांना मैदानात न्यावे व आज आपण इथे एक खेळ खेळणार आहोत असे सांगावे.<br>२) विद्यार्थ्यांना मैदानात ठेवलेल्या बादलीत टाकता येईल अशी एक एक वस्तू आणायला सांगावी. मुळे, पान, दगड, काठी इ. वस्तू.<br>३) शिक्षकांनी लाकडी ठोकळा, प्लॅस्टिकच्या बाटलीचे झाकण इ. पाण्यात तरंगणाऱ्या आणि बुडणाऱ्या वस्तू स्वत:सोबत ठेवाव्यात.<br>४) सर्व वस्तू एकत्रित ठेवून, त्यातील एकेक वस्तू एकेका विद्यार्थ्याला मैदानात ठेवलेल्या बादलीत टाकायला सांगावी.<br>५) सगळ्यांना निरीक्षण करायला सांगावे.<br>६) पदार्थ पाण्यावर तरंगतो की बुडतो? का? या प्रश्नांवर चर्चा करावी. तरंगणे–बुडणे संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावी. | पाण्याने भरलेली बादली/टब, कागदाचे तुकडे / प्लॅस्टिकचे तुकडे, दगड, नाणे, झाडाची पाने, फुले इ. | ३, ५ |
| | **कृती क्र. १३ : पाण्याचा रंग आणि विरघळणे**<br>१) शिक्षकांनी काही विद्यार्थ्यांकडे पाण्याने अर्धे भरलेले पेले द्यावेत.<br>२) विद्यार्थ्यांना सांगावे, की आज आपण पाण्याच्या काही गमती–जमती पाहूया. विद्यार्थ्यांच्या हातात एक–एक पुडी द्यावी. (या पुड्यांमध्ये निळा, लाल, हिरवा रंग, मीठ, साखर, माती इ. पदार्थ असतील.)<br>३) शिक्षकांनी सांगावे, 'आता प्रत्येकाने आपल्याकडे दिलेली पुडी उघडा.' 'पुडीमध्ये काय आहे?' हे प्रत्येकाला विचारावे. अपेक्षित उत्तरे आल्यावर विद्यार्थ्यांना सांगावे. 'आता आपल्या पुडीतील पदार्थ पाण्यात टाका. पाणी सांडणार नाही अशारीतीने तो पदार्थ पाण्यात मिसळा.'<br>४) पाण्यात काय बदल दिसून आला ते प्रत्येकाला विचारावे. | पाण्याचे पेले, माती, हिरवा, निळा, लाल रंग मीठ, साखर यांच्या छोट्या पुड्या | ४, ५ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| | ५) रंग बदलला असेल तर का बदलला?, पाण्याला आधी कोणता रंग होता? यावर चर्चा करावी. पदार्थ पाण्यात दिसेनासा झाला म्हणजेच विरघळला. हे उत्तर विद्यार्थ्यांकडून मिळविण्याचा प्रयत्न करावा. असे कोणकोणते पदार्थ पाण्यात मिसळतात हेही विचारू शकता. | | |
| IL 3.3 (अ) : एकाचवेळी पाहिलेल्या अनेक वस्तूंपैकी ४–५ वस्तू आठवून सांगतो. | **कृती क्र. १४ : लक्षात ठेवा**<br>१) आज आपण कोणाला किती लक्षात राहते त्याचा खेळ खेळणार आहोत. मी काही वस्तू तुम्हाला दाखविणार व नंतर झाकणार. तुम्ही सगळ्या वस्तू लक्षात ठेवून मला सांगायच्या.<br>२) आता एकेका विद्यार्थ्याला पुढे बोलवावे.<br>३) एका ताटात किंवा कोपऱ्यात पाच ते सहा वस्तू मांडून ठेवाव्यात. जसे – पान, फूल, डस्टर, तांब्या, पट्टी. विद्यार्थ्याला एक मिनिट वस्तू बघू द्याव्यात नंतर त्या झाकाव्यात.<br>४) विद्यार्थ्याला पहिलेल्या वस्तूंची नावे सांगण्यास सांगावीत.<br>५) विद्यार्थ्याने जास्तीत जास्त वस्तू आठवून सांगणे अपेक्षित आहे.<br>६) काही विद्यार्थी झाल्यावर वस्तूंचा संच बदलावा.<br>**विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी (CWSN) :** काही विद्यार्थ्यांना वस्तू लक्षात ठेवणे अवघड जात असेल, तर वस्तूंची संख्या कमी करावी. | विविध, रोजच्या वापरातील मुलांच्या परिचयातील वस्तू, वस्तू झाकण्यासाठी कापड | १ |
| | **कृती क्र. १५ : चित्रातील फरक ओळखा**<br>विद्यार्थ्यांना दोन सारख्या दिसणाऱ्या; परंतु थोडा फरक असणाऱ्या चित्रातील फरक ओळखायला सांगावा. – यासाठी कृतीपुस्तिकेत दिलेली चित्रे व वर्तमानपत्रात लहान मुलांच्या पानावर येणारी चित्रेही वापरता येतील. कृती झाल्यानंतर फरकांबाबत चर्चा करावी. | कृतिपत्रिका क्र. ५, ६ | २ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.3 (ब) : दिलेल्या ओळखीच्या वस्तू – चित्रातील हरविलेले किंवा राहिलेले ३–५ भाग ओळखतो. | **कृती क्र. १६ : चित्रातील लपलेली चित्रे शोधा.**<br>मोठ्या चित्राचा भाग असणारी छोटी छोटी चित्रे शोधण्यास सांगावीत. | कृतिपत्रिका क्र. १२, १३, १४, १५ | ३ |
| | **कृती क्र. १७ : चित्रातील अपूर्ण भाग ओळखा.**<br>शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिलेली चित्रे बघण्यास सांगून, त्यातील अपूर्ण भाग ओळखण्यास सांगावे. त्या भागाचे चित्र काढून चित्र पूर्ण करण्यास सांगावे. | कृतिपत्रिका क्र. १७ | ४ |
| | **कृती क्र. १८ : चित्रातील गमती जमती ओळखा.**<br>शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कृतिपत्रिकेतील चित्र दाखवून, त्यातील चुकीचा भाग ओळखण्यास सांगावे. | कृतिपत्रिका क्र. १८ | ४ |
| IL 3.4 : दोन गटातील ५–६ वस्तूंची एकास एक संगती लावतो. | **कृती क्र. १९ : एकास एक संगती – पेक्षा जास्त**<br>१) विद्यार्थ्यांचे दोन समान गट तयार करावे व त्यांना गटात बसवावे.<br>२) समोर दोन टोपल्यांमध्ये काही पेन्सिली व काही रबर ठेवावेत.<br>३) दोन्ही टोपल्या विद्यार्थ्यांसमोर ठेवत विचारावे पेन्सिली जास्त की खोडरबर जास्त? विद्यार्थ्यांना अंदाज बांधू द्यावा. आता आपण बघूयात असे सांगावे.<br>४) एका गटातील प्रत्येक विद्यार्थ्यांने एक पेन्सिल व दुसऱ्या गटातील प्रत्येक विद्यार्थ्याने एक खोडरबर असे उचलण्यास सांगावे व पेन्सिल–खोडरबर अशा जोडीने उभे राहण्यास सांगावे.<br>५) काय उरले? पेन्सिल. म्हणजे खोडरबर पेक्षा पेन्सिली जास्त आहेत हे सांगावे.<br>६) अशाप्रकारे वेगवेगळ्या वस्तूंचे संच देऊन एकास एक संगती लावण्याची संधी द्यावी व कमी–जास्त या संकल्पनेचे दृढीकरण करावे. | दोन टोपल्या, पेन्सिल, खोडरबर, खडू इ. | ५, ६ |
| | **कृती क्र. २० : एकास एक संगती – पेक्षा कमी**<br>१) विद्यार्थ्यांना अर्धगोलात बसवावे.<br>२) पाच पेन व तीन खोडरबर घ्यावेत.<br>३) दोन्ही संच विद्यार्थ्यांसमोर ठेवत विचारावे पेन जास्त की खोडरबर? विद्यार्थ्यांना अंदाज बांधू द्यावा. आता आपण बघूयात असे म्हणून जोड्या लावाव्या. | वही, पेन, पेन्सिल, खडू, पाने, दगड, बिल्ले, खोडरबर इ. | ५, ६ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.4 : दोन गटांतील ५–६ वस्तूंची एकास एक संगती लावतो. | ४) एक पेन एक खोडरबर, एक पेन एक खोडरबर. असे म्हणत पेन व खोडरबर यांच्या जोड्या लावाव्या. उरलेले पेन दाखवत विचारावे, या पेनांसाठी जोडी म्हणून आता खोडरबर शिल्लक आहेत का? नाही. म्हणजेच पेनांपेक्षा खोडरबर कमी आहेत. असे सांगावे. विद्यार्थ्यांना म्हणण्यास सांगावे. आता तीच कृती विद्यार्थ्यांकडून करून घ्यावी. विधान परत सांगावे.<br>५) आता विद्यार्थ्यांना पुढील संच द्यावा – चार खोडरबर, सहा पेन्सिली, पुन्हा अंदाज विचारून जोड्या लावण्यास सांगावे. विधान म्हणून घ्यावे. | | |
| | **कृती क्र. २१ : एकास एक संगती – जेवढे तेवढे**<br>१) विद्यार्थ्यांना अर्धगोलात बसवावे.<br>२) पाच पेन व पाच खोडरबर घ्यावेत.<br>३) दोन्ही संच विद्यार्थ्यांसमोर ठेवत विचारावे पेन जास्त की खोडरबर? विद्यार्थ्यांना अंदाज बांधू द्यावा. आता आपण बघूयात असे म्हणून जोड्या लावाव्या.<br>४) एक पेन एक खोडरबर, एक पेन एक खोडरबर.. असे म्हणत पेन व खोडरबर यांच्या जोड्या लावाव्या. काही उरले का? नाही. म्हणजे जेवढी खोडरबरे तेवढीच पेन आहेत असे सांगावे. विद्यार्थ्यांना म्हणण्यास सांगावे. आता तीच कृती विद्यार्थ्यांकडून करून घ्यावी. विधान परत सांगावे.<br>५) आता विद्यार्थ्यांना पुढील संच द्यावा – सहा खोडरबर, सहा पेन्सिली, पुन्हा अंदाज विचारून जोड्या लावण्यास सांगावे. विधान म्हणून घ्यावे. | वही, पेन, पेन्सिल, खडू, पाने, दगड, बिल्ले, खोडरबर इ. | ५, ६ |
| | **कृती क्र. २२ : विधानावरून वस्तू मांडून दाखविणे.**<br>१) विद्यार्थ्यांना पुरेसा सराव झाल्यावर आता विविध वस्तूंचे संच त्यांच्या समोर ठेवावेत व आता मी वाक्य सांगणार आहे, तुम्ही वस्तू मांडून दाखवायच्या आहेत असे सांगावे.<br>२) एक उदाहरण करून दाखवावे. जसे – मी सांगितले, टोपणांपेक्षा खोडरबर जास्त आहेत. आता मी जोड्या मांडते. एक टोपण एक खोडरबर असे करत काही जोड्या मांडाव्यात. अजून २/३ खोडरबर जोड्यांच्या शेजारी ठेवावीत. बघा, टोपणांपेक्षा खोडरबर जास्त आहेत. | वही, पेन्सिल, खडू, पाने, दगड, बिल्ले, खोडरबर, टोपण इ. | ६ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.4 : दोन गटातील ५–६ वस्तूंची एकास एक संगती लावतो. | ३) महत्त्वाचे म्हणजे आपल्याला विद्यार्थ्यांना मोजणी येणे अपेक्षित नाही. त्यामुळे एक, दोन असे मोजायचे नाही. किती वस्तू घ्यायच्या हे पूर्णपणे विद्यार्थ्यांनी ठरवावे.<br>४) परंतु संचात ठेवताना १० पेक्षा जास्त वस्तू ठेवू नयेत. १० पेन, १० टोपणे, १० खोडरबर असेच ठेवावे.<br>५) पेक्षा कमी, पेक्षा जास्त, जेवढे तेवढे सर्व विधानांसाठी हा खेळ घ्यावा. | | |
| | **कृती क्र. २३ : दिलेल्या चित्रावरून विधान योग्य की चूक ते ठरवणे.**<br>कृतिपत्रिका : दिलेल्या वस्तूंच्या जोड्या लाव व दिलेले विधान योग्य असेल तर बरोबरची खूण कर, चूक असेल तर चुकीची खूण कर. | कृतिपत्रिका क्र. ३०, ३१ | ७ |
| | **कृती क्र. २४ : विधानावरून चित्र काढणे.**<br>जसे विधानावरून वस्तू मांडण्यास सांगण्याचा खेळ घेतला, त्याच प्रमाणे आता विधानावरून चित्र काढण्यास सांगावे. (विद्यार्थ्यांना चित्रात सहज व पटकन काढता येतील अशाच वस्तू विधानात सांगाव्यात.) | कागद, पेन्सिल | ५ |
| | **कृती क्र. २५ : कितीने कमी, कितीने जास्त**<br>१) विद्यार्थ्यांना पाचपर्यंत मोजणी येऊ लागल्यावर जोड्या लावल्यावर किती पेन उरले त्यांनुसार खोडरबरांपेक्षा पेन तीनने जास्त असे विधान सांगावे.<br>२) उदाहरण देताना माझ्याकडे काही खोडरबर आहेत व खोडरबरांपेक्षा खडे तीनने जास्त आहेत. असे विधान देऊन वस्तू मांडण्यास सांगावे. नंतर काही दिवसांनी विधानावरून चित्र काढण्यास सांगावे.<br>३) याच्या सरावानंतर माझ्याकडे पाच खोडरबरे आहेत व खोडरबरांपेक्षा तीन खडे जास्त आहेत. असे विधान देऊन वस्तू मांडण्यास सांगावे. नंतर काही दिवसांनी विधानावरून चित्र काढण्यास सांगावे. | वही, खडे, खडू, पाने, दगड, बिल्ले, खोडरबर इ. | १० |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.5 : तीन गुणधर्मावरून वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो. उदा. आकार, माप आणि रंग इत्यादी. वस्तूच्या स्थिती संबंधित/स्थलदर्शक योग्य शब्द वापरून वस्तूंचे वर्णन करतो. उदा. : बाजूला, आतमध्ये, खाली इ. | **कृती क्र. २६ : आजचा आकार**<br>१) आकारांची ओळख करून देण्याच्या आठवड्यात फळ्यावर रोज एका आकाराचे कार्ड लावावे. त्याचे नाव व त्या आकाराच्या काही वस्तू विद्यार्थ्यांना सांगाव्यात.<br>२) विद्यार्थ्यांना त्या आकाराच्या वस्तू वर्गात, वर्गाबाहेर जाऊन शोधून आणायला सांगावे किंवा त्याचे चित्र/ठेवलेली वस्तू दाखविण्यास सांगावी.<br>३) शाळेतून घरी जाताना आणि घरून शाळेत येताना या आकाराच्या कोणकोणत्या वस्तू दिसल्या यावर चर्चा घडवून आणावी. | विविध आकाराचे कार्ड्स (गोल, चौकोन, त्रिकोण, आयत) | २ |
| | **कृती क्र. २७ : विविध वस्तूंचा वापर करून आकाराची रचना करणे.**<br>१) सुरुवातीला जो आकार आज वर्गात फळ्यावर लावला असेल, तोच आकार जमिनीवर खडूने काढावा.<br>२) विद्यार्थ्यांना काही वस्तू (उदा. खडे, पाने, फुले, बिया इ.) आणून आकारावर मांडण्यास सांगाव्यात. | खडे, झाडांची पाने, बिया, इ. | २ |
| | **कृती क्र. २८ : डोंगराला आग लागली पळा–पळा–पळा**<br>१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सहज हातात धरता येतील अशी विविध आकारांची कार्ड्स कापून, एका खोक्यात एकत्रित करून ठेवावीत.<br>२) जमिनीवर खडूने अंतरा अंतरावर मोठे आकार काढावेत.<br>३) आता विद्यार्थ्यांना खोक्यातून एक एक आकाराचे कार्ड घेऊन गोलात उभे राहण्यास सांगावे.<br>४) खंजिरी वाजली, की गोलात पळायला सांगावे व म्हणावे 'डोंगराला आग लागली विद्यार्थी म्हणतील पळा–पळा–पळा' शिक्षक खंजिरी थांबवून म्हणतील, 'त्रिकोणातले सगळे वाचतील की, ज्या विद्यार्थ्यांच्या हातात त्रिकोणाच्या आकाराचे कार्ड असेल त्यांनी जमिनीवर काढलेल्या त्रिकोणात जाऊन उभे रहाणे अपेक्षित आहे. ज्यांच्या हातात त्रिकोण नाही त्यांनी हातातील कार्ड्स वर दाखवून आहे तिथेच स्थिर उभे राहणे अपेक्षित आहे. हालल्यास किंवा त्रिकोणात गेल्यास/आपल्या हातातील कार्डाच्या | खडू, विविध आकाराचे कार्ड्स | ३ |


| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.5 : तीन गुणधर्मांवरून वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो. उदा. आकार, माप आणि रंग इत्यादी. वस्तूच्या स्थिती संबंधित/स्थलदर्शक योग्य शब्द वापरून वस्तूंचे वर्णन करतो. उदा. : बाजूला, आतमध्ये, खाली इ. | आकारात गेल्यास तो गडी बाद होईल. खेळ पुन्हा चालू होईल. विद्यार्थी खोक्यातून नवे कार्ड उचलतील.<br>५) हाच खेळ कधी वेगळ्या पद्धतीने घेता येईल. कार्डशीटचे मोठे मोठे आकार कापून वर्गात वेगवेगळ्या भिंतींवर चिकटवावेत व शिक्षकांनी आकाराचे नाव घेताच त्या आकाराजवळ जाऊन उभे राहावे. जो विद्यार्थी दुसऱ्या आकाराजवळ जाईल तो बाद होईल. | | |
| | **कृती क्र. २९ : विविध आकारांनुसार वर्गीकरण**<br>१) गणित पेटीतील विविध आकारांचे फोमचे ठोकळे देऊन एका आकाराच्या ठोकळ्यांचे गट करायला सांगावेत.<br>२) आकारांनुसार गट करण्यासाठी जमिनीवर वेगवेगळे रकाने आखून द्यावेत. | गणित पेटीतील फोमचे ठोकळे | ३ |
| | **कृती क्र. ३० : अनेक गुणधर्मांनुसार वर्गीकरण**<br>१) वर्गीकरणाचा खेळ तयार करून ठेवावा.<br>२) सुरुवातीला एकच फासा वापरणे अपेक्षित आहे. जसे – फाशावर लाल रंगाचे दान पडले, तर सर्व पत्त्यांमधून सर्व आकारांचे, सर्व प्रकारची नक्षी असलेले लाल रंगाचे पत्ते शोधून काढायचे आहेत. अशा प्रकारे फक्त आकाराचा फासा व नंतर फक्त नक्षीचा फासा वापरून एका गुणधर्माचा विचार करून वर्गीकरण करायचे आहे.<br>३) पुढील टप्प्यावर दोन फासे घेऊन दोन गुणधर्मांचा विचार करून वर्गीकरण करायचे आहे. जसे – दोन फासे टाकल्यावर लाल रंग (रंगाच्या फाशावर) व त्रिकोण (आकाराच्या फाशावर) असे दान पडल्यास लाल रंगाचे, सर्व नक्षीचे (आता आपण नक्षीचा विचार करत नाही म्हणून सर्व नक्षी असलेले पत्ते), केवळ त्रिकोण बाजूला करणे अपेक्षित आहे किंवा गोल आकाराचे, सर्व रंगांचे केवळ चांदण्यांची नक्षी असलेले पत्ते बाजूला काढणे अपेक्षित आहे.<br>४) अशा प्रकारे जेव्हा तीनही फासे घेऊन वर्गीकरण करू तेव्हा तीनही गुणधर्मांचा विचार करून एकच पत्ता शोधणे अपेक्षित असेल जसे – लाल रंगाचा गोल आकाराचा चांदण्यांच्या नक्षीचा एकच पत्ता असेल तो शोधून बाजूला करणे अपेक्षित आहे किंवा | कृतिपत्रिका क्र. ४५, ४५ अ, ४६, ४६ अ | १२ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
| --- | --- | --- | --- |
| IL 3.5 : तीन गुणधर्मांवरून वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो. उदा. आकार, माप आणि रंग इत्यादी. वस्तूच्या स्थिती संबंधित/स्थलदर्शक योग्य शब्द वापरून वस्तूंचे वर्णन करतो. उदा. : बाजूला, आतमध्ये, खाली इ. | निळ्या रंगाचा, त्रिकोणी आकाराचा, ठिपक्या ठिपक्यांची नक्षी असलेला असा एकाच पत्ता असेल.<br>५) अर्थात् असे दान पडलेला, तीनही गुणधर्म पूर्ण करणारा एकच पत्ता आहे हे विद्यार्थ्यांना शोधून ठरवू द्यावे/ निष्कर्षाप्रती येऊ द्यावे.<br>यानंतर कृतिपत्रिका क्र. ४५ सोडविण्यास द्यावी. | | |
| IL 3.6 : क्रमवारिता – घटनांच्या क्रमानुसार, वस्तूंचे आकारमान व आकारांनुसार वस्तू/चित्रकार्ड क्रमाने लावतो. | **कृती क्र. ३१ : एकाच प्रकारच्या वस्तूंची लहानापासून मोठ्यापर्यंत मांडणी करणे (क्रमवारिता)**<br>१) शिक्षकांनी एकाच प्रकारच्या वस्तू उदा. वेगवेगळ्या लांबीच्या पेन्सिल, वेगवेगळ्या लांबीच्या काड्या, वेगवेगळ्या लांबीचे दोरीचे तुकडे, कंगवे, पाने, दगड घ्यावेत.<br>२) विद्यार्थ्यांना तीनही पेन्सिली दाखवत सांगावे माझ्याकडे तीन वेगवेगळ्या लांबीच्या पेन्सिली आहेत. यातील सर्वांत लांब पेन्सिल कोणती? सर्वांत आखूड कोणती? एकदम आखूड नाही एकदम लांब नाही अशी मध्यम आकाराची पेन्सिल कोणती असे विचारत पेन्सिली क्रमवार ठेवून दाखवाव्यात.<br>३) आता विद्यार्थ्यांना इतर वस्तू अशा क्रमवार लावण्यास सांगाव्यात. गरज पडल्यास मदत करावी. | वेगवेगळ्या लांबीच्या पेन्सिली, वेगवेगळ्या लांबीच्या काड्या, विविध आकारमानाची पाने (छोटी, मध्यम मोठी), विविध आकारमानांचे डबे, बरण्या इ. | ७ |
| | **कृती क्र. ३२ : क्रमवारितेची विधाने १**<br>१) हा खेळ पुरेसा दोन दिवस खेळून झाल्यावर क्रमवारितेची पुढील गणिती विधाने विद्यार्थ्यांना सांगून त्यांच्या कडून म्हणून घ्यावीत. जसे – लाल पेन्सिल सर्वांत लांब आहे. निळी पेन्सिल सर्वांत आखूड आहे. पिवळी पेन्सिल मध्यम आकाराची आहे.<br>२) आता विद्यार्थ्यांना इतर वस्तू क्रमवार लावून, त्यांचे योग्य विधान वापरून वर्णन करण्यास सांगावे.<br>३) विद्यार्थ्यांना विधान सांगून त्यानुसार योग्य वस्तू देण्यास सांगावे. जसे – लाल पेन्सिलपेक्षा आखूड पेन्सिल द्या. मुलांनी इतर दोन्ही पेन्सिल उचलून देणे अपेक्षित आहे. इतर मुलांना त्याने योग्य वस्तू दिली का हे विचारावे. | वेगवेगळ्या लांबीच्या पेन्सिली, वेगवेगळ्या लांबीच्या काड्या, विविध आकारमानांची पाने (छोटी, मध्यम मोठी), विविध आकारमानांचे डबे, बरण्या इ. | ८ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.6 : क्रमवारिता – घटनांच्या क्रमानुसार, वस्तूंचे आकारमान व आकारांनुसार वस्तू/चित्रकार्ड क्रमाने लावतो. | **कृती क्र. ३३ : क्रमवारितेची विधाने २**<br>१) विद्यार्थ्यांना वरील विधानांचा सराव झाल्यावर थोड्या अवघड विधानांकडे वळता येईल. जसे – चार वेगवेगळ्या लांबीच्या पेन्सिली क्रमवार ठेवून विचारता येईल की पिवळ्या पेन्सिल पेक्षा लांब व लाल पेन्सिल पेक्षा आखूड पेन्सिल कोणती? ती उचलून दे.<br>२) त्यानंतर विद्यार्थ्यांना अशाप्रकारचे विधान करण्यास सांगावे. | वेगवेगळ्या लांबीच्या पेन्सिली, वेगवेगळ्या लांबीच्या काड्या, विविध आकारमानांची पाने (छोटी, मध्यम मोठी), विविध आकारमानांचे डबे, बरण्या इ. | ८ |
| IL 3.7 : गोष्टीचे पाठांतर करताना घडलेल्या घटनांचा वेळ व क्रम समजतो. जसे की मेण अगोदर आले असेल, कोणती घटना प्रथम घडली असेल इ. | **कृती क्र. ३४ : घटनाक्रम**<br>(कृतिपुस्तकेत दिलेले चित्र १ मुलांना दाखवून सांगावे. मी तुम्हांला काही चित्रे दाखविणार आहे यातील पहिल्यांदा काय होते, त्यानंतर काय होते व शेवटी काय होते ते तुम्ही मला सांगायचे. ही चित्रे क्रमाने लावायची आहेत. पहिले चित्र झाल्यावर दुसरे चित्र दाखवावे व वेळेच्या संदर्भात मुलांशी बोलावे; जसे सकाळी आपण काय करतो? दुपारी काय करतो? संध्याकाळी व रात्री काय करतो? मुलांना त्यातील चित्रे चर्चा करत क्रमाने लावण्यास मदत करावी. | कृतिपुस्तिका क्र. २३, २४, २५ | ५ |
| IL 3.8 (अ) : दैनंदिन सामान्य परिस्थितीतील समस्यांवर कारणासह उपाय सुचवितो. | **कृती क्र. ३५ : प्रश्न सोडवू**<br>१) विद्यार्थ्यांना सांगावे. आज मला काही प्रश्न सोडवायला तुमची मदत हवी आहे. तुम्ही सूचवा आपण काय करू शकतो?(मुलांना भांडणाऱ्या मुलांचे चित्र दाखवावे) ही मुले बसण्याच्या जागेवरून भांडत आहेत त्यांना दोघांना एकच जागा बसायला. हवी आहे. आता काय करावे? मुलांकडून उत्तरे घ्यावीत. अशाप्रकारे विविध समस्या मुलांसामोर | मुलांशी निगडित विविध समस्या असणारी छोटी चित्रे. | ५ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| | मांडाव्यात व त्यावर उपाय शोधण्यास सांगावे. यासाठी कृतिपत्रिका क्र. २९ मधील चित्रांचा वापर करता येईल.<br>२) विद्यार्थ्यांसमोर असा प्रसंग किंवा समस्या कधी आली होती का? त्यांनी ती कशी सोडविली याबाबत त्यांना बोलते करावे. | (संदर्भ पुस्तक – शहाणी मुले चांगली मुले – गरवारे बालभवन) | |
| IL 3.8 (ब) : सभोवतालच्या परिसरातील वस्तू हाताळताना त्यांच्याविषयी अधिक चौकशी करतो,<br>प्रश्न विचारतो, नवनवीन वस्तू शोधून काढतो आणि त्या वस्तूंविषयी स्वत:च्या कल्पना विकसित करून काही अंदाज बांधतो. | **कृती क्र. ३६ : प्रयोग करू**<br>१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कुंडीत बी लावण्यास मदत करावी. बी किती दिवसात वाढेल? कधी रोप येईल? या विषयी विद्यार्थ्यांना विचारावे. त्यांना अंदाज बांधू द्यावा. काय काय काळजी घ्यावी लागेल? जर रोप खोलीत ठेवले, पाणी नाही घातले तर काय होईल या परिणामांची चर्चा करावी. दर काही दिवसांनी रोपाचे निरीक्षण करून व त्याची नोंद कृतिपत्रिका क्र. १९ वर करण्यास सांगावे.<br>२) कृतिपत्रिका क्र. २२ नुसार रोप कसे कसे वाढते ही चित्रे क्रमाने लावण्यास सांगावे. | पुस्तक, कृतिपत्रिका क्र. १९, २२ | ४ |
| IL 3.8 (क) : पर्यावरणाविषयी जाणीवजागृती आहे व पर्यावरणाशी निगडित समस्यांबाबत जागरूकता व संवेदनशीलता दाखवितो. जसे– पाणी वाया घालवू नये इ. | **कृती क्र. ३७ : चांगले नागरिक**<br>कृतिपत्रिका क्र. २७ ची कृती घ्यावी व त्यानंतर चांगल्या नागरिकांच्या कृती याविषयी चर्चा करावी. | कृतिपत्रिका क्र. २७ | ५ |
| IL 3.9 : १० वस्तूंची मोजणी करतो. | **कृती क्र. ३८ : १० पर्यंत वस्तू मोजणे (१ ते ५ मोजणे)**<br>विद्यार्थ्यांना गोलात बसवावे. काही वस्तूंचे संच घेऊन एक एक ठेवत मोजून दाखवावे. उदा. एक, दोन.. पाच दगड, आता एकेका विद्यार्थ्याला वस्तू देऊन मोजून घ्यावे. (पाने, फुले, दगड, रबर असे विविध साहित्य द्यावे.) विद्यार्थ्यांना सराव करण्यास द्यावा. | वही, पुस्तके, पेन्सिली, मणी सहज उपलब्ध होणारे साहित्य उदा. खडे, बिया इ. | ७ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.9 : १० वस्तूंची मोजणी करतो. | **कृती क्र. ३९ : १० पर्यंत वस्तू मोजणे (६ ते १० मोजणी )**<br>विद्यार्थ्यांना गोलात बसवावे. काही वस्तूंचे संच घेऊन एक एक ठेवत मोजून दाखवावे. एक, दोन, सहा, सात, आठ ..... दहा दगड, आता एकेका विद्यार्थ्याला वस्तू देऊन मोजून घ्यावे. (पाने, फुले, दगड, रबर असे विविध साहित्य द्यावे.) विद्यार्थ्यांना दोघा दोघांत सराव करण्यास द्यावा. | वही, पुस्तके, पेन्सिली, मणी सहज उपलब्ध होणारे साहित्य उदा. खडे, बिया इ. | ७ |
| | **कृती क्र. ४० : १० पर्यंत वस्तू मोजणे – सराव**<br>१) विद्यार्थ्यांना गोलात बसवावे. वाटीत खडे घेऊन एकेका विद्यार्थ्याला समोर बोलवून, यातून मला तीन खडे काढून दे किंवा सहा खडे दे. असा सराव करून घ्यावा.<br>२) कधी कधी वस्तू समोर ठेवून किती पेन आहेत? मोज, असा सराव घ्यावा.<br>३) कधी कधी बाहेरून कोणत्याही पाच प्रकारच्या वस्तू आणा असे सांगता येईल. | वही, पुस्तके , पेन्सिली, मणी सहज उपलब्ध होणारे साहित्य उदा. खडे, बिया इ. | ८ |
| | **कृती क्र. ४१ : अंकाची गोष्ट**<br>आज आपण अंकांच्या गोष्टी तयार करूया.<br>१) शिक्षकांनी १ ते ९ मधील एक कार्ड समोर ठेवावे. कार्डावरील अंकाइतके विद्यार्थी एकत्र करून त्यांचे गट करून दाखवावे व त्या अंकाची गोष्ट तयार झाली असे सांगावे.<br>२) त्याचप्रमाणे वेगवेगळी अंककार्डे दाखवून तेवढ्याच विद्यार्थ्यांचा गट करण्यास सांगून अंकांच्या गोष्टी तयार करून घ्याव्यात.<br>३) अशाच प्रकारे वस्तू, दिवस, नाणी–नोटा, फळे–फुले इ. चा गोष्टीत वापर करून घेता येईल. उदा. माझ्याकडे ४ रुपयांची नाणी आहेत. | १ ते ९ अंकांची कार्ड | ८ |
| IL 3.10 : दिलेल्या अंकापासून ९ पर्यंत पुढे व मागे (उलट–सुलट) मोजतो. | **कृती क्र. ४२ : उलट मोजणी**<br>विद्यार्थ्यांना सूचना द्यावी १० जोडो ब्लॉक एकमेकांना जोडा व एकेक जोडो ब्लॉक कमी करत उलट क्रमाने (१०,९, ८, ...........) असे मोजत जा. | जोडो ब्लॉक | ८ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.10 : दिलेल्या अंकापासून ९ पर्यंत पुढे व मागे (उलट–सुलट) मोजतो. | **कृती क्र. ४३ : दिनदर्शिकेवर सुलट –उलट संख्या मोजणे**<br>एक दिनदर्शिका घ्यावी. कोणताही महिना काढून विद्यार्थ्यांना त्यावरील १ ते १० तारखा वाचण्यास सांगावे. त्या तारखा पुन्हा उलट क्रमाने वाचण्यास सांगावे. | दिनदर्शिका | १२ |
| IL 3.10 : दिलेल्या अंकापासून ९ पर्यंत पुढे व मागे (उलट–सुलट) मोजतो. | **कृती क्र. ४४ : १० गोलावरून चालणे.**<br>१) जमिनीवर १० वर्तुळे सरळ रेषेत काढावी.<br>२) ५ वर्तुळांनंतर एक आडवी रेष मारावी. (५ चा टप्पा समजण्यासाठी.)<br>३) विद्यार्थ्यांना १ वर्तुळापासून उड्या मारायला सांगावे.<br>४) ५ वर किंचित थांबून पुन्हा ६ ते १० पर्यंत सुलट मोजणी करत उड्या मारायला सांगावे.<br>५) त्याचप्रमाणे उलट मोजणीसाठी १० ते ६ पर्यंत उड्या मारायला सांगावे : (रेषेच्या अगोदर किंचित थांबावे. )<br>६) ५ ते १ उलट मोजणी करत उड्या मारायला सांगावे. याप्रमाणे कोणत्याही अंकापासून कोणत्याही अंकापर्यंत सुलट व उलट मोजणी करता येईल.)<br>७) या खेळात विद्यार्थी उलटी मोजणी करतात का याकडे आवर्जून लक्ष द्यावे; जसे की – सातवर जायचे आहे, तर दहावर मोठी उडी मारून मग मागे सात वर उलटी उडी मारली.<br>८) या खेळात काहीच चूक किंवा बरोबर नाही (केवळ मोजताना १ ते १० मोजण्याची दिशा नेहमी एकच असावी.) विद्यार्थ्यांना खेळ समजून घेण्यासाठी पुरेसा वेळ आपापल्या पद्धतीने खेळण्याची मुभा द्यावी. |  | ९ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.12 : वस्तू संख्येने कमी कमी होत काहीच शिल्लक रहात नाही. या संकल्पनेबाबतची समज दाखवितो.<br>(उदा. झाडाच्या फांदीवर बसलेले ३ पक्षी एक एक करून उडून गेले. शेवटी एकही पक्षी फांदीवर उरला नाही.) | **कृती क्र. ४५ : काहीच शिल्लक नाही**<br>१) काही वस्तूंचा संच घेऊन गोलात बसावे.<br>२) पाच पेन्सिली घ्याव्यात.<br>३) माझ्याकडे पाच पेन्सिली होत्या. मी एक पेन्सिल मीनाला दिली, मग ग़ीता पण आली, बाई पेन्सिल हवी म्हणून; मग मी एक पेन्सिल तिला दिली. मग साऊ आली, मग माऊही आली ....असे करत चार पेन्सिली दिल्या.<br>४) आता माझ्याकडे किती पेन्सिली आहेत? विद्यार्थी सांगतील – एक, तेवढ्यात रशीद आला. त्याला पण पेन्सिल हवी होती. मी ही पण पेन्सिल देऊन टाकली.<br>५) आता माझ्याकडे किती पेन्सिली शिल्लक राहिल्या? (रिकामा हात दाखवत विचारावे.) विद्यार्थी सांगतील – काहीच नाही. – म्हणजेच शून्य.<br>६) अशीच एक कृती करून दाखवावी. पेपर घेऊन किंवा खडू घेऊन व काहीच शिल्लक नाही हे लक्षात आणून द्यावे. | पेन्सिली | १२ |
| IL 3.13 : दहापर्यंतच्या अंकांमधील दोन संख्यांची तुलना करतो. च्यापेक्षा जास्त आणि च्यापेक्षा कमी या शब्दांचा उपयोग करतो. | **कृती क्र. ४६ : मनोऱ्याचा खेळ**<br>१) विद्यार्थ्यांना विचारावे ६ जास्त की ८ जास्त? विद्यार्थ्यांची उत्तरे ऐकून घ्यावीत.<br>२) एखाद्या विद्यार्थ्याला तू कशावरून ठरवले असे विचारावे व त्याचे स्पष्टीकरण ऐकून घ्यावे.<br>३) विद्यार्थ्यांना सांगावे, आता आपण करून बघू या. गणित पेटीतील ठोकळे (जोडो ब्लॉक्स्) घ्यावेत. काही विद्यार्थ्यांना ६ तर काही विद्यार्थ्यांना ८ ठोकळे द्यावेत.<br>४) दिलेले ठोकळे विद्यार्थ्यांना जोडायला सांगावेत.<br>५) ठोकळे जोडून तयार झालेल्या मनोऱ्याची तुलना आपल्या मित्राने तयार केलेल्या मनोऱ्याशी करायला सांगावी.<br>६) कोणाचा मनोरा उंच आहे? का उंच आहे? हे प्रश्न विद्यार्थ्यांना विचारावेत. | जोडो ब्लॉक्स् | ९ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| | ७) आठ सहापेक्षा जास्त असतात या निष्कर्षास यावे.<br>८) आता अजून दुसऱ्या संख्या घेऊन विद्यार्थ्यांना उत्तर काढण्यास सांगावे. | | |
| | **कृती क्र. ४७ : काय कमी – काय जास्त**<br>१) विद्यार्थ्यांना विचारावे ६ जास्त की ८ जास्त? विद्यार्थ्यांची उत्तरे ऐकून घ्यावीत.<br>२) तुम्हांला वस्तूंच्या जोड्या लावण्याचा खेळ येतो. तो वापरून ठरवू शकू का? असे विचारावे. विद्यार्थ्यांना सुचल्यास त्यांनाच करू द्यावे. गरज लागल्यास पुढील प्रमाणे मदत करावी.<br>३) एकाला ६ पाने आणायला सांगावीत, तर एकाला थोडी वेगळ्या रंगाची ८ पाने आणण्यास सांगावीत. दोघांना सर्वांसमोर पानांची जोडी लावण्यास सांगावे. कोणती पाने उरली? ती किती होती? म्हणजेच असे म्हणू या का आठ पेक्षा सहा कमी किंवा असेही म्हणता येईल सहा पेक्षा आठ जास्त. | पाने, दगड, बिया, बिल्ले इ. | १० |
| IL 3.14 : ९ वस्तूंपर्यंत, दोन गट एकत्र करून पुनर्मांजणी करतो. | **कृती क्र. ४८ : तोंडी उदाहरणे – संच वाढणे**<br>१) काही वस्तूंचे संच सोबत घेऊन विद्यार्थ्यांबरोबर गोलात बसावे.<br>२) एका विद्यार्थ्याला समोर बोलावून म्हणावे, ''अमरकडे चार पेन्सिली होत्या मी त्याला अजून दोन पेन्सिली दिल्या तर आता त्याच्याकडे किती पेन्सिली झाल्या?'' (प्रत्यक्ष व्यवहार करून दाखवावा.) अमरला मोजून दाखविण्यास सांगावे.<br>३) अमरकडे किती पेन्सिली होत्या? मी त्याला अजून किती पेन्सिली दिल्या? आता त्याच्याकडे किती पेन्सिली झाल्या? असे प्रश्न विचारावेत.<br>४) आता दुसरे साहित्य वापरून तसेच उदाहरण घालावे. विद्यार्थ्यांना साहित्य वापरून व्यवहार करून बघण्यास सांगावे व उत्तरापर्यंत पोहोचावे. वरीलप्रमाणेच प्रश्न विचारून दृढीकरण करून घ्यावे.<br>५) लगेचच बेरजेचा व्यवहार दाखवून उदाहरण करावे. असा सराव केल्यावर विद्यार्थ्यांना उदाहरण घालण्यास सांगावे. (आहेत त्या वस्तूंवरून– पाने, फुले, वह्या इ.) अंक ओळख होण्याआधी विद्यार्थी अशी तोंडी उदाहरणे सोडवू शकतात. | पाने, दगड, बिया, पेन्सिल, पेन, रबर, बिल्ले इ. | ११ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.15 : ९ वस्तूंपर्यंतच्या गटातून वस्तू कमी करून पुनर्मोजणी करतो. | **कृती क्र. ४९ : मिळवूया – कमी करूया**<br>१) काही वस्तूंचे संच सोबत घेऊन विद्यार्थ्यांबरोबर गोलात बसावे.<br>२) एका विद्यार्थ्याला समोर बोलावून म्हणावे, ''अमरकडे चार पेन्सिली होत्या. त्यातील दोन पेन्सिली त्याने मला दिल्या तर, आता त्याच्याकडे किती पेन्सिली राहिल्या? (प्रत्यक्ष व्यवहार करून दाखवावा.) अमरला मोजून दाखविण्यास सांगावे.<br>३) अमरकडे किती पेन्सिली होत्या? त्याने मला किती पेन्सिली दिल्या? आता त्याच्याकडे किती पेन्सिली शिल्लक राहिल्या ? असे प्रश्न विचारावेत.<br>४) आता दुसरे साहित्य वापरून तसेच उदाहरण घालावे. विद्यार्थ्यांना साहित्य वापरून व्यवहार करून बघण्यास सांगावे व उत्तरापर्यंत पोहोचावे. वरीलप्रमाणेच प्रश्न विचारून दृढीकरण करून घ्यावे.<br>५) लगेचच वजाबाकीचा व्यवहार दाखवून गणित करावे. असा सराव केल्यावर विद्यार्थ्यांना उदाहरण घालण्यास सांगावे. (आहेत त्या वस्तू वरून– पाने, फुले, वह्या इ.) अंक ओळख होण्याआधी विद्यार्थी अशी तोंडी उदाहरणे सोडवू शकतात. | पाने, दगड, बिया, पेन्सिली, पेन, रबर, बिल्ले इ. | १२ |
| IL 3.20 : भारतीय चलनातील नोटा ओळखतो. | **कृती क्र. ५० : किती रुपये**<br>गणितपेटीतील (भास्कराचार्य) विविध नाणी–नोटांचा वापर करून विद्यार्थ्यांना प्रश्न विचारावे. उदा. ५ रु. ची नोट किंवा नाणे दाखवून हे किती रु. आहेत? यामधे तू काय विकत घेऊ शकतोस? असे प्रश्न विचारून विविध नाणी नोटांची ओळख करून द्यावी. | कृतिपत्रिका क्र. ४७<br>गणित पेटी | १० |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.20 : भारतीय चलनातील नोटा ओळखतो. | **कृती क्र. ५१ : बाजार**<br>जसा भातुकलीचा खेळ खेळतो, तसे आपण आज बाजार–बाजार खेळ खेळू या. असे सांगून विद्यार्थ्यांचे २ गट करावेत. विद्यार्थ्यांना पूर्वतयारी करण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा. आवश्यक तेथे मदत करावी. विद्यार्थी एकमेकांच्या गटाच्या बाजाराला भेट देतील व ग्राहकांची भूमिका करतील. या बाजारात खोटी नाणी, नोटा वापराव्यात किंवा कागदाचे पैसे तयार करावेत. | नाणी, नोटा, खेळण्यातला किंवा खरा तराजू, माप, विविध वस्तू – बिस्किटचा पुडा, कंगवा, रबर, पेन्सिल, रुमाल, टोपी इ. | १२ |
| IL 3.21 : लांबीच्या अनुषंगाने तीन वस्तूंची तुलना करतो. उदा. पेक्षा लांब, पेक्षा रुंद, पेक्षा उंच–पेक्षा आखूड | **कृती क्र. ५२ : लांब –आखूड/उंच बुटका**<br>शिक्षकांनी लांब आखूड साहित्याच्या काही जोड्या स्वत: जवळ शोधून ठेवाव्यात. विद्यार्थ्यांना गोलात बसवावे. एक एक जोडी पुढे ठेवत विचारावे, यातील लांब काठी कोणती?<br>आता याच्यापेक्षा छोटी काठी कोणती? याला आखूड काठी म्हणायचे. असेच आता शिक्षकांनी एक मोठी पेन्सिल व लहान पेन्सिल शेजारी ठेवून लांब व आखूड पेन्सिल, लांब व आखूड दोरी, पट्टी अशी विविध उदाहरणे विद्यार्थ्यांसमोर प्रत्यक्ष मांडावीत. त्यानंतर मुलांना अशी उदाहरणे परिसरातून शोधून आणण्यास सांगावे. (लक्षात असू द्या, हे करताना काठीची जाडी समान असावी.) अशा प्रकारे लांब आखूड ही संकल्पना स्पष्ट करावी. याठिकाणी विद्यार्थ्यांनी मातृभाषेतून उत्तरे दिली तरी स्वीकारावीत. त्या शब्दांना पर्यायी गणितीय शब्दांची विद्यार्थ्यांना ओळख करून द्यावी. याप्रमाणे तीन वस्तूंच्या तुलनेची उदाहरणे द्यावीत. | काड्या ,पेन्सिल इ. | ३ |
| | **कृती क्र. ५३ : लहान – मोठा ओळखणे**<br>लांब आखूड पाठाप्रमाणेच लहान मोठा ची संकल्पना दृढ करावी. त्यासाठी एकाच कंपनीच्या विविध आकारमानांच्या शाम्पू किंवा तेलाच्या बाटल्या वापरता येतील. वही, खोडरबर इ. वापरता येईल. कोणत्या वस्तूंसाठी लहान– मोठा कोणत्या वस्तूंसाठी लांब–आखूड वापरतो याबाबत बोलावे. | विविध आकारमानाच्या वस्तू उदा. शाम्पू किंवा चेंडू, फुगे, डबे, पाने, छत्री इ. | ३ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.21 : लांबीच्या अनुषंगाने तीन वस्तूंची तुलना करतो. उदा. पेक्षा लांब, पेक्षा रुंद, पेक्षा उंच-पेक्षा आखूड | **कृती क्र. ५४ : कृतिपुस्तिका – लहान मोठा, उंच बुटका**<br>कृतिपुस्तिका – लहान मोठा, उंच बुटका | कृतिपत्रिका क्र. १६ | ४ |
| IL 3.22 : दोन वस्तूंच्या वजनाची तुलना पेक्षा जड/पेक्षा हलका याप्रमाणे करतो. | **कृती क्र. ५५ : दोन वस्तूंमधील जड हलकी वस्तू ओळखणे**<br>१) लांब आखूड पाठाप्रमाणेच जड हलका ही संकल्पना दृढ करण्यासाठी जड व हलक्या वस्तूंच्या जोड्या शोधून ठेवाव्यात.<br>२) विद्यार्थ्यांना गोलाकार बसवावे. एका विद्यार्थ्याला पुढे बोलावून त्याच्या एका हातावर कापूस ठेवावा. विचारावे हा वजनाला कसा आहे? विद्यार्थ्यांकडून उत्तर येऊ द्या. हलका असे उत्तर अपेक्षित आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांच्या घरच्या भाषेतील शब्द दिला, तर तो स्वीकारावा व हलका या शब्दाची ओळख करून द्यावी. मग दुसऱ्या तळ हातावर साधारण त्याच आकारमानाचा दगड ठेवावा. विचारावे हा वजनाला कसे आहे? त्यांच्या कडून उत्तर आल्यावर विचारावे. दोन्ही मधील हलका कोणता जड कोणता? मग म्हणावे दगडापेक्षा कापूस हलका. अशाच प्रकारे अजून तीन चार जोड्यांची तुलना करून दाखवावी. समान आकाराचे वेफर्सचे पाकीट व साखरेचे पाकीट इ. | विविध वजनांच्या, साधारण सारखे आकारमान असणाऱ्या वस्तूंच्या जोड्या जसे – दगड – कापूस, कापड – वही, इ. | ४ |
| | **कृती क्र. ५६ : तराजू**<br>१) दोन समान आकारमानाचे प्लॅस्टिकचे डबे घेऊन त्याचा साधा तराजू बनवावा.<br>२) त्यात विद्यार्थ्यांना वजनाचा खेळ खेळण्यास द्यावा. जसे – एका पारड्यात बाटलीचे झाकण टाकले तर पारडी समान होण्यासाठी दुसऱ्या पारड्यात किती बटणे टाकावी लागतात? बटणे टाकून दाखवावीत. पारडी समान होतात म्हणजे काय हे दाखवावे. कधी थांबायला हवे हे पक्के करावे.<br>३) म्हणजे बाटलीच्या एका झाकणाचे वजन १५ बटणांच्या वजनाइतके आहे असे म्हणू शकतो का? असे विचारावे. | दोन समान आकार व वजनाचे डबे, दोरी, सरळ काठी किंवा फूटपट्टी इ. बटणे, रबर इ. वजनासाठी विविध छोट्या वस्तू. | ६<br>४ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.22 : दोन वस्तूंच्या वजनाची तुलना पेक्षा जड/पेक्षा हलका याप्रमाणे करतो. | ४) आता खोडरबरांचे वजन किती बटणे होईल हे शोधण्यास सांगावे. त्याआधी वर्गातील विद्यार्थ्यांना त्यांचा अंदाज विचारावा.<br>५) याचाच पुढे आलेख मांडता येईल. | https://youtube.com/watch?v=7Prz7n8cD9Qfeature=share `oWo qbH$ EodOr | |
| | **कृती क्र. ५७ : सूक्ष्मवजन काटा**<br>गणित पेटीतील वजनकाट्यावर एका पारड्यात छोटा दगड आणि दुसऱ्या पारड्यात त्याच आकाराचा प्लॅस्टिकचा चेंडू टाकावा, कोणत्या बाजूचे पारडे खाली झुकते? का झुकते? हे प्रश्न विद्यार्थ्यांना विचारावेत. | गणित पेटीतील सूक्ष्म वजनकाटा, वजन करण्यासाठी वस्तू | ६ |
| IL 3.23 : दोन भांड्यांमधील धारकतेची तुलना करतो.<br>जसे : बाटली, ग्लास, बादली इ. | **कृती क्र. ५८ : दोन वस्तूंमधील सामावून घेण्याच्या क्षमतांची तुलना व पाण्याच्या बाटली ची धारकता**<br>१) शिक्षकांनी एक ग्लास, एक बाटली (ग्लासपेक्षा मोठी) व एक छोटी बादली घ्यावी. विद्यार्थ्यांना दुसऱ्या मोठ्या बादलीत पाणी व मग आणण्यास सांगावे.<br>२) आता आपण प्रत्येक भांड्यात किती तांबे पाणी बसते हे बघणार आहोत. मी तांब्या पाण्याने काठोकाठ भरून घेणार आहे. प्रत्येक वस्तू पूर्ण भरण्यासाठी किती तांबे पाणी लागते हे तुम्ही मोजायचे आहे व लक्षात ठेवायचे आहे. असे सांगून पूर्ण तांबे भरून पाणी घेऊन बादली भरण्यास सुरुवात करावी.<br>३) छोटी बादली काठोकाठ भरेपर्यंत मगाच्या मापाने पाणी भरत राहावे.<br>४) भरताना मोठ्याने विद्यार्थ्यांबरोबर मोजावे. एक तांब्या.....दोन तांबे..... बादलीसाठी किती तांबे पाणी लागले याची उजळणी करावी.<br>५) त्यानंतर त्याच तांब्याने बाटली भरावी. बाटलीत किती मग पाणी मावले ते विचारावे.<br>६) तसेच आता ग्लासमध्ये किती तांबे पाणी मावते हे बघावे. अशाप्रकारे वेगवेगळ्या भांड्यांमध्ये समान मापाने पाणी भरून धारकतेची तुलना करून घ्यावी. | बादली, पेला, मग, पाण्याच्या बाटल्या | ११ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| | ७) अशाप्रकारे दुसऱ्या दिवशी हाच प्रयोग विद्यार्थ्यांना करून बघू द्यावा. त्याच बरोबर काही नवीन भांडी व नवीन मापही द्यावे. जसे – डबा, भांड/घमेल, बाटलीमध्ये किती वाटी पाणी मावते हे विद्यार्थ्यांना करून बघायला सांगावे.<br>८) लक्षात ठेवा, पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना केवळ हा अनुभव घेऊ द्या. दुसऱ्या दिवशी कोणत्या भांड्यात जास्त वाट्या पाणी मावेल? कोणत्या भांड्यात सर्वांत कमी वाट्या पाणी मावेल? असे प्रश्न विचारावेत.<br>९) पुढील दिवशी हाच उपक्रम घेताना शिक्षकांनी कृतिपुस्तिकेत दिल्याप्रमाणे फळ्यावर स्तंभालेख काढावा व एका वस्तूसाठी आपण आलेख कसा काढणार आहोत हे करून दाखवावे. पुढील दोन वस्तूंसाठी विद्यार्थ्यांना संधी द्यावी. त्यानंतर पुढील प्रश्न विचारून चर्चा करावी. –<br>१) भांड्यावरील सहा रकाने आपण का भरले? (कारण भांड्यात सहा वाट्या पाणी मावले.) हे उत्तर अपेक्षित आहे. प्रथम विद्यार्थ्यांना आपण आलेख असा का काढला आहे, याची स्पष्टता आली आहे का याची खात्री करावी.<br>२) त्यानंतर कोणत्या भांड्यात किती वाट्या पाणी मावले? कोणत्या भांड्यात कोणत्या भांड्यापेक्षा जास्त किंवा कमी वाट्या पाणी मावले असे प्रश्न विचारून चर्चा करावी. | | |
| IL 3.25 : त्रिमितीय वस्तूंच्या पृष्ठभागाचे रेखाटन सपाट पृष्ठभागावर केल्यावर द्विमितीय आकार ओळखतो. | **कृती क्र. ५९ : वस्तूची बाह्यरेखा काढणे.**<br>१) वर्गातील काही वस्तू घ्याव्यात. त्या वस्तू विद्यार्थ्यांना दाखवून त्यांची नावे विचारावीत.<br>२) कागदावर वस्तू ठेवून त्याची बाह्यरेषा पेन्सिलने काढावी.<br>३) मुलांना वस्तू आणि बाह्यरेषा काढलेले चित्र दाखवावे.<br>४) चित्र आणि वस्तू यांमध्ये दिसणाऱ्या फरकावर चर्चा करावी.<br>५) मुलांना ही कृती करायला सांगावी. | डबा, डस्टर, बाटली, पुस्तक इ. | ६ |
| | **कृती क्र. ६० : हाताच्या पंजाची बाह्यरेषा**<br>१) शिक्षकांनी फळ्यावर किंवा कागदावर (विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन) आपल्या हाताचा पंजा ठेवून त्याची बाह्यरेषा काढावी.<br>२) विद्यार्थ्यांनाही अशी कृती करायला सांगावे. | कागद, पेन्सिल, खडू | ३ |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.26 : अर्धी भाकरी/ पाण्याने भरलेला अर्धा ग्लास यांसारख्या शब्द-संपत्तीचा दैनंदिन व्यवहारात वापर करतो. | **कृती क्र. ६१ : जोड्या लावा.**<br>शिक्षकांनी वर्गात पूर्ण-अर्धा या संकल्पना चार ते पाच उदाहरणे देऊन प्रत्यक्ष कृती करून दाखवावी व कृतिपत्रिका सोडवून घ्यावी.<br>कृतिपत्रिका - पूर्ण व अर्धा भागाच्या जोड्या जुळवा. | कृतिपत्रिका क्र. ४० | १० |
| IL 3.27 : नवीन आकृतिबंध तयार करतो - पान, बोटे यांचे ठसे वापरून | **कृती क्र. ६२ : आकृतिबंध - ओळखा (परिसरातले)**<br>परिसरात असे आकृतिबंध कुठे कुठे दिसतात यासाठी बाहेर फेरफटका मारावा. विद्यार्थ्यांना काही चित्रांमध्ये हे मिळतात का हे शोधण्यासाठी चित्रे, फोटो उपलब्ध करून द्यावेत. यावर चर्चा करावी. टाळ्यांमधून आकृतिबंध कसा तयार होतो, विशिष्ट शारीरिक हालचालीतून हेही सांगावे. | | |
| | **कृती क्र. ६३ : आकृतिबंध - ओळख**<br>१) पाने, खडे गोळा करून ठेवावेत. विद्यार्थ्यांना गोलाकार बसवून मी आता कसे मांडते बघा असे सांगावे. एक पान दोन दगड एक पान दोन खडे असे बोलत मांडावे. आता काय येईल पुढे? मला हीच रचना पुढे न्यायची असेल तर पुढे काय मांडावे/ठेवावे लागेल? असे विचारून विद्यार्थ्यांकडून उत्तर घेऊन आकृतिबंध पूर्ण करावा.<br>२) त्यानंतर एक दोन आकृतिबंध सर्व विद्यार्थ्यांसमोर करून घ्यावेत.<br>३) चित्रात परत परत एक सारखी नक्षी काढणे. आपण कुठे बघतो? असे विचारून विद्यार्थ्यांना रांगोळी, कापडावरचे डिझाईन अशी काही उदाहरणे आठवण्यास मदत करावी. | खडे, पाने, काड्या, रबर, पेन्सिल इ. | ९ |
| | **कृती क्र. ६४ : आकृतिबंध -तयार करा**<br>विद्यार्थ्यांना आकृतिबंध तयार करण्यासाठी बाहेरून साहित्य गोळा करून आणण्यास सांगावे. जसे पाने, फुले व त्यापासून त्यांना आकृतिबंध तयार करण्यास सांगावे. | खडे, पाने, काड्या, रबर, पेन्सिल इ. | ९ |
| | **कृती क्र. ६५ : आकृतिबंध - कृतिपत्रिका**<br>मुलांना आकृतिबंध पूर्ण करण्यास द्यावेत. | कृतिपत्रिका क्र. ३८, ३९ | १० |

| अध्ययन निष्पत्ती | शिक्षकांसाठी सूचना | लागणारे साहित्य | आठवडा क्र. |
|---|---|---|---|
| IL 3.28 : आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीवरून निष्कर्ष काढतो. उदा. माझ्याजवळ निळ्या पेन्सिलींपेक्षा लाल पेन्सिली जास्त आहेत. | **कृती क्र. ६६ : निष्कर्ष काढणे**<br>कृतिपत्रिका ४२ करीता विद्यार्थ्यांना विचारावे या चित्रात कोणती खेळणी जास्त आहेत? कोणती कमी आहेत? विद्यार्थ्यांची उत्तरे ऐकून घ्यावीत. त्यानंतर कृतिपत्रिकेत दिल्याप्रमाणे शिक्षकांनी फळ्यावर स्तंभालेख काढावेत व सांगावे आपण अजून एका पद्धतीने हे ठरविणार आहोत. बघा यात किती बाहुल्या आहेत ते? प्रत्येक बाहुलीसाठी मी एक रकाना रंगविणार आहे. असे सांगून विद्यार्थ्यांना विचारत बाहुलीच्या चित्रावरील रकाने सलग भरावेत. आता इतर खेळण्याचे रकाने तुम्ही आपापल्या कृतिपत्रिकेत भरायचे आहेत असे सांगावे. सर्वांचे रकाने भरून झाल्यावर पुढील प्रश्न विचारत चर्चा करावी. गाडीवर सर्वांत जास्त खेळणी कोणती आहेत? सर्वांत कमी खेळणी कोणती आहेत?<br>वरील सूचनेप्रमाणे कृतिपत्रिका ४४ सोडवून घ्यावी. | कृतिपत्रिका क्र. ४२, ४४ | ११ |
| IL 3.29 : आठवड्याचे वार व वर्षाच्या महिन्यांची नावे सांगतो. | **कृती क्र. ६७ : आठवड्याचे वार ओळखा.**<br>आठवड्याच्या वारांची उजळणी घेण्यासाठी त्यावर आधारित काही तोंडी कोडी विचारावीत. जसे – शनिवार नंतर येतो मी, मुलांना शाळेला असते सुट्टी, आम्हां मुलांची खेळाशी गट्टी तर मी कोण? | – | १, ७ |
| | **कृती क्र. ६८ : महिने ओळखा.**<br>महिन्यावर आधारित तोंडी कोडी विद्यार्थ्यांना विचारावीत. त्यांना कोडी तयार करायला मदत करावी.<br>शाळा कोणत्या महिन्यात सुरू होते?<br>शाळेला मोठी सुट्टी कोणकोणत्या महिन्यात असते?<br>तुझा वाढदिवस कोणत्या महिन्यात असतो?<br>पाऊस कोणकोणत्या महिन्यात पडतो?<br>अशा प्रकारचे प्रश्न विचारून मुलांकडून महिन्यांची नावे काढून घ्यावीत. | – | ७ |

# ११) महिनावार मूल्यमापन तक्ता

| **मुलांच्या शाळापूर्व तयारीचा महिनावार सातत्यपूर्ण आढावा** | | | |
|---|---|---|---|
| **महिना – पहिला** | | | |
| **उद्‌दिष्ट –** मुलांचा शाळेतील रस वाढविणे व शाळेच्या परिसरात, वातावरणात त्यांचे समायोजन उत्तम रीतीने होणे. | | | |
| **विद्यार्थ्याचे नाव :** | | | |
| **विद्यार्थ्याचे वय :** | **इयत्ता :** पहिली | | |
| **वैयक्तिक स्वच्छता (चांगली किंवा सुधारणेची गरज वाटते)** | | | |
| कपडे | नखे | दात | डोळे |
| कान | नाक | केस | |
| | | | |
| **दैनंदिन कार्यक्रमातील समायोजन** | **क्वचित** | **कधी कधी** | **नेहमी** |
| • स्वत:च्या व इतरांच्या वस्तूंची काळजी घेतो. | | | |
| • शिक्षक, अनोळखी प्रौढ व इतर मुलांशी मिळून मिसळून वागतो. | | | |
| • इतर मुलांबरोबर वस्तू वाटून वापरतो. | | | |
| • स्वत:ची वेळ येईपर्यंत वाट बघतो. | | | |
| • उत्साहाने गटकार्यात भाग घेतो. | | | |
| • खेळाचे व दैनंदिन कामाशी निगडित नियमांचे पालन करतो. | | | |
| **मैदानी खेळांमधील सहभाग** | **मदतीची आवश्यकता असते** | **थोड्या प्रयत्नांनी करता येते.** | **सहज करता येते.** |
| • जोरात व सावकाश पळतो. | | | |
| • दोन हातांनी चेंडू फेकू व झेलू शकतो. | | | |
| **सर्जनशील कलात्मक उपक्रमांमध्ये सहभाग – सूक्ष्मकारक विकास, कल्पनाशक्ती व कलात्मक/सौंदर्य दृष्टीचा विकास** | **मदतीची आवश्यकता असते** | **थोड्या प्रयत्नांनी करता येते.** | **सहज करता येते.** |
| • दिलेल्या रंगांचे मणी ओवतो. | | | |
| • फाडणे व चिकटकाम करतो. | | | |
| • मातीकाम करतो. | | | |

| गणिती कौशल्ये व परिसराबद्दलची जागरूकता दाखविणे | मदतीची आवश्यकता असते | थोड्या प्रयत्नांनी करता येते. | सहज करता येते. |
|---|---|---|---|
| • पंचेंद्रियांचा वापर करून वस्तू ओळखतो. (स्पर्श, वास, चव, आवाज व दृष्टी) | | | |
| • दोन चित्रांची तुलना करून फरक ओळखतो. | | | |
| • मूळ रंगांचे वर्गीकरण करता येते. ओळखून नाव सांगता येते व जोडी लावता येते. | | | |
| • चित्रातील अपूर्ण भाग ओळखता येतो. | | | |
| **तोंडी अभिव्यक्ती** | **क्वचित** | **कधी कधी** | **नेहमी** |
| • मोठ्या माणसांशी व इतर मुलांशी मोकळेपणाने मुक्तपणे संवाद साधतो. | | | |
| • स्वतःच्या भावना, गरजा व आवडीनिवडी व्यक्त करतो. (बोलून व हावभावामधून) | | | |
| **अंकुरती वाचन कौशल्ये** | **क्वचित** | **कधी कधी** | **नेहमी** |
| • गाणी व गोष्टी लक्षपूर्वक ऐकतो. | | | |
| • चित्रातील वस्तूंची नावे सांगतो. | | | |
| • वाक्यातील शब्द सुटे करता येतात. | | | |
| **अंकुरत्या लेखनाची कौशल्ये** | **क्वचित** | **कधी कधी** | **नेहमी** |
| • पेन्सिल व्यवस्थित पकडतो. | | | |
| • गिरगिटतो किंवा विचार, प्रसंग, घटना दर्शविण्यासाठी चित्र काढतो. | | | |

वर्गशिक्षकाची स्वाक्षरी

| महिना – दुसरा | | | |
|---|---|---|---|
| **उद्‌दिष्ट** – पायाभूत क्षमतांचा विकास | | | |
| **विद्यार्थ्याचे नाव :** | | | |
| **विद्यार्थ्याचे वय :** | **इयत्ता :** पहिली | | |
| **वैयक्तिक स्वच्छता (चांगली किंवा सुधारणेची गरज वाटते)** | | | |
| कपडे | नखे | दात | डोळे |
| कान | नाक | केस | |
| **दैनंदिन कार्यक्रम पार पाडतो./नेहमी नियम पाळतो. कार्यक्रमातील समायोजन** | **क्वचित** | **कधी कधी** | **नेहमी** |
| • उत्साहाने गटकार्यात भाग घेतो. | | | |
| • उपक्रमांत पुढाकार घेतो. | | | |
| • प्रसंगानुरूप भावना व्यक्त करतो. | | | |
| • इतरांच्या भावना समजून घेतो, त्याचप्रमाणे गोष्टीतील, चित्रातील भावना शोधू/समजू शकतो. | | | |
| • इतरांबरोबर सामाजिक नातेसंबंध समजून घेतो. | | | |
| • खेळाचे नियम पाळतो. | | | |
| • वर्गातील दैनंदिन कामकाजाचे व वर्तणुकीचे नियम पाळतो. | | | |
| • गुंतागुंतीच्या सूचना समजून घेऊन त्यांचे पालन करतो. | | | |
| **मैदानी खेळांमधील सहभाग** | **मदतीची आवश्यकता असते** | **थोड्या प्रयत्नांनी करता येते.** | **सहज करता येते.** |
| • ठरावीक दिशेने चेंडू फेकतो. | | | |
| • कमी अंतरावरून चेंडू झेलतो. | | | |
| • पायाने चेंडू ठरावीक दिशेला मारतो. | | | |
| • नाच, व्यायाम यांमध्ये लवचीकता, चपळता दाखवितो. | | | |
| • लंगडी घालत पुढे जातो, उलटे मागे येतो. | | | |

| सर्जनशील कलात्मक उपक्रमांमध्ये सहभाग – सूक्ष्मकारक विकास, कल्पनाशक्ती व कलात्मक/ सौंदर्य दृष्टीचा विकास | मदतीची आवश्यकता असते | थोड्या प्रयत्नांनी करता येते. | सहज करता येते. |
|---|---|---|---|
| • कागदाच्या साध्या घड्या किंवा सोप्या ओरिगामी कृती करतो. | | | |
| • चुरगाळून कागदाचे छोटे गोळे करून चिकटवितो. | | | |
| • चित्रात बारकावे काढतो./बारकाव्यांसह चित्र काढतो. | | | |
| • छोट्या चित्रात रंग भरतो. | | | |
| • वेगवेगळ्या वस्तूंचा वापर करून ठसेकाम करतो. | | | |
| • चिकणमाती वापरून प्राथमिक आकार बनवितो. | | | |
| **गणिती कौशल्ये व परिसराबद्दलची जागरूकता दाखविणे** | **क्वचित** | **कधी कधी** | **नेहमी** |
| साध्या नैसर्गिक घटनांचे मार्गदर्शनाखाली निरीक्षण करतो, समजून घेतो. | | | |
| एकापेक्षा अधिक गुणधर्मांचा वापर करून वस्तूंचे वर्गीकरण करतो. (आकार/रंग/वस्तुमान) | | | |
| • वस्तू क्रमाने लावणे/क्रमवारितेनुसार वस्तू लावतो (वस्तुमान/लांबी/उंची) | | | |
| • आकृतिबंध ओळखून पूर्ण करता येतो. | | | |
| • आकार ओळखून नाव सांगता यते. (गोल, चौकोन, त्रिकोण, आयत) | | | |
| • अवघड कोडी सोडवितो. | | | |
| • कोड्यातील लपविलेला किंवा चुकलेला भाग ओळखतो. | | | |
| • उंच, बुटका, आखूड, जड, हलका अशी गणिती भाषा वापरतो. | | | |
| • एकास एक संगती लावता येते. | | | |

| तोंडी अभिव्यक्ती | क्वचित | कधी कधी | नेहमी |
|---|---|---|---|
| • छोट्या मजकुराचे ऐकून आकलन होते. | | | |
| • एखाद्या प्रसंगाचे छोट्या वाक्यांमध्ये वर्णन करतो. | | | |
| • शब्दातील आवाज सुटे करतो. शब्द तोडून – जोडून सांगता येतात. | | | |
| • नेहमीच्या वापरातील शब्दांमधील सुरुवातीचा व शेवटचा आवाज ओळखता येतो. | | | |
| • कल्पक प्रश्न विचारतो, उत्तर देतो. | | | |
| **अंकुरती वाचनाची कौशल्ये** | **क्वचित** | **कधी कधी** | **नेहमी** |
| • छापील मजकुराचे नियम समजतात. जसे – वाचताना डावीकडून उजवीकडे. वरून–खाली वाचतो. आभासी वाचन करतो. | | | |
| **अंकुरत्या लेखनाची कौशल्ये** | **क्वचित** | **कधी कधी** | **नेहमी** |
| • लेखन साहित्य किंवा रंगकामांच्या साधनांवर चांगली पकड दिसते. | | | |
| • लेखन साहित्य योग्य पद्धतीने पकडतो. | | | |
| • स्वतःच्या चित्रांचे वाचन करतो व साध्या शब्दांमध्ये वर्णन करून सांगतो. | | | |

वर्गशिक्षकांची स्वाक्षरी


| महिना – तिसरा | | | |
|---|---|---|---|
| **उद्‌दिष्ट –** पायाभूत क्षमतांचा विकास | | | |
| **विद्यार्थ्याचे नाव :** | | | |
| **विद्यार्थ्याचे वय :** | **इयत्ता :** पहिली | | |
| **वैयक्तिक स्वच्छता (चांगली किंवा सुधारणेची गरज वाटते)** | | | |
| कपडे | नखे | दात | डोळे |
| कान | नाक | केस | |
| **दैनंदिन कार्यक्रम पार पाडतो/नेहमी नियम पाळतो. कार्यक्रमातील समायोजन** | **क्वचित** | **कधी कधी** | **नेहमी** |
| • चांगला स्पर्श–वाईट स्पर्श यांतील फरक समजतो. | | | |
| • योग्य व अयोग्य समजता/ओळखता येते. | | | |
| • भांडणे सोडविण्यासाठी विविध उपायांचा विचार करतो. | | | |
| • इतर मुलांच्या भावनांप्रति व गरजांप्रति संवेदनशीलता दर्शवितो. विशेषतः विशेष गरजा असणाऱ्या मुलांप्रति. | | | |
| **मैदानी खेळांमधील सहभाग** | **मदतीची आवश्यकता असते** | **प्रयत्नांनी करता येते.** | **सहज करता येते.** |
| • नेम धरून चेंडू फेकतो. | | | |
| • आत्मविश्वासाने जिन्यावर व दोरीवर चढतो. | | | |
| • योगा, व्यायाम व नाचामध्ये सहभाग घेतो. | | | |
| **सर्जनशील कलात्मक उपक्रमांमध्ये सहभाग – सूक्ष्मकारक विकास, कल्पनाशक्ती व कलात्मक/सौंदर्य दृष्टीचा विकास** | **मदतीची आवश्यकता असते** | **थोड्या त्रासाने/प्रयत्नांनी करता येते.** | **सहज करता येते.** |
| • कात्रीने चित्र कापून चिकटवितो. | | | |
| • बोटांच्या ठशांचे चित्र काढतो. | | | |
| • कोलाज बनवितो. | | | |

| गणिती कौशल्ये व परिसराबद्दलची जागरूकता दाखविणे | मदतीची आवश्यकता असते | थोड्या प्रयत्नांनी करता येते. | सहज करता येते. |
|---|---|---|---|
| • गटातील वस्तूंची संख्या कमी किंवा जास्त हे सांगता येते. | | | |
| • आकृतिबंध तयार करता येतो व वाढविता येतो. | | | |
| • घटना किंवा वस्तू क्रमाने लावतो/घटनेचा क्रमवार विचार करून सांगता येते. | | | |
| **तोंडी अभिव्यक्ती** | **क्वचित** | **कधी कधी** | **नेहमी** |
| • ऐकल्यावर आकलन होऊन उत्तर देतो. | | | |
| • अर्थपूर्ण संवाद साधतो. | | | |
| • शब्दातील सुरुवातीचा मधला व शेवटचा आवाज ओळखता येतो. | | | |
| **अंकुरती वाचनाची कौशल्ये** | **क्वचित** | **कधी कधी** | **नेहमी** |
| • माहित असलेली गोष्ट सुरुवात, मध्य व शेवट अशा क्रमाने पुन्हा सांगतो. | | | |
| • वर्गातील वस्तूंच्या नावाचे दृक्‌शब्द वाचता येतात. | | | |
| **अंकुरत्या लेखनाची कौशल्ये** | **क्वचित** | **कधी कधी** | **नेहमी** |
| • आपल्या कल्पना चित्रांतून व शब्दांतून व्यक्त करतो. | | | |
| • सहजरीत्या साधनांचा वापर करून अर्थपूर्ण चित्र काढतो/चित्राद्वारे अर्थ पोहोचविण्याकरिता साधनांचा सहजरीत्या वापर करतो. | | | |



वर्गशिक्षकांची स्वाक्षरी

# १२) अध्ययन-अध्यापन साहित्य







## गंमत रस्ता









## दृक्शब्द डॉमिनो नमुना

| | |
|---|---|
| → |  |
| दार |  |
| खिडकी |  |
| फळा |  |
| खडू |  |
| खुर्ची | ● |


## मॅचिंग सेट नमुना

| | |
|---|---|
|  |  |
| गाय | कुत्रा |
|  |  |
| पोपट | कोंबडा |
|  |  |
| मासा | बॉल |
|  |  |
| गाडी | बॅट |

# मॅचिंग सेट - चित्र शब्दकार्ड नमुना

| | |
|---|---|
|  |  |
|  |  |
|  |  |
|  |  |
| बॉल | बॅट |
| गाय | गाडी |
| कुत्रा | पोपट |
| कोंबडा | मासा |


## (HW कृती १७ (२) साठी नमुना)



# श्रेयनामावली

## विद्याप्रवेश (शाळापूर्व तयारी कार्यक्रम - इयत्ता : पहिली) शिक्षक मार्गदर्शिका विकसन, लेखन व समीक्षण सहभाग

| अ.क्र. | तज्ज्ञ सदस्यांचे नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | डॉ. राजेश बनकर | प्राचार्य | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अहमदनगर |
| २. | श्रीम. सरस्वती सूर्यवंशी | विभाग प्रमुख, अभ्यासक्रम विकसन विभाग | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे. |
| ३. | श्रीम. वृषाली गायकवाड | अधिव्याख्याता | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे. |
| ४. | श्रीम. विद्या कदम | अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था सातारा. |
| ५. | श्री. रामदास टोणे | अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल, जि. रायगड. |
| ६. | श्रीम. वेदिका मांडकुलकर | विषय साधनव्यक्ती | गटसाधन केंद्र कुडाळ, जि. सिंधुदुर्ग. |
| ७. | श्रीम. संध्या नगरकर | बालविकास प्रकल्प अधिकारी | एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय, पुणे. |
| ८. | श्रीम. शिवानी पराशर | युनिसेफ प्रतिनिधी | दिल्ली. |
| ९. | श्रीम. वैशाली गाढवे | सहशिक्षक | जि. प. प्राथमिक शाळा लांडेवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे. |
| १०. | श्री. सचिन वाडकर | सहशिक्षक | पुणे, मनपा शाळा क्र. १०५, मुलांची शाळा, संदेशनगर, पुणे. |
| ११. | श्रीम. सोनाली भागवत | सहशिक्षक | जि. प. प्राथ. शाळा, बोरी पारधी, ता. दौंड, जि. पुणे. |
| १२. | श्रीम. नेहा गोरे | सहशिक्षक | मित्रमंडळ एज्युकेशन सोसायटी, सरिता विद्यालय, पुणे. |
| १३. | श्रीम. विद्या गाढवे | सहशिक्षक | जि. प. प्राथ. शाळा, घाटेवाडी, ता. पाटण, जि. सातारा. |
| १४. | श्री. अल्ताफ शेख | सहशिक्षक | जि. प. प्राथ. शाळा, आमडोशी, ता. रोहा, जि. रायगड. |
| १५. | श्रीम. सुवर्णा देशपांडे | सहशिक्षक | न्यू इंग्लिश स्कूल, सातारा. |
| १६. | श्री. नारायण शिंदे | सहशिक्षक | जि. प. प्राथ. शाळा वाठावेसराड, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी. |
| १७. | श्रीम. चित्रा पेंढारकर | सहशिक्षक | मनपा शाळा क्र. ७४, मुलींची शाळा, पुणे. |
| १८. | श्रीम. ज्योती दराडे | सहशिक्षक | जि. प. प्राथ. शाळा झिरपी तांडा, ता. अंबड, जि. जालना. |
| १९. | श्रीम. प्रीती देवकर | उपशिक्षक | प्रेमलीला विठ्ठलदास कन्या शाळा, कर्वे रोड, पुणे. |
| २०. | श्री. कारभारी देवकर | उपशिक्षक | साधना मुलांचे हायस्कूल, पुणे. |
| २१. | श्रीम. आशा वानखेडे | उपशिक्षक | जि. प. प्राथ. शाळा, मोकरवाडी, ता. हवेली, जि. पुणे. |
| २२. | श्री. अजय जिरापुरे | उपशिक्षक | से.फ.ला. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, धामणगाव रेल्वे, जि. अमरावती. |
| २३. | श्रीम. अजिता गांजळे | सहशिक्षक | जि. प. प्राथ. शाळा, टिळेकरवाडी, ता. हवेली, जि. पुणे. |
| २४. | श्रीम. कल्पना कांबळे | सहशिक्षक | स्व. नाना पालकर प्राथमिक शाळा, नांदेड. |
| २५. | श्रीम. वीणा काळे | अंगणवाडी पर्यवेक्षिका | एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय, सातारा. |
| २६. | श्रीम. अरुंधती गरूड | अंगणवाडी पर्यवेक्षिका | एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय, सातारा. |
| २७. | श्रीम. योगिता भामरे | अंगणवाडी पर्यवेक्षिका | एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय, पुणे. |
| २८. | श्रीम. श्वेतांबरी अनगळ | अंगणवाडी पर्यवेक्षिका | एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय, सातारा. |
| २९. | श्रीम. वैशाली डेरे | सहशिक्षक | कै. मामासाहेब मोहोळ विद्यामंदिर, मनपा शाळा क्र. ९४ बी, पुणे. |
| ३०. | डॉ. शीला कोलटकर | निवृत्त शिक्षिका | पुणे. |
| ३१. | श्रीम. नंदा कुलकर्णी | मुद्रणदोष तपासक | पुणे. |
| ३२. | श्रीम. श्यामला दळवी | एनजीओ प्रतिनिधी | वाशी, नवी मुंबई. |
| ३३. | श्रीम. प्राची बोगम | एनजीओ प्रतिनिधी | पुणे. |
| ३४. | श्री. प्रवीण गुरव | एनजीओ प्रतिनिधी | पुणे. |




मुलांना कृतिशील व सक्रिय अध्ययनार्थी
बनविणारे अध्यापनशास्त्र

शाळापूर्व तयारी : विद्याप्रवेश